सर्वांसाठी
सोप्या भाषेत
उपनिषदांचा अमूल्य

ठेवा

डॉ. सुहास पेठे

।।ॐ।।

सर्वांसाठी
सोप्या भाषेत उपनिषदांचा अमूल्य

* ठेवा *

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* ठेवा

पुस्तकरूपाने प्रकाशित पाचवी आवृत्ती : नोव्हेंबर २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep **(साधननंदादीप)**

आत्मविद्येच्या वाटचालीतले माझे
ईश्वरदत्त सहृदय सांगाती -

पत्नी सौ. सुखदा

आणि

पुत्र चि. नंदन

यांस

...कृतज्ञतापूर्वक...

- सुहास पेठे

*

'ठेवा' सादर करताना . . .

'उपनिषदे' हा आपला अत्यंत पुरातन असा आध्यात्मिक, वैचारिक व सांस्कृतिक 'ठेवा' आहे. उपनिषदांशी सर्वसामान्यांचा मुळातच संबंध कमी आल्यामुळं किंवा ती कठीण आहेत या कल्पनेमुळं त्यांतील ठेव्याचा व्हावा तसा लाभ सर्वांना होत नाही, असं उपनिषदं वाचताना मला अनेकदा जाणवे. त्यांतले काही चमकदार विचार किंवा त्यांतली जीवनदृष्टी समोर आली की आजच्या जीवनावरही ती प्रकाश टाकून जाई. अनेकदा त्यांतल्या गूढ वाटणाऱ्या सूत्रांचं चिंतन व प्रयोग केल्यावर त्यांचा अर्थ अधिक उलगडतो असंही होई. या साऱ्याचा लाभ कुणा जिज्ञासूंना होत असल्यास व्हावा म्हणून हे काही चिंतन 'ठेवा'मध्ये सादर केलं आहे.

उपनिषदांची व्याप्ती खूप मोठी आहे. त्यांतले विषयही अनेक आहेत. पण इथल्या पृष्ठांच्या मर्यादेत त्यांतल्या निवडक व शक्यतो वेगळ्या विषयांचा विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. ही निवड व्यापक ठेवायचा प्रयत्न केला असला तरी 'आत्मविद्ये'च्या प्रधान विषयावर अनेक अंगानं लिहिण्याचा प्रयासही केला आहे. हे सादर करताना शब्दार्थापलीकडं जाऊन स्वत:च्या चिंतन व अनुभवानं प्रतीत झालेला अभिप्रेत अर्थ मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यास्तव घडणाऱ्या संक्षेप-विस्तारादी त्रुटींबद्दल क्षमा करावी.

प्रकृती व कामांच्या व्यापामुळं या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीच्या श्रुतलेखनाच्या कामी येथील साधकपरिवारातील सौ.प्रांजली प्रमोद कुलकर्णी यांनी मदत केली.त्यांचे व त्यांना या कामी सहकार्य देणारे श्री. प्रमोदराव व परिवारीय यांचा मी आभारी आहे. वाचकांच्या उत्तम प्रतिसादामुळं संतांच्या छायेखाली 'ठेवा'ची ही पुढची आवृत्ती लवकर प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे. मुद्रणखर्चापेक्षाही अत्यंत कमी मूल्यात ती प्रकाशित करून जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचवणे, हे आमचे श्रींच्या आज्ञेनुसार केलेल ज्ञानदान होय. त्यास वितरण, ने-आण इ. अनेक मदती आपुलकीने करणाऱ्या साधकांचा मी ऋणी आहे. तसेच श्री. संदेश शहा, श्री.प्रकाश फुले यांचाही मी ऋणी आहे.

उपनिषदांतली निदान काही विषयांची जिज्ञासा जरी या निमित्तानं सर्वसामान्य वाचकांच्या मनात जागृत झाली तरी मला आनंद वाटेल. ती निर्माण व्हावी या हेतूनं हा 'ठेवा' वाचकांच्या चरणी नम्रपणे सादर करीत आहे.

- सुहास पेठे

* ठेवा *

अनुक्रम

१.	आनंदाचा ठेवा	७
२.	अज्ञान व ज्ञानाच्या पलीकडे	११
३.	विद्यांची गरज	१५
४.	शिक्षणातलं शिकण्यासारखं	१८
५.	खरे ब्राह्मण	२१
६.	माणसांचं उद्‌बोधक वर्गीकरण	२४
७.	ज्ञान आणि स्मरण	२६
८.	खरा विद्यार्थी	२९
९.	स्वार्थाची सीमारेषा	३३
१०.	अज्ञानाची जाणीव	३५
११.	झाकलेला ईश्वर	३९
१२.	खरी वैज्ञानिकता	४३
१३.	ईश्वरप्राप्तीचा मार्ग	४७
१४.	मुक्तीचे मार्ग	५१
१५.	ईश्वरासारखं रहावं	५७
१६.	एक जिव्हाळ्याचा प्रश्न	६३
१७.	सुखाचा मार्ग	६९
१८.	मुक्त व सुखी करणारं ज्ञान	७२
१९.	काय मागावं ?	७५
२०.	चिंतनाचं पथ्य	७८

२१.	देवाचं स्वरूप काय ?	८१
२२.	भेदांपलीकडं	८६
२३.	आदर्श औदार्य	९०
२४.	उपासनेचे टप्पे	९४
२५.	आगळीवेगळी व्रतं	९६
२६.	खरा होम	९८
२७.	सर्वश्रेष्ठ दान	१००
२८.	मनच बंधमुक्तीचं कारण	१०१
२९.	भोजनभूमिका	१०२
३०.	खऱ्या प्रेमाची गरज व विद्या	१०२
३१.	आनंदाच्या विद्येची गरज	१०५
३२.	आत्मविद्येची वाटचाल	१०८
३३.	पहिला अडथळा	१११
३४.	वाटचालीतली सावधगिरी	११५
३५.	अनित्यातून नित्याकडे	११८
३६.	अंतरात्म्याची वैशिष्ट्यं	१२१
३७.	चैतन्याशी तादात्म्य	१२५
३८.	अडचणी आणि मार्ग	१२९
३९.	स्वानंदाच्या राज्यात	१३४
४०.	जीवनदायी विद्या	१३८

● संदर्भसूची १४०

*

१. आनंदाचा ठेवा

माणसाला मिळालेली सर्वांत मूल्यवान गोष्ट कोणती, असं जर विचारलं तर उत्तरं अनेक येण्याची शक्यता आहे. ती कमीअधिक बरोबरही असतील. पण मला वाटतं, त्याचं सर्वांत बरोबर किंवा प्राथमिक उत्तर 'माणसाचं आयुष्य' हेच होईल.

याचं कारण असं की, अगदी पहिला विचार केला तरी 'माणसाला मिळालेली सर्वांत मूल्यवान गोष्ट कोणती ?' हा प्रश्नसुद्धा माणूस करू शकतो, तो केवळ तो 'माणूस' आहे, 'माणसाचं आयुष्य' त्याला जगायला मिळालेलं आहे म्हणूनच ! हे तर सहजच कळण्यासारखं आणि पटण्यासारखं आहे.

या 'माणसा'च्या मूल्यवान जन्माच्या प्राप्तीमुळंच आज आजूबाजूला दिसते आहे ती वैज्ञानिक प्रगती असो, कलासंस्कृतीची प्रगती असो, वैचारिक प्रगती असो, कृषिवाणिज्य प्रगती असो, तंत्रज्ञानातली प्रगती असो - सर्व प्रकारची देदीप्यमान प्रगती शक्य आहे. माणसाच्या ठिकाणी असलेली विलक्षण बुद्धिमत्ता, अपार भावशक्ती, अथक परिश्रमशीलता, सारासार व भविष्यवेधी विचारशक्ती - अशा खरोखर मांडता येणंही कठीण अशा कित्येक प्रकारच्या क्षमतांचा शोध व विकास होत जातो आहे. त्या साऱ्याचं फलित म्हणून केवळ कल्पनेत किंवा वेळी कल्पनातीत वाटणाऱ्या अनेक गोष्टी आज मानवी जीवनात प्रत्यक्षात उतरल्या आहेत. गेल्या शंभर वर्षांपूर्वी अनेक कादंबऱ्यांतून कल्पनेच्या भराऱ्या म्हणून मांडली गेलेली वर्णनं पुढं लागलेल्या मानवी शोधांनी, प्रज्ञेनं सत्यात उतरली असल्याचं आपल्याला आढळून येतंआहे.

याच्याच बरोबर दुसऱ्या बाजूला मानवी जगात स्वास्थ्याचा ऱ्हास, पराकोटीची स्वार्थलोलुपता, माणुसकीचा विसर दर्शवणाऱ्या शेकडो घटना, दंभाचा, भ्रष्टाचाराचा व हिंसावृत्तीचा कळस दाखवणारे हजारो प्रसंग आजूबाजूला घडताना दिसतात, सर्वत्र घडत असल्याचं वृत्तपत्रांतून व वृत्तवाहिन्यांतून प्रत्यही आढळतं आहे. आपल्या ऋषितुल्य साधनेनं जगातले सर्वोच्च लौकिक सन्मान मिळवून आणणारे आपल्यातच आहेत, तर त्या सन्मानाची पदकंसुद्धा पळवून

नेण्याचं क्षुद्र-हीन चौर्यकर्म करणारेही इथंच माणसांच्या जगात वावरतात, हा आपला अनुभवच आहे.

तसा हा अनुभवही काही मानवी इतिहासाला नवीन नाही. प्रश्न फक्त संतुलनाचा आहे, त्यामधल्या प्रमाणाचा आहे. कारण माणसाच्या जन्माचं तेही एक मोठं वैशिष्ट्य आहे. त्याच्यात अंतराळात जायची सुदैवी क्षमता आहे, तितकीच पाताळाचा तळ गाठायची दुर्दैवी क्षमताही आहे. आपल्या ऊर्जेनं जगातलं कठिणात कठीण काम करून मानवी जीवन समृद्ध करण्याबरोबरच त्याच ऊर्जेच्या विवेकशून्य व विध्वंसक वापरानं मूळ मानवी जीवन नष्टप्राय करण्याची क्षमताही त्याच माणसानं शोधलेल्या ऊर्जेत व पर्यायानं ती शोधणाऱ्या माणसात आहे.

त्यामुळं या साऱ्या समृद्धीबरोबरच विचाराच्या, विवेकाच्या क्षमतेची वाढ ही आजकाल अधिकाधिक गरजेची गोष्ट का बनली आहे, हे सहज लक्षात येऊ शकेल. माणसाची तथाकथित भौतिक प्रगती अवश्य होऊ द्या. त्याच्या हातात नवनवी शस्त्रं आणि शास्त्रं अवश्य येऊ द्या. ते सारं हाताळणारे त्याचे हात आणि त्यामागचं मनही जर तितकंच किंबहुना त्यापेक्षाही अधिक प्रमाणात प्रगल्भ होत राहिलं, तर प्रगतीच्या दुसऱ्या बाजूला दिसणाऱ्या अधोगतीची किंवा विकासाबरोबर भेडसावणाऱ्या विध्वंसाची काळजी करावी लागणार नाही.

या प्रगल्भतेसाठी माणसाचे काही प्रयत्न सुरू नाहीत असं नाही. मानवी मन-बुद्धी-चित्त यांच्या शुद्धीसाठी, विधायक विकासासाठी माणूसही अनेक प्रयत्न करतो आहे, साधना करतो आहे. नवे नवे विचार, तंत्रं, पद्धती शोधतो आहे. यासाठी पूर्वापर प्रयत्नही होत आलेले आहेत. ढोबळमानानं या साऱ्या प्रयत्नांचं मूळ 'आत्मविद्ये'च्या शोधात सापडतं. त्याही विद्येचा उगम फार जुना आहे. तिचा विकासही हजारो वर्षं घडतोच आहे.

आजच्या आपल्या प्रयत्नांना चांगली मदत घडेल असा एक मोठा स्रोत किंवा ठेवा उपनिषदांच्या विचारांचा, त्यांच्या जीवनदृष्टीचा आहे. खरं तर आपल्याकडचा तो अगदी जुन्यात जुना, अत्यंत मोजका, सूत्रमय, थोर व्यक्तींच्या प्रत्यक्ष जीवनानुभवावर आधारलेला असा ठेवा आहे. आज काही हजार वर्षांनंतरसुद्धा माणसाच्या प्रवृत्ती, त्याचे प्रश्न थोड्याफार फरकानं टिकून आहेत. त्याच पद्धतीनं या साऱ्याचा विचार करणारा, उत्तरं शोधणारा-देणारा, प्रेरणा देणारा

हा ठेवाही टिकून आहे. कमी झाला असेल तर त्या दुर्मीळ ठेव्याशी आपला संपर्क, त्यावरचं आजचं चिंतन, त्यांतल्या सूत्रांचा वापर, प्रयोग !

या साऱ्यामुळं अनेकांना 'उपनिषदं' हा शब्द कुठंतरी ऐकल्यासारखा वाटतो. एखादी छोटी मोठी पुस्तिका पाहण्यात आलेली असते. पण हा अमूल्य ठेवा आपल्याला नक्की काय देऊ शकेल ते समजून घेणं - त्याचा आपल्या आजच्या परिस्थितीशी-प्रश्नांशी मेळ घालून त्या सूत्रांची उपयुक्तता पाहाणं, त्यांचा अंमल करणं या गोष्टी बहुधा घडताना दिसत नाहीत. उलट काहींचा असाही समज असतो की, हे काही आपल्यासाठी नाही, ते गुहेतलं तत्त्वचिंतन आहे, काही विशिष्ट तात्त्विक-विद्वान-धार्मिक-तर्कचर्चेत रस असलेले लोक त्यात रस घेत असतील तर घेवोत बापडे ! त्या जुन्या बाडातून आपल्या आजच्या वैज्ञानिक, बुद्धिनिष्ठ, अश्रद्ध, वैचारिक, प्रगत युगाला आणि त्यातल्या जटिल समस्यांना उपयोगी पडणारं काय मिळणार आहे ? असा समज ठेवून आपण या जीवनवादी, मूलगामी व जिवंत ठेव्याकडं पाहू, तर आपण एका चांगल्या स्रोताला पारखे होऊ.

भले माणसाच्या आयुष्यातल्या चारच प्रश्नांच्या बाबतीत हा ठेवा उपयोगी ठरेल, तो एक दहापंधराच विधायक व आजही समर्पक वाटणारे विचार देऊ शकेल, असं आपल्याला आढळेल, भले त्यांतले काही भाग आज हजारो वर्षांच्या मानवी प्रगतीनं कमी महत्त्वाचे किंवा बाजूला ठेवण्यासारखे ठरतील, पण त्या 'ठेव्या'ची आपण उपेक्षा करू तर आपणच दुर्दैवी ठरू, हे मात्र निश्चितच. निदान त्यांतल्या काही सूत्रांची आपण आजच्या काळाच्या-विचाराच्या-समस्यांच्या संदर्भात ओळख तरी करून घेऊ आणि मग ती कितपत लागू-गैरलागू, उपयोगी-निरुपयोगी आहे ते ठरवू. हे तरी किमान तटस्थ-हितकारी बुद्धीचं लक्षण होईल.

या पुस्तकाच्या निमित्तानं हाच प्रयत्न केला गेलेला आहे. माणसाच्या समस्यांचं निदान, मूलगामी तोड, विचाराला आजही चालना देतील अशी सूत्रं, चांगले चांगले प्रयोग, उपनिषदांची शुद्ध-वैज्ञानिक-कल्याणकारी दृष्टी, समर्पक घटना,दाखले असे अनेक सुवर्णकण या उपनिषदांत जागोजागी विखुरले आहेत. तशी त्याची मोजदाद कठीण. पुन्हा पाहाणाऱ्यांची दृष्टीही वेगवेगळी. तरीही जी सूत्रं

स्वत:ला प्रत्यक्ष जगायला उपयोगी पडतात, महत्त्वाची वाटतात, ती इथं निवडण्याचा व विवरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातही काही सूत्रं चिरपरिचित असल्यानं टाळलेली आहेत.

उपनिषदांतली विद्या ही माणसाला खऱ्या आनंदाकडं-शाश्वत प्रकाशाकडं-कालातीत सत्याकडं घेऊन जाणारी आत्मविद्या आहे. या विद्येचा परिचय-निदान ओझरता परिचय, आपल्याला पुढच्या प्रकरणांतून घडो व त्या प्रकाशात आपलं अंतर्जीवन आनंदानं उजळून निघो, या मन:पूर्वक शुभेच्छा !

*

२. अज्ञान व ज्ञानाच्या पलीकडे

माणसाच्या जीवनातलं विद्येचं स्थान प्रसिद्ध आहे. ज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांचा गेल्या हजारो वर्षांमध्ये खूप विकास झालेला आहे. या विविध विषयांच्या ज्ञानामुळं माणसाचं जीवन कितीतरी प्रमाणात सुखकर झालं आहे, हेही आपण जाणतो. जीवनातली सुखसोय वाढवणाऱ्या अनेक वस्तू आणि उपकरणं या ज्ञानाच्या विकासानंच उपलब्ध करून दिलेली आहेत, हेही निर्विवाद आहे.

दुसऱ्या बाजूला अज्ञानाचे किंवा अडाणीपणाचे तोटे वेगळे सांगण्याची गरज आहे, असंही नाही. अज्ञानामुळं माणसाला काय करावं हे कळत नाही, हे खरंच आहे. पण चुकीच्या कृतीमुळं होणारं स्वत:चं नुकसान कसं टाळावं, हेही कळत नाही. विषयाचं ज्ञान नसणं एवढ्यापुरताच अडाणीपणाचा अर्थ मर्यादित नसून विषयाचं अपूर्ण आणि धोकादायक ज्ञान, हेही त्यात येतं. एखादं साधं बिघडलेलं वाहन घ्या, ते दुरुस्त करायचं अज्ञान आपण समजू शकतो. पण दुरुस्तीचं अर्धवट ज्ञान असलं, तर असा माणूस ते वाहन दुरुस्त करायला घेऊन मूळ बिघाड तर दूर करू शकत नाहीच, उलट त्यात एखादा नवीन बिघाड उत्पन्न करून ठेवतो, हा आपला अनुभव आहे. या अर्थानं अज्ञानामुळं होणाऱ्या अडचणी तशा अनेक आहेत.

परंतु खरी अडचण ज्ञानाबद्दलची आहे. अर्थात ज्ञानाबद्दल काही अडचण असू शकेल, हेच मुळात मान्य होत नाही, इथंपासून ज्ञानातल्या अडचणींची सुरुवात होते. हे लक्षात घेऊन उपनिषदांत एक महत्त्वाचं सूत्र दिलं आहे. त्यांनी ज्ञानाचे तीन प्रकार केले आहेत. एक - अज्ञान, दुसरं - ज्ञान आणि तिसरं - आत्मज्ञान आणि त्यासंबंधी सूत्रामध्ये आपला अनुभव सांगताना ऋषी म्हणतात, 'अज्ञानात आहे तो अंधारात आहे, हे लक्षात ठेवावं.' पण पुढं ते बजावतात, 'जो ज्ञानात रमला आहे, तो अधिक घोर अंधारात आहे, हे लक्षात ठेवावं.' या दोन्हींच्या पलीकडं जाऊन आत्मज्ञानात पोहोचणाराच सदैव प्रकाशात राहील, असा त्यांचा अभिप्राय आहे.

यांतला अज्ञानाचा परिणाम आपण क्षणभर समजू शकतो. कारण अडाणीपणात अंधार दिसून येतोच. पण ज्ञानाचा अंधार घोर आहे, हे मात्र क्षणभर मनाला पटत नाही. उपनिषदांना मात्र त्याची खात्री वाटते आणि ती त्यांची दृष्टी त्यावेळी तर खरी होतीच, पण आजच्या ज्ञानाच्या विकासानं ती अधिकाधिक खरी ठरवली आहे, हे आपण समजून घेतलं तर उपयोगी पडेल, असं वाटतं.

आपली साधारण कल्पना अशी आहे की, मनुष्यानं सतत वेगवेगळ्या विषयांचं ज्ञान मिळवीत असावं, ज्ञानाच्या साहाय्यानं त्याचा विकास होतो, त्याच्या जीवनाला दिशा मिळते, त्याची प्रगती होते. त्याला लौकिकदृष्ट्या उपजीविकेला साधन तर मिळतंच, पण त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास या विद्यांमुळं होत जातो. म्हणून एकापेक्षा अधिक विद्या शिकण्याकडं माणसाचा स्वाभाविक कल असतो. यावरून आजच्या परिभाषेत अनेक विषयातले ज्ञानी (Combined Talents) हीसुद्धा मोठी कौतुकाची संज्ञा होऊन बसली आहे. हे सर्व एका अर्थानं खरं आहे.

या सर्वांत शंकेला सुरुवात कुठून होते, तर ज्ञानानं मनुष्य सुखी होत असेल, तर अधिक ज्ञानानं तो अधिक सुखी होत गेला पाहिजे. थोड्या ज्ञानानं थोडी निश्चितता येत असेल, तर जास्त ज्ञानानं जास्त निश्चितता आली पाहिजे. वस्तुस्थिती मात्र उलट दिसते आहे.

जास्त शिकलेला माणूस निर्णयाच्या बाबतीत जास्त संभ्रमात आहे. असे 'अनेक विषयांतले ज्ञानी' एकवेळ पैसा खोऱ्यानं ओढतात, पण ते माणूस म्हणूनही निकृष्ट दिसतात आणि समाधानाच्या बाबतीतही अनेकांचं भांडं रिकामं असतं. महिन्याला पन्नास हजाराचा मुळातच सद्यस्थितीत तरी अनावश्यक वाटणारा पगार घेणारा तृप्त तर सोडाच, त्या विषयातला ज्ञानी असूनसुद्धा महिन्याला ऐंशी हजार कुठं मिळतील का, या विवंचनेत ग्रस्त आहे. या साऱ्या ज्ञानानं त्याला मुक्त-निर्भय-निर्लोभी-समाधानी बनवण्याऐवजी उलटच बनवलं आहे, असं चित्र दिसतं.

त्यात पुन्हा ज्ञानामुळं मिळणाऱ्या सुबत्तेनं त्याची वस्तूंची आणि विषयाच्या उपभोगांची लालसा कितीतरी पट अधिकच वाढवली आहे. पोटापुरतं ज्ञान

असलेला आणि पोटापुरतं मिळवणारा त्याच्या एकुलत्या एक लहानशा जागेत सुखी आहे आणि चार ठिकाणी चार गावी गुंतवणूक करून पाचव्या आणि सहाव्या ठिकाणी घराच्या गुंतवणुकीच्या विवंचनेत आमचा 'अधिक ज्ञानी' रोज चिंताग्रस्त आहे. उपनिषदं ज्ञानाला 'घोर अंधार' असं का म्हणतात, याची थोडी कल्पना यावरून येईल.

ज्ञानाच्या बाबतीत उपनिषदांनी सुचवलेले मुद्दे अधिक सखोल आहेत. ज्ञानातले काही धोके आपण अजूनही नीट ओळखलेले नाहीत. एका विषयाच्या ज्ञानात दुसऱ्या विषयाच्या ज्ञानाची खेच नकळत येते, याची कल्पना आपल्याला क्वचितच येते. चरितार्थासाठी किंवा आवड म्हणून एखाद-दुसऱ्या विषयाचं ज्ञान मिळवणं, हे तर अपरिहार्यच आहे, पण एक काम करताकरता नकळत अकारण दुसरं काम आपण केव्हा करतो, हे जसं आपल्याला कळत नाही आणि एक उपक्रम करणारा नकळत दुसरा, तिसरा, चौथा उपक्रम करतो तसा जरुरीसाठी एखादी पदवी मिळवणारा - शिकायला वेळ आहे, सोय आहे, पैसा आहे, बौद्धिक कुवत आहे - म्हणून वेगवेगळे कोर्सेस करीत सुटतो आणि अनेक पदव्या बेसावधपणानं मिळवीत जातो, यात त्याला गरज नसणारं कितीतरी ज्ञान चित्तात अकारण गोळा होतं, त्याच्या चित्ताचा भार ते वाढवतं आणि उपनिषदांत सुचवल्याप्रमाणं असा भार माणसाची स्वतंत्र चिंतनशक्ती, निर्णयशक्ती कमी करीत असतो, हे लक्षात येत नाही.

त्यामुळं चित्त नेहमी द्विधा राहतं, गोंधळात राहतं. कुठल्याही गोष्टीचा नि:संशय किंवा निर्णायक निकाल होत नाही. त्यातच अधिक सावध राहाण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रत्येक विषयाच्या ज्ञानाबरोबर हे ज्ञान कितीही तुटपुंजं का असेना, आपल्याला कळत असल्याचा भ्रम मात्र ते वाढवीतच जातं. त्यापोटी अधिक शिकलेला मनुष्य अधिक नम्र व्हायच्याऐवजी अधिक अहंकारी होत चाललेला दिसतो. तो जगाला तुच्छ समजतो. इतरांशी जुळवून घेत नाही. आपल्या चुकीच्या मतांबद्दलही वेळी तो ठाम राहतो. दुसऱ्याचं म्हणणं ऐकून घेण्याच्या बाबतीत तो साधारणत: उत्सुक नसतो, तर दुसऱ्याकडून शिकण्याची नम्रता तर दूरच राहिली. या आणि अशा अनेक अर्थानं विद्येत रमण्याविषयी माणसानं सावध राहावं, असं उपनिषदं का म्हणतात, हे पटू शकतं.

याचा अर्थ, विद्येच्या मागं माणसानं लागू नये, असा खचितच नव्हे. पण तिची आवश्यकता आणि मर्यादा ओळखून त्यापलीकडं जावं, ही उपनिषदांची दृष्टी आहे. इथं 'विद्या' हा शब्द भौतिक विषयांचं ज्ञान या अर्थानं अपेक्षित आहे. विद्येच्या पलीकडं जाण्याची उपनिषदांची कल्पना जितकी स्वागतार्ह आहे तितकीच अविद्येच्या पलीकडं जाण्याची कल्पनाही स्वागतार्ह आहे. उपनिषदांना अभिप्रेत अविद्या म्हणजे सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं नुसतं अडाणीपण नव्हे, तर अपूर्ण विद्येबरोबरच दिशाहीन आणि अनर्थकारी विद्याही त्यात येतात. थोडक्यात अविद्या म्हणजे अज्ञान, अपूर्ण ज्ञान, स्वार्थमूलक ज्ञान व इतरांच्या विनाशाला कारणीभूत होणारं ज्ञान होय.

पैसा मिळतो म्हणून माणसाच्या प्रकृतीची हानी करणारं तंबाखू किंवा चरसाच्या उत्पन्नाचं ज्ञान हे जितकं शेतकऱ्याला अडाणी ठरवतं, तितकाच वैयक्तिक लाभासाठी मानवजातीचा विध्वंस करणारं 'अणू'चं संशोधन हीसुद्धा अविद्येचीच उपासना ठरते. अज्ञानीपणात स्वार्थाचा धोका आहे, तसा अज्ञानीपणामुळं येणारं धोकादायक धाडसही आहे आणि त्याचबरोबर इतर प्राणिमात्रांविषयी आणि त्यांच्या सुखाविषयी तिरस्करणीय उदासीनताही आहे. तरीही अर्थात चित्तावर भार नसणं, अडाणीपणामुळं प्रामाणिक व नम्र असणं, इतरांकडून शिकण्याची प्रवृत्ती टिकून राहाणं - हे फायदेही आपल्याला गरजेचे आहेत.

या पेचातून बाहेर पडण्यासाठी अविद्या आणि विद्या या दोनही बाबतीतल्या फायद्या-तोट्याविषयी सावध राहाणं आणि दोन्हीच्याही पलीकडं जाणाऱ्या आत्मविद्येच्या उपासनेचं भान ठेवणं - हा उपनिषदांनी काढलेला सुवर्णमध्य आहे. अविद्या आणि विद्या या दोन्हींचं संतुलन जो साधील, तो आत्मविद्येचा उत्तम अधिकारी होईल, यात शंका नाही. अविद्या आणि विद्या यांमध्ये माणसाला सुखी आणि दु:खी दोनही करण्याचं सामर्थ्य आहे, हा अनुभव आहेच, पण माणसाला फक्त आनंदाचाच लाभ करून देणाऱ्या आत्मविद्येची गरज किती आहे आणि तोच आपला खरा मुक्काम आहे, हे आपण सहज ओळखू शकू.

*

३. विद्यांची गरज

आज शिक्षणाचा एवढा प्रसार आहे की, अगदी सामान्य माणसापर्यंत शिक्षण जाऊन पोहोचलेलं आहे. त्यामुळं विद्येची गरज वेगळी सांगण्याची आवश्यकता आहे, असं आपल्याला वाटणारही नाही. अनेक प्रकारच्या विद्याही आज आपल्या डोळ्यांसमोर आहेत. अनेक विषय नुसते परंपरागत दृष्टिकोनानं पाहिले जात नसून, त्यांना एक अभ्यासाची विद्या म्हणूनही आज पाहिलं जातं. जसं शेतीसारखा विषय. तो परंपरागत उद्योग राहिला नसून त्या विषयाचाही शास्त्रशुद्ध अभ्यास करून त्याला कृषिविद्येचा दर्जा आज प्राप्त झालेला आहे. संगणक, जनुकं, नॅनोसायन्स अशा अनेक विद्यांची भर विद्येच्या क्षेत्रात सातत्यानं पडत आहे. अशा वेळी विद्यांची माणसाला असलेली गरज आता पुरेशी पटली आहे, यात शंका वाटत नाही.

यात आपल्या दृष्टीनं विचार करण्यासारखा मुद्दा उपनिषदांच्या संदर्भात मात्र आजही आहे. आज एखाद्या विद्यार्थ्याला 'तू कोणत्या प्रकारची विद्या शिकू इच्छितोस' असं विचारलं, तर एखाद्या हुशार विद्यार्थ्यानं सांगावं, तसं वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकीय अशी ठोकळेबाज उत्तरं तर तो देईलच, पण जरा कमी हुशार विद्यार्थ्यासारखा तो शास्त्र शाखेतल्या किंवा कला-वाणिज्य शाखेतल्या चार-पाच विषयांची नावं सांगून टाकील. ज्यात इंग्रजी, अर्थशास्त्र, अकौंटन्सी, ऑडिट, मायक्रोबायॉलॉजी, रसायन, पदार्थ विज्ञान असे अनेक विद्यांचे अनेक पर्याय आपल्यासमोर धडाधड येऊन पडतील.

यात एखाद्या विद्येला व्यवसाय किंवा नोकरीसाठी त्या त्या काळात वाव कमी असला तर, एकाऐवजी दुसरी अधिक 'स्कोप' असलेली विद्या शिकण्याचीही गरज विद्यार्थ्यांना वाटत असलेली दिसून येईल. पालकांची किंवा मोठ्यांची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. जीवनसंघर्ष सर्वांनाच अटळ असला आणि त्यासाठी पैसा किंवा प्रतिष्ठा देणाऱ्या एकापेक्षा दुसऱ्या विद्येची गरजही माणसाला असली, तरीही माणसाचं आयुष्य सुखी करायला एवढ्याच विद्या पुरेशा आहेत का ? या प्रश्नावर मात्र उपनिषदांचं मत वेगळं आहे आणि ते अत्यंत

महत्त्वाचं आहे. याचं कारण असं की, रसायन किंवा अशा कुठल्याही विद्येत निष्णात होऊन, त्यामुळं खूप पैसा मिळवून, मानमान्यता मिळवून, माणूस आनंदामध्ये आहे असं काही दिसत नाही. याचा अर्थ, त्याला सुखी व्हायला एवढ्या विद्या पुरेशा होत नाहीत.

म्हणून उपनिषदांचं एक सूत्र आहे 'द्वे विद्ये वेदितव्ये' म्हणजे माणसाला दोन विद्या जाणण्याची गरज आहे. एक 'अपरा' म्हणजे लौकिक विद्या व दुसरी 'परा' म्हणजे परमार्थाची, अध्यात्माची विद्या. शौनक नावाच्या शिष्यानं 'अंगिरस' ऋषींना जिज्ञासेनं हा प्रश्न विचारला आहे की, माणसाला सुखी होण्यासाठी किती विद्या जाणण्याची गरज आहे आणि किती विद्या जाणल्यानं खऱ्या अर्थानं पूर्ण जाणल्यासारखं - म्हणजे आजच्या भाषेमध्ये 'सुशिक्षित' होता येतं? त्याचं उत्तर म्हणून अंगिरस ऋषींनी वरील सूत्र सांगितलं आहे.

त्यांचा अभिप्राय असा की, माणूस एका वेळी दोन विश्वात वावरत असतो. तो एकाच वेळी स्थूल किंवा दृश्य शरीरानंही जगतो आणि सूक्ष्म मन, अंत:करण, चित्त अशा विश्वातही जगतो. त्याच्या स्थूल शरीराचं आणि त्या स्थूल शरीरानं तो ज्या दृश्य विश्वामध्ये वावरतो त्या विश्वाचं पोषण होण्याकरता काही विद्यांची गरज असते. त्यांना ते 'अपरा' विद्या म्हणतात. ज्यामध्ये आपण वर उल्लेख केलेल्या सर्व विद्या येतात.

या विद्यांच्या साहाय्यानं उपजीविका करून मनुष्य स्वत:चं आणि कुटुंबाचं पोषण करू शकतो. त्याचबरोबर या विद्यांचा अभ्यास करताना जगाची, इतर माणसांची आणि निसर्गाचीही सोय होते, पोषण होतं आणि वाढ होते. आज जवळपास आपण हे सर्व करतोच आहोत. मग उपनिषदांचं वेगळेपण कुठं आहे ?

ते यात आहे की, या सगळ्या 'अपरा' विद्यांनी माणसाच्या फक्त दृश्य आणि बाह्यांगाचं पोषण होतं, हे त्यांनी अचूकपणे ओळखलं आहे. त्यांचं म्हणणं असं, माणसाचं जे अंतर्विश्व आहे, ज्यामध्ये त्याला सुखाचा किंवा आनंदाचा खरा मूल्यवान अनुभव येतो त्या अंगाचं पोषण, संवर्धन व उन्नयन होईल अशा विद्यांचीही तितकीच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त गरज आहे. म्हणूनच पोटभर खाऊन दु:खात राहण्यापेक्षा अर्धपोटी राहून आनंदात राहणं

मनुष्य जास्त पसंत करतो, हा आपला आजही अनुभव आहे.

दुसऱ्या बाजूनं पाहिलं तर, या साऱ्या 'अपरा' विद्यांवर विजय मिळवलेले जगातले बलिष्ठ देश समाधानासाठी तशा लौकिकदृष्ट्या विकसनशील असलेल्या भारताकडं का धाव घेत आहेत ? यावरूनही माणसाला समाधानी करायला 'अपरा' विद्येबरोबर 'परा' विद्येची आत्यंतिक गरज उपनिषदांना का वाटत होती, ते आजही समजून घेण्यासारखं आहे.

म्हणून माणसानं 'अपरा' विद्येच्या व्यासंगाबरोबरच 'परा' विद्येचा म्हणजेच आपलं स्वरूप जाणण्याच्या किंवा पर्यायानं भगवंताचं स्वरूप ओळखण्याच्या विद्येचा कटाक्षानं अभ्यास करावा. उपनिषदांना हे मान्य आहे की,'अपरा' विद्या शिकल्याशिवाय माणसाला चालणार नाही. पण तेवढं शिकून मी सुखी होईन, अशा भ्रमापासून मात्र उपनिषदं त्याला सावध करीत आहेत. आजच्या आपल्या विद्यांच्या पर्यायांमध्ये विद्यार्थ्यांसमोर काय किंवा समाजासमोर काय, 'परा' विद्येचा विचार फार क्वचितच समोर असलेला दिसेल. त्यामुळं पैसा खूप मिळतो आहे. भौतिक समृद्धीही भरपूर आहे. पण स्वत:चं काय किंवा आजूबाजूच्यांचं काय, समाधान मात्र गायब आहे. या दुर्दैवी वस्तुस्थितीला आपल्याला सामोरं जावं लागतं आहे. आपण जे करतो आहोत, ते एका चाकावर गाडी चालवण्याचा प्रयत्न आहे. म्हणून गाडीचा तोल जातो आहे व ती धडपडते आहे. तो प्रयत्न अयशस्वी होतो आहे. उपनिषदांना 'अपरा' आणि 'परा' अशा दोनही भक्कम चाकावर गाडी चालवायची आहे आणि ते आपल्या आजच्या अनुभवानंही खरं आणि योग्य ठरलं आहे.

तुलनेनं विचार केला तर, दोनही विद्या महत्त्वाच्या असल्या तरी दूरगामी विचार करून उपनिषदांनी लौकिक विद्यांना - 'अपरा' म्हणजे कनिष्ठ आणि स्वत:ला ओळखण्याची विद्या - 'परा' म्हणजे श्रेष्ठ असं का ठरवलं आहे, तेही विचारात घेण्याजोगं आहे.

*

४. शिक्षणातलं शिकण्यासारखं

'उपनिषद्' शब्दाचे जे अनेक अर्थ आहेत, त्यांतला सर्वांत प्रधान, प्रचलित अर्थ 'गुरूनं जवळ बसवून सांगितलेलं ज्ञान' असा आहे. त्या वेळेच्या शिक्षणपद्धतीवर त्यामुळं प्रकाश पडतो. गुरूच्या घरी राहून शिक्षण हा त्यातला प्रधान पाया आहे. शरीरकष्टानं गुरूंच्या आश्रमातली, घरची सर्व कामं करणं, हे त्याचं बाह्य स्वरूप आहे. बाह्य स्वरूप अशासाठी म्हणायचं की, त्या काळी विद्यार्थ्याला किंवा शिष्याला नुसती घरादाराची काही कामं सांगावी एवढा बाह्य हेतू दिसला, तरी तो त्याचा खरा उद्देश नव्हता. त्यात इतर अनेक उद्देश साध्य होत.

त्यांतले आपल्याला लक्षात घेण्यासारखे महत्त्वाचे उद्देश असे - शरीरकष्टानं व सेवेनं अहंकार दूर करणं, चोवीस तास बरोबर राहिल्यानं अखंड शिकण्याच्या वृत्तीत राहण्याचा अभ्यास होणं, विशिष्ट अध्ययनाला विशिष्ट वेळेची अनुकूलता असते - जसं पहाटेचं पाठांतर, सकाळच्या प्रसन्न वेळी झाडाखाली बसून गूढ तत्त्वांचा अभ्यास, संध्याकाळी गायन आणि इतर कलांचा अभ्यास.

अशा तऱ्हेनं अनुकूल अशी वेळ त्या त्या अध्ययनासाठी निवडता येणं, कोणत्याही वेळी निर्माण होणारी शंका निरसन करून घ्यायला गुरू सतत उपलब्ध असणं आणि या सर्वांबरोबर आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे लौकिक शिक्षणापेक्षा गुरूंच्या प्रत्यक्ष जगण्यातून खरं शिक्षण आणि त्याचा अंमल यांतून शिष्याला ज्ञान देणं - अशी अनेक उद्दिष्टं उपनिषदांच्या शिक्षणाच्या या पद्धतीमुळं साध्य होत होती. ही इतकी महत्त्वाची आहेत की, विशिष्ट वेळच्या शाळांचे आणि सामूहिक शिक्षणाचे इतके प्रयोग अलीकडच्या काळात घडूनही विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढायची असेल, तर उपनिषदांच्या पद्धतीच्या 'गुरुकुलां'कडं आपण आज का वळलो आहोत, हे यावरून लक्षात येईल.

त्या काळातल्या अशा 'गुरुकुला'च्या संदर्भातल्या दोन-तीन लक्ष्यवेधी घटना जाणून घेणं आपल्याला उपयोगी पडेल, असं वाटतं. पहिली - त्या

काळातल्या गुरूंची स्वत:ची उपदेशक म्हणून भूमिका. आजच्या शिक्षकांच्या बाबतीत असं अनेकदा घडतं की, शिकवताना विद्यार्थ्यांना अनेकदा शंका येतात. त्या शंका त्या त्या वेळेला विचारता आल्या तर बरं होईल, असं विद्यार्थ्यांना स्वाभाविकपणे वाटतं. यासाठी त्यांनी शंका विचारायच्या ठरवल्या, तर मात्र दोन-तीन प्रतिक्रियांना त्यांना सामोरं जावं लागतं.

एक तर, असे प्रश्न विचारणारे विद्यार्थी शिक्षकांना अडचणीचे वाटतात. आपल्या कामात ते अडवाअडवी करतात किंवा अडथळे उत्पन्न करतात, अशी शिक्षकांची भावना होते.

दुसऱ्या बाजूला, अनेक शिक्षकांना स्वत:चाच विषय पुरेसा आणि सखोल माहिती नसल्यामुळं अशा शंकांना उत्तरं देऊ शकण्याची क्षमता अनेकांकडं नसते. ज्यांना विषय माहिती असतो त्यांना तो पूर्ण सांगण्याची सूक्ष्म भीती वाटते आणि त्याचं रूपांतर रागात होतं. माहीत नसलेली गोष्ट माहीत नाही म्हणण्यामध्ये कमीपणा वाटतो. उलट शिक्षक म्हणून असलेल्या आपल्या तथाकथित प्रतिमेला तडा जाईल, अशीही भीती वाटते. त्यामुळं कित्येक शिक्षक विद्यार्थ्यांना वर्गात प्रश्न विचारायची बंदी करतात. यामधून शिक्षकांमधलं अज्ञान तर कायमच राहतं, पण त्यांची स्वत:ची खोटी प्रतिमा जपण्यात दंभ निर्माण होतो. विद्यार्थ्यांबरोबरच्या संबंधामध्ये अकारण भीती, दबाव अशा नकारात्मक भावना निर्माण होतात.

विद्यार्थ्यांच्या बाजूनं याची आजची परिस्थितीही पाहू. वर पाहिलं त्याप्रमाणं मिळणाऱ्या शिक्षकांच्या वागणुकीमुळं विद्यार्थ्यांच्या मनातला शिक्षकांबद्दलचा आदर कमी होतो. शिक्षणाबद्दलची किंवा त्या त्या शिक्षकांच्या विषयाबद्दलची गोडी आणि उत्सुकता कमी होते. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर मिळालंच पाहिजे असं जरी विद्यार्थ्यांना अपेक्षित नसलं, तरी प्रश्न निर्माण होण्यामध्ये विद्यार्थ्यांची विचार करण्याची जी कुवत आणि जिज्ञासू वृत्ती वाढत असते तिची हानी होते. याला दुसरी बाजूही आहे. आपण शंका विचारण्यानं शिक्षक अडचणीत येतात हे एकदा कळलं की, गरज नसताना व वेळी मूळ विषयाचा अभ्यासही न करता केवळ विचारायची म्हणून शंका विचारण्याकडंसुद्धा काही विद्यार्थ्यांचा कल असतो. तो अर्थातच स्वागतार्ह नव्हे.

याबाबतीत उपनिषदांतल्या घटना काही चांगला प्रकाश नक्की टाकतात. पहिली अशी - एका ऋषींकडं शिकण्यासाठी विद्यार्थी आल्यावर त्यांना ऋषी म्हणतात, 'मी तुम्हाला अवश्य शिकवीन, पण तुम्ही माझ्या आश्रमात श्रद्धेनं, ब्रह्मचर्यानं, तप करून, मौन पाळून एक वर्ष रहा. मग मात्र तुम्हाला जे विचारायचं असेल ते विचारा.' प्रत्यक्षात पुढं असंही घडतं की, एक वर्ष याप्रमाणं राहून ऋषींकडून नंतर विद्या शिकून ते शिष्य ब्रह्मज्ञानी होऊन गेले.

यातून दिसणाऱ्या दोन-तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत की, इथं शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी बुद्धिमत्तेची वगैरे चाचणी घेतली गेली नसून त्यांची अध्ययनासाठी शांतपणे व मौनपणे टिकून राहण्याची क्षमता किती आहे हे पाहिलं गेलं आहे. या एक वर्षाच्या काळात त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरं गुरूंच्या वर्तनातून मिळण्याची संधीही त्यांना दिली गेली आहे. काही अकारण प्रश्न किंवा कमी महत्त्वाचे, गैरलागू प्रश्न डोक्यात असतील तर ते उपस्थित करून स्वत:चा आणि गुरूंचा वेळ दवडणंही थांबवलं आहे. असे अनेक प्रश्न खूपदा तसेच ठेवून दिल्यानं कमी महत्त्वाचे ठरतात किंवा गैरलागू आहेत, हे लक्षात येतं. ही सारी प्रक्रिया विद्यार्थ्यात स्वत: होऊन घडते. त्यातून त्याला प्रश्नाकडं बघण्याची अधिक परिपक्व दृष्टी येते, हेही नोंद घेण्यासारखं आहे.

दुसरी बाजू गुरूंची - हेच गुरू शिष्यांना पुढं म्हणतात की,'हे वर्ष संपल्यावर तुम्ही तुम्हाला पाहिजे तेवढे प्रश्न विचारा. ज्या प्रश्नांची उत्तरं मला माहीत असतील ती मी अवश्य आणि आनंदानं सांगेन, तर ज्यांची उत्तरं मला येत नाहीत त्याबद्दल मी तसं सांगेन.' यामुळं सध्याच्या परिस्थितीत वर पाहिल्या तशा नकारात्मक भावना निर्माण होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. एका ऋषींनी तर विद्यार्थ्याला शंका विचारायला अडवायचं सोडाच, उलट त्याला एक वर दिला आहे. त्या वराचं नाव 'यथेच्छा प्रश्न' असं आहे. यातच सर्व काही आहे. एवढी निकोप दृष्टी आपण शिक्षणात आणू शकलो, तर ते विधायक ठरेल असं वाटतं.

*

५. खरे ब्राह्मण

उपनिषदांचा काळ इतका जुना आहे की, आजच्या काळात प्रचलित असलेल्या आणि मधल्या काळात मनावर ठसलेल्या अनेक गोष्टींचं मूळ स्वरूप समजून घेताना काही वेळा कठीण जातं. आपले पूर्वग्रह किंवा ठाम झालेले संस्कार आड येतात. तरीही आपण तितपत मोकळ्या दृष्टिकोनानं उपनिषदांचा अभ्यास केला, तर आजच्या अनेक कल्पना या चुकीच्या आहेत, किंबहुना निदान त्यावर विचार करण्याची गरज आहे, एवढं तरी लक्षात येतं. काळाच्या ओघामध्ये दुसऱ्याचा फायदा घेण्याच्या प्रवृत्तीमुळं मूळ स्वच्छ आणि शुद्ध असलेल्या गोष्टींचा कसा विपर्यास केला जातो, त्याचीही झलक आपल्याला अशा ऐतिहासिक अभ्यासातून मिळते.

याचा एक छोटासा नमुना म्हणून 'खऱ्या ब्राह्मणांची' उपनिषदांतली कल्पना पाहाण्यासारखी आहे. 'ब्राह्मण' हा शब्द केवळ जन्माधारे आणि जातिबोधक म्हणून वापरण्याच्या आजच्या सवयीच्या पार्श्वभूमीवर उपनिषदांची कल्पना समजून घेणं काहीसं धक्कादायक, पण आपल्याला जागं करणारंही ठरतं. प्रथम हे समजून घेतलं पाहिजे की, मनुष्यजन्माला येणारे सर्वच प्राणिमात्र प्रथम माणूस म्हणून त्या काळात ओळखले जात असत. काही विशिष्ट वृत्ती किंवा गुण असतील तर तो माणूस 'ब्राह्मण' म्हणून पुढचा जीवनप्रवास करायला निघू शके. अशा वेळी अर्थातच वृत्तीमुळं किंवा विशिष्ट तयारीमुळं कुणालाही 'ब्राह्मण' होता येणं शक्य होतं, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

अशा वेळी 'ब्राह्मण' होण्याला सूक्ष्म अभ्यासाची इच्छा व तयारी, सत्याला सामोरं जाण्याचा प्रांजळपणा, आज्ञापालन, कुणाकडूनही शिकण्याची मनाची तयारी, भरपूर शरीरकष्टांची आणि मेहनतीची तयारी आणि आत्यंतिक नम्रता हे गुण असलेली व्यक्ती म्हणजे खरा 'ब्राह्मण' असं उपनिषदं समजतात. या संदर्भात आधार म्हणून उपनिषदातली एक घडलेली घटना पाहाणं उद्‌बोधक ठरेल.

'सत्यकाम' नावाचा एक मुलगा ऋषींकडं जाऊन ब्रह्मविद्या शिकू

इच्छित होता. शिकण्यासाठी आईची परवानगी घेताना त्याच्या घरात त्याचे वडील रहात नसल्यामुळं ऋषींनी विचारल्यास कोणती माहिती द्यावी याविषयी आईला - 'जबाले'ला त्यानं काही प्रश्न विचारले. त्यात त्यानं आपल्या 'कुलगोत्रा'विषयी काय सांगावं, असा प्रश्न विचारला. त्यावर जबाला उत्तरली, 'बाळ, तुझं गोत्र मी जाणत नाही. दुर्दैवी परिस्थितीमुळं मी भटकती सेविका होते. माझं नाव जबाला आहे, म्हणून तू तुझं नाव 'सत्यकाम जाबाल' असं सांग.'

सत्यकाम पुढं 'हरिद्रुमत' ऋषींकडं आत्मज्ञानासाठी गेला आणि त्यांच्याकडं तपश्चर्येनं राहून ज्ञान मिळवण्याचा त्याचा निश्चय त्यानं निवेदन केला. मला हे ज्ञान द्यावं, अशी कळकळीची विनंतीही केली. 'हरिद्रुमत' ऋषींनी नेहमीप्रमाणं त्याची माहिती विचारली. त्यावर त्यानं आपण 'सत्यकाम जाबाल' आहोत, असं सांगून आईनं दिलेला निरोप सांगितला. आपल्याला हे ऐकून आश्चर्य वाटेल की, त्यावर ब्रह्मज्ञानी 'हरिद्रुमत' ऋषींनी त्याला ही विद्या देण्याचं मान्य करताना म्हटलं की, तू खरा 'ब्राह्मण' आहेस. कारण इतका सत्याला सामोरं जाणारा आणि प्रांजळ असलेला माणूसच आम्ही 'ब्राह्मण' समजतो आणि अर्थातच ब्रह्मविद्येचा अधिकारी समजतो.

पुढं तत्कालीन प्रथेप्रमाणं काही दिवस त्याला ठेवून घेतल्यावर 'हरिद्रुमत' ऋषींनी त्याची मुंज करून घेतली. पुढं सेवेच्या साधनेसाठी त्याची परीक्षा पाहण्याच्या हेतूनं आणि त्याला उपदेश मिळण्याच्या हेतूनं चारशे दुर्बल गाई त्याच्या स्वाधीन केल्या. वनात राहून त्यांचं संगोपन करण्याची आज्ञा त्याला दिली. त्या चारशे गाईंच्या एक हजार गाई झाल्यानंतर त्याला पुढील उपदेश मिळेल असंही सांगितलं. ती आज्ञा पाळून बराच काळ 'सत्यकाम' जंगलात राहिला.

अत्यंत निष्ठेनं आज्ञापालन करीत असताना त्याची शिकण्याची वृत्ती ताजी असल्यामुळं त्या कळपातील एका बैलानं त्याला उपदेश देण्याचं ठरवलं आणि आत्मविद्येचा एक भाग त्याला सांगितला. रात्रीच्या वेळी ज्या अग्नीच्या सान्निध्यात तो राहात असे, त्या अग्नीनं त्याची शिकण्याची वृत्ती पाहून त्याला आत्मविद्येचा दुसरा भाग शिकवला. आजूबाजूला विहरणाऱ्या पक्ष्यांपैकी हंस

पुढं येऊन, हंसानं सत्यकामाला आत्मविद्येचा तिसरा भाग सांगितला.

प्रत्येक वेळी या सर्व प्राण्यांनी ज्ञान द्यायची तयारी दर्शवल्यावर त्यांच्याकडून ते घेण्याची सत्यकामाची नम्रता, उत्सुकता आणि एकाग्रता लक्षणीय आहे. याच पद्धतीनं काही काळानं एका साध्या पाणकावळ्यानं त्याला आत्मविद्येचा चौथा भाग दिला. आत्मविद्येच्या या आकलनामुळं सत्यकामाचा चेहरा तेजस्वी दिसू लागला. हजार गाई घेऊन जेव्हा तो हरिद्रुमत ऋषींकडं परत आला, तेव्हा त्याचा चेहराच त्याला मिळालेलं ज्ञान सांगत होता. तरीही खऱ्या ब्राह्मणाला शोभणारी नम्रता आणि शिकण्याची वृत्ती सत्यकामाच्या ठिकाणी तशीच विद्यमान होती. या ठिकाणी आपल्याला दत्ताच्या चोवीस गुरूंची आठवण येईल व त्यांचा अर्थही लागेल.

आत्मज्ञानाच्या एवढ्या प्राप्तीनंतर नम्रतेनं गुरूंना शरण जाऊन मला पशु-पक्ष्यांनी उपदेश दिल्याचं प्रांजळपणे सांगितलं आणि ऋषींना विनंती केली की, तरीही गुरुमुखातून मिळालेलं ज्ञान श्रेष्ठ असतं असं मी शिकलो आहे, तरी आपण मला उपदेश द्यावा. तेव्हा ऋषींनी त्याला आत्मज्ञानाचा अंतिम उपदेश दिला आणि पलीकडं काही न उरल्यानं सत्यकाम स्वतः ब्रह्मज्ञानी गुरू झाला.

या साऱ्या कथेवरून वेद-उपनिषदांच्या काळामध्ये 'खऱ्या ब्राह्मणाची' कल्पना किती वस्तुनिष्ठ, जातिनिरपेक्ष व सरळ होती याचं आकलन आपल्याला होईल. आत्मज्ञान मिळवण्यासाठी जन्मापेक्षाही किंवा जातीपेक्षाही कोणत्या वृत्तीची आणि गुणांची गरज त्या काळात ओळखली जात होती, हे लक्षात घेतलं तर आजचे कितीतरी अकारण दुराग्रह, अहंकार, विघटन आणि वैरभाव नष्ट होतील.

उपनिषदांकडं गेल्याचा एवढा जरी लाभ आपल्याला झाला तरी उपनिषदांचा आजच्या काळातला उपयोग स्पष्ट होईल, असं म्हणावंसं वाटतं.

*

६. माणसांचं उद्‌बोधक वर्गीकरण

माणसामाणसांत इतके प्रकार दिसतात की, त्यांची विभागणी वेगवेगळ्या निकषांवर करण्याचा प्रयत्न अनेकदा होतो. विकसित-अविकसित, मागासलेले-पुढारलेले, सुशिक्षित-अशिक्षित, पौर्वात्य-पाश्चिमात्य, काळे-गोरे, योगमार्गी-ज्ञानमार्गी-कर्ममार्गी, शासक-शासित अशा असंख्य प्रकारे माणसांचं वर्गीकरण ऐतिहासिक काळापासून होत आलं आहे आणि पुढंही होत राहील. उपनिषदांचा अभ्यास करताना असं कुठलं वर्गीकरण उपनिषदांनी केलं नाही का, असा प्रश्न मनात येणं स्वाभाविक आहे. त्याचं उत्तर,उपनिषदांनी असं वर्गीकरण केलं आहे', हे होय.

वरच्या सगळ्या वर्गीकरणांमध्ये वर्गीकरण करणाऱ्याची एक एक दृष्टी दिसून येईल. कधी माणसाचं बाह्य रूप, कधी भौगोलिक स्थान, कधी आर्थिक, सांस्कृतिक स्थिती असे वेगवेगळे दृष्टिकोन अशी वर्गीकरणं करण्यामागं आहेत, हेही आपल्या लक्षात येईल. काही वर्गीकरणं ते करणाऱ्याची खोली, जुजबीपणा, उथळपणा, गरजा अशाही गोष्टी दर्शवतात. मग या पार्श्वभूमीवर उपनिषदांचं वर्गीकरण काय दर्शवतं अशी उत्सुकता वाटणंही स्वाभाविक आहे. ते वर्गीकरण पाहूनच त्याचा अर्थ आपण लावावा, असं म्हणणं योग्य ठरेल.

उपनिषदांनी माणसांचे तीन वर्ग केले आहेत. पहिले - सकाम कर्म करणारे, दुसरे - निष्काम कर्म करणारे आणि तिसरे - नुसतेच जगणारे आणि मरणारे. त्यांच्या दृष्टीनं सकाम कर्म करणाऱ्याला त्याच्या कर्मांप्रमाणं परिणाम भोगावे लागतील आणि त्यासाठी पुन्हा जन्मही घ्यावा लागेल. निष्काम कर्म करणारा शरीराची मर्यादा संपताच मुक्त होऊन जाईल. यातला तिसरा वर्ग मात्र बेसावधपणे जगणाऱ्यांचा, मनुष्यजन्माचं महत्त्व अजिबात न ओळखता, येईल तसा दिवस घालवणाऱ्या व देहाच्या उपभोगात रमणाऱ्या माणसांचा आहे. हे लोक उपनिषदांच्या दृष्टीनं अत्यंत निकृष्ट व तिसऱ्या वर्गातले लोक असून, त्यांना ऋषी क्षुद्र प्राणी किंवा किडे म्हणतात.

ते असंही म्हणतात की, त्यांच्या पुनर्जन्मांना अंत नाही. त्यांचं ध्येय

देहाच्या भुका भागवण्यापलीकडं कधी जात नाही. ते स्वत:च्या सुखसोयीपलीकडं कशाचा विचार करू शकत नाहीत. त्यांना कुठलंही सूक्ष्म विश्व दिसत नाही, कर्मांच्या परिणामांचा ते विचार करीत नाहीत. अशा माणसांना ऋषी 'जायस्व म्रियस्व' (नुसतेच जन्माला येणारे व मरणारे) या वर्गात ढकलतात. उपहासानं त्यांच्याविषयी ऋषी विनोदानं म्हणतात,'या लोकांमुळं स्वर्गात कधीही गर्दी होत नाही.' या लोकांपासून शक्यतोवर दूर राहावं असा ऋषींचा सल्ला आहे.

थोडा विचार केल्यास आपल्या लक्षात येईल की, आज पैशाच्या, सत्तेच्या, करमणुकीच्या, खाण्यापिण्याच्या आणि उपभोगांच्या मागे धावणारा प्रचंड वर्ग या तिसऱ्या वर्गाचाच धनी ठरवावा लागेल ना ?

अशा वेळी उपनिषदांच्या या वर्गीकरणानं सावध होऊन आपण दुसऱ्या किंवा पहिल्या वर्गात कसं राहू शकू एवढा प्रयत्न करणं तरी हिताचं ठरेल.

*

माणसाचे प्रश्न हे अनादि कालापासून बरेचसे तसेच आहेत. याचं कारण माणूस म्हणून त्याची जी मनाची घटना आहे, ती तशीच आहे. मनाचे बाह्य विषय परिस्थितीनुसार, काळानुसार बदलत जातही असतील. जसं रथाच्या जागी आज आलिशान कार आली असेल, भूर्जपत्रांची जागा ग्लॉसी पेपरनं घेतली असेल. पण वाहन बाळगण्याची तीच इच्छा, त्या वाहनाच्या उपयोगाची तीच इच्छा, ते वाहन तुमचं किंवा माझं ही भावना या मात्र त्या काळात होत्या तशाच त्या आजही आहेत. लिखाणाच्या लिपी, भाषा वेगवेगळ्या असतील, काळानुरूप बदलल्या असतील, पण माणसाची व्यक्त होण्याची ओढ, संवादाची गरज, अक्षरांचं प्रेम हे मात्र हजारो वर्षं गेली तरीसुद्धा आजही कायमच आहे, असं दिसून येईल.

म्हणूनच माणसाचे मनामुळं निर्माण होणारे प्रश्न हे त्या काळात जेवढे होते, तसे तेवढे आजही आहेत असं दिसून येईल. उलट एका बाजूनं आपल्याला खूप प्रगती केल्याचंही दिसून येत आहे आणि त्याचा आपल्याला फार मोठा अभिमान आहे. तरीही हेवेदावे, ओढ, असूया, मत्सर, विकार या आणि अशा बाबतीत आपल्याला असं आढळून येईल की, हजारो वर्षांपूर्वी माणूस म्हणून जिथं होतो तिथंच आजही आहोत. किंबहुना बाह्य प्रगतीमुळं सृष्टीतल्या वस्तू आणि त्यापासून माणसानं बनवलेले अगणित प्रकार यांमुळं त्याच्या मनाच्या ओढीला खूप कमी वस्तू 'विषय' म्हणून असल्या तरी आज शेकडो वस्तू 'विषय' म्हणून उभ्या ठाकल्या आहेत.

उदाहरणच बघायचं असेल तर कधीतरी महिन्याभरातून वाट्याला येणारी दशावताराची किंवा रामलीलेची करमणूक कुठं आणि आज चोवीस तासांत एका तासाचीही उसंत न घेता अक्षरशः घरात ओतली जाणारी दूरदर्शनवरची किंवा नेटवरची करमणूक कुठं! एखाद्या रथाचं वाटणारं आकर्षण कुठं आणि आणि हजारो गाड्यांची आजची भूल कुठं !

म्हणजे एका बाजूनं मनाच्या ओढीचे असंख्य विषय व त्यात रोज

पडणारी भर ही एक शोकांतिका आहे, तर दुसऱ्या बाजूला मनाला गुंतवून ठेवणाऱ्या विविध प्रवृत्तींत मात्र कुठलाच फरक दिसत नाही. कुठलीच प्रवृत्ती या सगळ्या प्रगतीमुळं कमी झाल्याचं दिसत नाही, ही दुसरी शोकांतिका आहे. असा आजचा खरा पेच आहे.

आता असा प्रश्न सहजच मनात येईल की, इतकी सगळी प्रगती होताना या प्रश्नावर कुठला उपाय आजवर काढला गेलाच नाही का ? तर तसं नाही. अडचण वेगळीच आहे. पहिली अडचण अशी आहे की, उपनिषदांच्या हजारो वर्षांपूर्वीच्या काळात आनंदासाठी आणि मनाच्या मशागतीसाठी जेवढे उपाय शोधले गेले, जितक्या प्रमाणात प्रयत्न केले गेले, तितक्या प्रमाणात आज प्रश्न कितीतरी पटीनं वाढूनसुद्धा त्या प्रमाणात उपाय आणि प्रयत्न वाढले नाहीत. उलट त्या मानानं ही प्रक्रिया किंवा आत्मविद्येची उपासना वाढण्याऐवजी दुर्लक्षितच केली गेली आहे.

सहज उदाहरणानं पाहायचं,तर वयाच्या २५ वर्षांपर्यंत जवळपास २०-२२ वर्षं लौकिक विद्येचं शिक्षण घेणारा, मनाचं किंवा आत्मविद्येचं शिक्षण किती प्रमाणात घेतो,हे समोर आलं तर, मनुष्य बाह्य पैसा, प्रतिष्ठा, सत्ता अशा लौकिक बाबतीत कितीही यशस्वी असला तरी, शांततेच्या,समाधानाच्या,आनंदाच्या बाबतीत आयुष्यभर का मागं पडलेला असतो, याचं उत्तर आपलं आपल्यालाच मिळेल.

यांतली दुसरी आणि उपनिषदांना महत्त्वाची वाटणारी अडचण आपण सुरुवातीलाच लक्षात घेतली, तर उपयोगी पडेल असं वाटतं. आनंदाच्या आत्मविद्येचं ज्ञान आजच्या प्रगत साधनांच्यामुळं बऱ्याच प्रमाणात वाढलेलं आहे, हे खरं. यांतले नवनवे संशोधक, निरूपणकार, लेखक, त्यांना उपलब्ध असलेली आधुनिक मुद्रणयंत्रणा, प्रसारमाध्यमं या सगळ्यांमुळं हेच उपनिषदांतलं ज्ञान वेगवेगळ्या पंथांच्या माध्यमातून लोकांच्या समोर येत आहे, असं दिसून येतं. अनेकांना या विषयाची, यामधल्या प्रश्नांची, त्यावरच्या उपाययोजनांची माहिती किंवा ज्ञान चांगल्या प्रमाणात आहे असं आढळतं. मग स्वाभाविकपणे त्यांच्या वर्तनावर त्याचा विधायक परिणाम, त्यांच्या आनंदाच्या बाबतीतल्या स्थितीवर चांगला परिणाम का दिसू नये, याचं उत्तर उपनिषदांनी त्यांच्या वेळीच देऊन ठेवलं आहे, ते आजही समर्पक आहे.

उपनिषदांचं म्हणणं असं की, माणसाला ज्ञान आहे व त्या ज्ञानाचं त्याला जर कृतीच्या वेळी स्मरण होत नसेल तर ते ज्ञान व्यर्थ जातं. व्यवहारातसुद्धा एखाद्या व्यावसायिकाला त्याच्या व्यावसायिक ज्ञानाचं व्यवहाराच्या वेळेला विस्मरण झालं, तर ते ज्ञान त्याच्या दृष्टीनं व्यर्थ ठरतं आणि व्यवहारही चांगला होत नाही. एखाद्या डॉक्टरला त्याचा पेशंट पाहताना रोगनिदानाचं व उपचारांचं ज्ञान जर आठवलं नाही, तर ते ज्ञान लौकिकदृष्ट्या त्यालाही उपयोगाचं नाही आणि त्याच्या पेशंटलाही उपयोगाचं नाही. तीच अवस्था आत्मविद्येच्या ज्ञानाच्या बाबतीत आपली स्वत:ची होत आहे.

सुरुवातीला मनाच्या ओढींचा, विकारांचा व त्यामुळं होणाऱ्या हानींचा आपण विचार केला. त्या बाबतीत माणसाला जे काही ज्ञान आहे, त्याचं स्मरण व्यवहारात उपयोग करतानासुद्धा जर त्याला राहिलं नाही, तर ते ज्ञानही व्यर्थ आहे आणि त्यामुळं त्याची दु:खाची, अशांततेची अवस्थाही कायम आहे, असं आढळून येईल. त्याला ते ज्ञान वारंवार स्मरणात ठेवणं, हा एकच साधा उपाय माणसाजवळ आहे, जो वेगवेगळ्या ग्रंथांची पारायणं किंवा पुनरावृत्तीच्या रूपानं मनुष्य करीत आला आहे. त्यातही आपल्याला हे ज्ञान वेळेवर आठवावं या भूमिकेनं आणि जाणीवपूर्वक ही पुनरावृत्ती करण्याचं काम केलं गेलं, तर ते काम उपयोगी पडणार आहे, हे इथं जाताजाता लक्षात घेतलेलं बरं.

या दृष्टीनं उपनिषदांनी सुचवलेला मार्ग हा प्रार्थनेचा आहे. उपनिषदांची प्रार्थना ज्ञानालाही आहे आणि भगवंतालाही आहे. कारण स्मरणात ठेवण्याचे कितीही प्रयत्न केले तरी आयत्या वेळी आठवणं माणसाच्या हातात नाही, हे त्यांच्या हजारो वर्षांपूर्वी लक्षात आलेलं आहे. जिथं माणसाची शक्ती कमी पडते तिथं भगवंताची मदत घेणं म्हणजे प्रार्थना होय. म्हणून ऋषी ज्ञानाला प्रार्थना करतात की, मी जे शिकलो, जे ऐकलं ते कधी मला सोडून न जावो.

या प्रार्थनेचं मोल वरच्या साऱ्या पार्श्वभूमीवर ज्यांना वाटत असेल, त्यांनी रोज अगत्यपूर्वक म्हणायला हरकत नाही की, 'श्रुतं मे मा प्रहासी:' आणि पाहावं की, ही आत्मविद्या वेळेला आठवते की नाही आणि जीवनातलं स्वास्थ्य, आनंद वाढतो की नाही ! खचितच वाढेल अशी उपनिषदांची ग्वाही आहे.

*

८. खरा विद्यार्थी

कुठलाही विषय शिकू इच्छिणाऱ्याला आपण सामान्यत: 'विद्यार्थी' म्हणतो. शिकण्याच्या विद्यांचे अनेक प्रकार आहेत. तसेच विद्यार्थ्यांचेही अनेक प्रकार आहेत. विद्येच्या विषयात नुसतेच प्रकार नसून त्या प्रकारात महत्त्वाच्या दृष्टीनं आणि कठीणपणा-सोपेपणा या दृष्टीनं काही श्रेष्ठ-कनिष्ठ विद्या असाही प्रकार आहे. काही विद्या शिकायला सोप्या, काही अवघड तर काही विद्या काही माणसांपुरत्या, काही विद्या विशिष्ट विभागापुरत्या, तर काही विद्या जीवनाच्या काही टप्प्यापुरत्या मर्यादित असतात. साहजिकच आहे की, त्या त्या विद्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारी कुवत ही कमी-अधिक राहणार.

काही विद्यांच्या बाबतीत काही विशिष्ट प्रकारचा कल, प्रवृत्ती हीसुद्धा वेगवेगळ्या प्रकारची असणं गरजेचं असतं. नोकरीतल्या विविध कामांसाठी किंवा वेगवेगळ्या व्यवसायांसाठी वेगवेगळ्या प्रकारची माणसं त्या त्या जागी अनुकूल असतात. त्या त्या व्यवसायाला आवश्यक योग्यता बाळगणारी माणसं त्या त्या व्यवसायात निवडली गेली, तर अधिक परिणामकारक काम करू शकतात, हे आजचं व्यवस्थापनशास्त्र तसंच मानसशास्त्र सांगत आहे, हे आपल्याला माहीत आहे. त्यामुळंच अशा निवडीसाठी लोकही कसून प्रयत्न करतात, तर निवड करणारेही वेगवेगळ्या लेखी व तोंडी कसोट्या वापरून योग्य माणसाची व योग्य कामाची सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असतात.

थोड्याफार फरकानं ही गोष्ट वेगवेगळ्या विद्या आणि त्या शिकू इच्छिणारे विद्यार्थी यांचा मेळ घालतानाही लागू आहे. म्हणूनच अलीकडं विशिष्ट विद्येसाठी विशिष्ट प्रकारची परीक्षा घेण्याचा प्रघात सुरू झालेला दिसून येतो.

सुरुवातीला ज्या विद्यांच्या प्रकारामध्ये थोडं श्रेष्ठ-कनिष्ठ असण्याचा उल्लेख केला आहे, त्यांचा संबंध एखादी विद्या कमी किंवा जास्त लेखण्याशी नाही. ती विद्या ज्या संदर्भात आहे, त्या गोष्टीचं जीवनामध्ये जे मोल आहे, ते ओळखण्याशी याचा संबंध आहे, हे सुरुवातीलाच स्पष्ट केलेलं बरं. घर स्वच्छ ठेवण्याची विद्या, रुचकर स्वयंपाक करण्याची विद्या, एखाद्या कारखान्याचं व्यवस्थापन करण्याची

विद्या यांमध्ये विद्या म्हणून कमी-जास्तपणा नसला तरी प्रत्येक विद्येचं महत्त्व, गरज, उपयुक्तता आणि तिचं त्या त्या वेळचं जीवनातलं स्थान - यांमध्ये कमी-अधिकपणा राहणं स्वाभाविक आहे.

अशा वेळी वेगवेगळ्या विद्यांची उतरंड लावायची ठरवली, तर ज्या विद्येला सर्वोच्च स्थान पूर्वीच्या काळी होतं आणि आजही आहे, अशी विद्या म्हणजे आत्मविद्या होय. परिस्थितीच्या आणि काळाच्या ओघामध्ये अनेक विद्यांचं स्थान माणसाच्या जीवनात कमी-जास्त महत्त्वाचं ठरत असतं, हे खरं. कधी लौकिक विद्या, कधी पोट भरण्याची विद्या, कधी पैसा देणारी विद्या, कधी मानमान्यता मिळवून देणारी विद्या अशा अनेक विद्यांना माणूस वेगवेगळ्या वेळी श्रेष्ठ ठरवतो, त्यानुसार तो तसा तसा विद्यार्थीही बनतो.

पण या सगळ्याला व्यापून राहणारी आणि जीवनात निर्भेळ आनंद निर्माण करू शकणारी आत्मविद्या ही मात्र सुरुवातीपासून शेवटपर्यंत श्रेष्ठच राहते. कधी कधी माणसाला या वस्तुस्थितीचं आकलन होत नाही आणि तो फसतो, एवढं मात्र खरं आहे. म्हणूनच अनेकदा पैशासारखी वस्तू सर्वश्रेष्ठ ठरवून त्या विद्येच्या प्रयोगात वर्षानुवर्षं काढणारा माणूस खूप श्रीमंत होतो, पण आनंदाच्या बाबतीत कंगाल राहतो. त्या वेळेला आत्मविद्येचं महत्त्व अबाधित का असतं, हे लक्षात येतं.

वर ज्याप्रमाणं वेगवेगळ्या विद्या शिकायला वेगवेगळ्या कुवतीच्या विद्यार्थ्यांची गरज आहे असं म्हटलं, तसं ही आत्मविद्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही म्हणता येईल का ? हा प्रश्न निर्माण होणं स्वाभाविक आहे. हे लक्षात घेण्यासारखं आहे की, उपनिषदांनी या प्रश्नाचा विचार तेव्हाच करून ठेवला आहे. इतकंच नव्हे, तर त्यात आजच्या हजारो वर्षांच्या काळात या प्रश्नांची जी चुकीची उत्तरं दिली जाण्याची शक्यता आहे आणि आज प्रत्यक्ष दिली जाताना आपण पाहातो, त्या बाबतीत उपनिषदांचं त्यावेळी दिलेलं उत्तरही आपल्याला आज सावध करणारं आहे.

आत्मविद्येच्या बाबतीत म्हणजे आनंदप्राप्तीच्या बाबतीत आपली साधारण कल्पना अशी आहे की, ती गोष्ट उतार वयात, निवृत्तीनंतर किंवा फावल्या वेळात मिळवायची विद्या आहे. आत्मविद्या म्हणजे भगवंत मिळवण्याची विद्या, म्हणून ती मिळवणारा विद्यार्थी प्रपंच करून-सवरून थकलेला वृद्ध, लौकिकदृष्ट्या

निरुद्योगी किंवा निरुपयोगी असा काहीसा आहे. आता अशा वयाचे विद्यार्थी ही विद्या मिळवायला जातात तेव्हा त्याचा परिणाम काय होतो, हे आपण रोज आजूबाजूला पहात असतो.

एकतर अशा माणसांची मतं, पूर्वग्रह इतके पक्के झालेले असतात की, नवीन पद्धतीनं विचार करण्याची, आपलं मत चुकीचं असू शकेल हे मान्य करण्याची नम्रता वा मोकळेपणा त्यांच्याकडं उरत नाही. माणसाच्या परस्पर संबंधांतले प्रयोग आणि वृत्तीचे वेगवेगळे प्रयोग करण्यासाठी लागणारं ताजं मन त्याच्याकडं अत्यंत अभावानं आढळतं. त्यामुळं माझ्या जीवनात मी जे शिकलो त्यापलीकडं काही सत्य किंवा भगवंत नाही, इतका ठोकळेबाज निष्कर्ष काढून आणि जगामध्ये दु:ख असंच राहणार, असले निराशाजनक निष्कर्ष काढून या आत्मविद्येच्या तथाकथित विद्यार्थ्यांचं अध्ययन संपतं, हा अनुभव आपणही घेतला असेल.

याउलट, आत्मविद्येच्या खऱ्या विद्यार्थ्याची उपनिषदांना अभिप्रेत असलेली काही लक्षणं आपण वानगीदाखल बघू या. उपनिषदांना अभिप्रेत असलेला विद्यार्थी तरुण आहे. ही विद्या समजून घेण्यासाठी आणि ती मिळवण्यासाठी कोणताही त्याग करण्याची त्याची पूर्ण तयारी आहे. ही विद्या ज्यांनी मिळविली आहे, अशी व्यक्ती वयानं लहान असली, तरी तिला शरण जायची मोकळ्या मनाची तयारी आहे. 'मला हे माहीत नाही', हे कबूल करण्याचा प्रांजळपणा आहे. 'मला याचा मार्ग समजावून सांगा', असं ती विद्या जाणणाऱ्याजवळ नम्रपणानं जाऊन विचारण्याची मानसिक तयारी आहे.

जाणत्यानं घेतलेल्या आवश्यक त्या कठीण परीक्षेला सामोरं जायची तयारी आहे. ज्यांच्याकडून विद्या मिळवायची त्यांच्याकडं जाण्यासाठी शारीरिक त्रास, तसंच मनाच्या तपाचा मानसिक त्रास आनंदानं सहन करण्याची तयारी आहे. आत्मविद्या देणाऱ्याकडून इतर काहीही मिळवण्याची अपेक्षा नाही. ही विद्या शिकतानासुद्धा स्वत:ची मतं, स्वत:चे आग्रह, स्वत:चा अनुभव बाजूला ठेवणं किंवा इतरांची अकारण भीती न बाळगणं अशा स्वरूपाचं मानसिक धाडस आहे. असा हा उपनिषदांचा आत्मविद्येचा 'खरा विद्यार्थी' आहे.

अशा एका खऱ्या विद्यार्थ्याची -नचिकेताची- प्रशंसा करताना आत्मविद्येचे अधिकारी यमदेव म्हणतात, 'तुला मी अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी देण्याचं

आश्वासन दिलं, ज्या गोष्टीला सामान्य मनुष्य चटकन भुलतो असा अपार पैसाही मी तुला देऊ केला, या कुठल्याही प्रलोभनाला तू बळी पडला नाहीस, त्यावरून तू ही विद्या मिळवायला लायक आहेस, असं मी समजतो.'

आत्मविद्येच्या खऱ्या विद्यार्थ्याची उपनिषदांची ही अपेक्षा जर तरुणपणी किंवा लवकर वयात सर्वांपर्यंत पोहोचली, तर वृद्धपणी नव्हे तर अवघ्या आयुष्याची वाटचाल या विद्येच्या योगानं आनंदाची होईल, यात शंका नाही.

*

९. स्वार्थाची सीमारेषा

माणसाच्या जीवनात देवत्वाची दिशा यावी, त्याचं वैयक्तिक जीवन, सामाजिक जीवन, व्यक्तिगत व कौटुंबिक संबंध या सर्वांत स्वास्थ्य राहावं यासाठी सर्वांना बरोबर घेऊन जाऊ शकणारी एखादी आचारपद्धती माणसाला देण्यासाठीची व्यवस्था म्हणजे 'धर्म' होय. त्यामुळं प्रामुख्यानं धर्मामध्ये वैचारिक भागाबरोबर आचारपद्धतींचा विचार जास्तीत जास्त केलेला आढळून येतो. अधिकाधिक आदर्श आचार घालून देण्याचा धर्माचा प्रयत्न असतो. असं आदर्श आचरण करताना प्रत्येक माणसाला त्याच्या त्याच्या प्रवृत्ती आणि स्वार्थ यांना मुरड घालावी लागते. क्वचित प्रसंगी आपद्धर्म म्हणून व्यक्तिगत गरजेचं आचरण करण्याची स्थितीसुद्धा निर्माण होऊ शकते.

मात्र व्यक्तिगत स्वार्थाचा विचार अशा एखाद्या आपद्धर्माच्या निमित्तानं सुरू झाला आणि स्वार्थाला बळी पडून तो जर तसाच ताणला गेला, तर माणूस इतरांच्या हिताचा विचार कधीच विसरून जातो आणि हा बोकाळलेला स्वार्थ कधी व्यक्तीचंही हित करू शकत नाही आणि समाजाचंही नाही. अनेकदा व्यक्तिगत स्वार्थापोटी पैसा, सत्ता किंवा तशाच एखाद्या आकर्षणामुळं माणूस समाजाचाही बळी देऊ शकतो. याची असंख्य उदाहरणं आपल्याला आजही आढळून येतात. विविध प्रकारच्या घोटाळ्यांच्या निमित्तानं त्याची एक दुर्दैवी मालिकाच आपल्या मायभूमीत सुरू असल्याचंही आपल्याला ठळकपणे आढळेल.

अशा वेळी अधर्म बोकाळल्याची तक्रार अनेक जण करतात, पण व्यक्तिगत स्वार्थ आणि धर्माचं आदर्श वर्तन यांतली सीमारेषा ठरवण्याचे कसोशीचे प्रयत्न मात्र क्वचित दिसतात. दुर्दैवानं खरा घोटाळा ही स्वार्थाची सीमा ठरवण्यातच आहे. म्हणूनच स्वत:च्या आत्यंतिक स्वार्थी वर्तनाचं समर्थन कुणीही केव्हाही करताना दिसतो. परिणामी व्यक्तीचं आणि समाजाचं मात्र अंतिमत: नुकसान होतं. अशा वेळी उपनिषदांतली एक छोटीशी गोष्ट आपल्याला आजही मार्गदर्शक ठरू शकेल, असं म्हणावंसं वाटतं.

त्या काळात कुरू देशामध्ये टोळधाडीमुळं पिकांची मोठी नासधूस झाली.त्यामुळं

लोकांना अन्नधान्याची टंचाई पडली, पर्यायानं ऋषींनाही भिक्षा मिळणं कठीण झालं. एके दिवशी संध्याकाळपर्यंत पोटात अन्नाचा कण नसल्यामुळं 'चाक्रायण' नावाच्या ऋषींचे प्राण कंठाशी आले.

अशा वेळी त्यांना कुळीथ खात असलेला एक माहूत दिसला. त्यांनी त्या माहुताला त्याच्यातले थोडे कुळीथ देण्याची विनंती केली. तो माहूत म्हणाला,'माझ्याकडं अजून कुळीथ नाहीत. जे आहेत ते सर्व मी खायला घेतले आहेत.' तेव्हा चाक्रायणांनी त्याच्या पानातलेच थोडे देण्याची त्याला काकुळतीनं विनंती केली. त्यावर त्या माहुतानं तत्परतेनं त्यातलेच दोन घास त्यांना दिले. चाक्रायणांनी ते खाल्ले. त्यांच्या जीवात जीव आला. त्यावर माहुतानं विचारलं,'वर माझ्यातलं थोडं पाणी पिणार ना?' चाक्रायण म्हणाले,'उष्टं पाणी पिणं बरोबर होणार नाही.'आश्चर्य वाटून माहूत म्हणाला,'मग उष्टे कुळीथ तुम्ही कसे खाल्ले?' त्यावर चाक्रायण म्हणाले,'जीव जगवण्यासाठी मला त्याची गरज होती.आता एकदा जिवंत राहिल्यावर धर्म पाळणं हे माझं पहिलं काम आहे.म्हणून आचाराच्या धर्माप्रमाणं मी हे पाणी पिणं योग्य होणार नाही.'

या कथेमधून, स्वार्थाची अपरिहार्य असलेली कृती नेमकी कुठं संपते आणि आचारधर्माची जबाबदारी कुठून सुरू होते, याची कल्पना आपल्याला येऊ शकेल, असं वाटतं. याचा थोडासा व्यावहारिक व सामाजिक उपयोगही आपण पाहू. एखादा व्यवसाय करणारा त्याच्या कौटुंबिक गरजांसाठी व्यवसाय सुरू करतो. नफा मिळवीत जातो. एका विशिष्ट मर्यादेनंतर त्याच्या वैयक्तिक, प्राथमिक गरजा पुऱ्या होतात. अशा वेळी ग्राहकांच्या हितासाठी मालाचा भाव शक्य तेवढा कमी ठेवणं, कामगारांच्या हितासाठी त्यांना आर्थिक किंवा इतर सवलती देणं, इतकंच काय, आधी प्राथमिक गरजा पुऱ्या करण्याकरिता कुटुंबाला वेळ देता येत नसेल, तर आता तो वेळही त्यांना देणं-अशा तऱ्हेच्या धर्माचरणाची वेळ आता आलेली आहे - ही सीमारेषा ओळखली, तर पैशाच्या मागं लागून, अतिरेकी धंदा करून कुटुंबाचं, कामगारांचं, ग्राहकांचं आणि पर्यायानं शेवटी स्वत:चंही अहित होण्याचा धोका वेळीच टाळला जाऊ शकेल.

अशा तऱ्हेनं या सीमारेषेचं आकलन होणं अनेक क्षेत्रांमध्ये आपल्याला गरजेचं आहे. ते आकलन करून त्यानुसार वागणं सर्वांच्या स्वास्थ्याचंही आहे.

*

ज्ञान ही गोष्ट माणसाला अगदी सवयीची झालेली आहे. मनुष्य कसाही असला, कुठंही असला तरी त्याला कशा ना कशाचं तरी ज्ञान असतं. ज्ञानाच्या एका प्रकारच्या सवयीमुळं त्याचा वेगळा विचार करण्याची माणसाला गरज वाटत नाही. आपल्या घरातला, रोजचा माणूस असला म्हणजे जसं त्याला आपण गृहीत धरतो, त्याचा वेगळा आणि रोज विचार करण्याची आपल्याला आवश्यकता वाटत नाही, तसंच काहीसं हे आहे. अर्थात हे हिताचं ठरत नाही, हे आपल्याला व्यवहारातसुद्धा अनुभवायला येईल.

याचं कारण असं की, जिवंत मनुष्य घेतला तर त्याच्या ठिकाणी रोज शारीरिक, मानसिक बदल अपरिहार्यपणे घडत असतात. साहजिकच त्यानुसार त्याच्या धारणा, नातं, वागण्याची पद्धत या गोष्टींवरही परिणाम होतो. घरातला मनुष्य मात्र 'त्याला मी ओळखतो' या समजुतीत राहिला, तर घरातल्या माणसात झालेला बदल तो स्वाभाविकपणे समजून घेऊ शकणार नाही. आजवरच्या त्याच्या अनुभवाला धरूनच तो त्याच्याशी वागायला जाईल. असं करण्यामध्ये ते वागणं तर बरोबर होणार नाहीच, पण त्याचबरोबर त्या माणसावरही अन्याय होईल. त्याच्याकडूनही चुकीच्या प्रतिक्रिया मिळतील. एकूण यातून चांगले, आदर्श किंवा उपयोगी संबंध होण्याऐवजी त्यात गोंधळ, अकार्यक्षमता, गैरसमज यांचीच भर पडेल.

ही गोष्ट एखाद्या जिवंत व आपल्याबरोबर असणाऱ्या माणसाबद्दल झाली, तर जगातल्या असंख्य इतर जीवांबद्दल आपल्या ज्ञानाची परिस्थिती काय असेल, याची कल्पनाच केलेली बरी. त्यातही पुन्हा हे नुसतं सजीव सृष्टीला लागू आहे,असं नाही.जड सृष्टीचा प्रचंड पसारा या जगामध्ये भरलेला आहे.साधा आपल्या घराचा दगड घेतला, तरी त्याची घनता, त्याचा ठिसूळपणा, त्याचा टिकाऊपणा, त्याची विविध प्रकारची उपयुक्तता, त्याच्यात होणारे नैसर्गिक बदल - अशा असंख्य गोष्टींपैकी आपल्याला नक्की किती ज्ञान असतं, ही शंका येण्यासारखीच गोष्ट आहे. मग इतर जड गोष्टी आणि त्यांचं ज्ञान दूरच राहिलं.

या सगळ्या पार्श्वभूमीवर खरं म्हणजे आपण आपल्या ज्ञानाकडं पाहिलं पाहिजे. पण सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं आपलं ज्ञान ही आपल्याला इतकी जवळची आणि परिचित वस्तू झाली आहे की, तिच्याबद्दल शंका घेण्याचं किंवा विचार करण्याचं आपल्या मनातसुद्धा येत नाही, नाही का? पण थोडंसं सावध झालो, तर असा विचार करण्याची गरज आणि त्याची उपयुक्तता आपल्याला खचितच पटू शकेल.

जाताजाता हे लक्षात घेतलेलं बरं की, वरच्या उदाहरणाबद्दल एखादा म्हणेल की, जगातल्या सगळ्या माणसांचं किंवा जगातल्या सगळ्या जड वस्तूंचं ज्ञान असण्याची मला कुठं गरज आहे ? ते ज्ञान मला नसलं तरी चालतं. किंबहुना जवळच्या सजीव किंवा निर्जीव घटकांच्याबद्दलचं सगळं ज्ञान घेणं, मला एका परीनं शक्यही नाही आणि दुसऱ्या परीनं मला त्याची गरजही नाही. तर यावर असं म्हणता येईल की, असं ज्ञान सर्व जगाबद्दलचं आवश्यक नाही ही गोष्ट खरीच आहे. जवळच्या जगाचंसुद्धा सगळं ज्ञान घेणं शक्य नाही, हेही खरं आहे. पण या दोन्हीही गोष्टी मला शक्य नाहीत याचं तरी ज्ञान घेण्याची मला गरज आहे. इतकंच नव्हे, तर जवळच्या सजीव किंवा निर्जीव वस्तूंशी वागताना निदान अशा तऱ्हेची नम्र जाणीव ठेवण्याची मला गरज आहे, हे मात्र नक्की.

तिसरा मुद्दा म्हणजे या सगळ्या ज्ञानाचा मला काहीच उपयोग नाही असं नसून सगळ्या ज्ञानाची मला वस्तुतः गरज आहे. कारण ज्ञानावर माझं वर्तन ठरतं आणि वर्तन बरोबर असण्यासाठी ज्ञान पूर्ण असण्याची गरज असते. आता आधी म्हटल्याप्रमाणं, ज्ञान पूर्ण होणं शक्य नसलं तरी आपल्या अज्ञानाची जाणीव जरी दुसऱ्याशी व्यवहार करताना ताजी ठेवली, तरी माझं ज्ञान या एका प्रकारे पूर्ण होऊन माझं वर्तन आदर्श होऊ शकतं.

आता या पार्श्वभूमीवर आपला आजचा व्यवहार पाहू. आपली घरातली जवळची माणसं, व्यवसाय नोकरीतली रोजचा संबंध असलेली माणसं, आपले नातेवाईक, आपल्या जवळपासचा समाज, आपल्या अभ्यासाचे विषय, इतकंच काय, आपल्या देशाची परिस्थिती, त्यावरच्या उपाययोजना याबद्दल आपल्याला परिपूर्ण ज्ञान असल्याच्या भ्रमात सर्वसामान्य मनुष्य आयुष्यभर वावरतो.

आता वर सांगितलेल्या अज्ञानाच्या जाणिवेच्या पार्श्वभूमीवर व्यवहार करण्याची इतकी गरज असताना सगळं माहीत असल्याच्या भ्रमात आयुष्यभर केलेला व्यवहार किती चुकीचा असू शकेल, याची कल्पनाच केलेली बरी. त्यामुळं अगदी साध्या कौटुंबिक संबंधांतसुद्धा माणूस सौहार्दपूर्ण, शांत, समजूतदार, एकमेकांना प्रगतीला पूरक, निर्भय असा संबंध किंवा व्यवहार करू शकत नाही. हा परिणाम कित्येक ठिकाणी दिसून येईल. म्हणून वैयक्तिकदृष्ट्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस साजरा करूनसुद्धा दोघंही परिपक्व व्यक्ती बनू शकत नाहीत. हे दुर्दैवी सत्य आहे. मग इतर सामाजिक संबंधांचं काय होत असेल, ते आपल्याला कळू शकेल. म्हणून आपल्याला जे ज्ञान आहे, त्याची तपासणी करण्याची आपल्याला ज्या दिवशी बुद्धी होईल तो सुदिन आहे, असं म्हणायला हरकत नाही. ही झाली गोष्ट साध्या साध्या प्रापंचिक ज्ञानाबद्दलची. या सगळ्या पलीकडं जाण्याची विद्या - आत्मविद्या किंवा तिचा अभ्यासाचा विषय भगवंत किंवा ब्रह्म - या सगळ्या गोष्टींबद्दल आपलं ज्ञान आणि त्याची अवस्था काय असेल, याचा विचार करण्याची मोठी गरज आहे.

कारण तिथंही एखादा ग्रंथ वाचला, चार प्रवचनं ऐकली किंवा केली, कुठंतरी थोडाफार गुरूला शरण गेला, थोड्या भजन-पूजन-यात्रा केल्या, थोडी भगवंताची झलक एखाद्या अनुभवाच्या रूपानं मिळाली की, माणसाला आपल्याला ब्रह्मज्ञान झाल्यासारखंच वाटायला लागतं आणि अर्थातच पुढं तो ते ज्ञान जगाच्या उद्धारासाठी वाटीत सुटतो. यात त्याची शोकांतिका होते आहे, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

अगदी साधी गोष्ट आहे की, जी वस्तू दगड किंवा माणसासारखी आपल्याला प्रत्यक्ष दिसते आहे, तिचं परिपूर्ण ज्ञान होण्यात एवढ्या अडचणी आहेत, तर अत्यंत विशाल, अत्यंत सूक्ष्म आणि सदैव अदृश्य असलेल्या ब्रह्माच्या किंवा भगवंताच्या बाबतीत आपल्याला परिपूर्ण ज्ञान होणं किती कठीण आहे ! उलट त्या बाबतीत ज्ञान करून घेण्याची धडपड आयुष्यभर करीत असावं. शिवाय ती करतानाच आपल्या अज्ञानाची तीव्र जाणीव बरोबर बाळगली तरच आपला निभाव लागेल आणि त्या संबंधातला व्यवहार योग्य होईल.

यासाठी उपनिषदांनी दोन-चार चांगली सूत्रं आपल्यासाठी दिली

आहेत. 'ज्याला चांगलं कळतं आहे, असं वाटतं त्यानं स्वत:ला काही कळत नाही, हे लक्षात ठेवावं', 'मला हे कळणं कठीण आहे किंवा मला हे कळत नाही हे ज्याला कळतं आहे, त्याला थोडंफार कळू लागलं आहे, हे त्यानं लक्षात ठेवावं.', 'खरं ज्ञान हे दररोज थोड्या प्रयत्नानं आणि अनुभवानं सतत वाढत जात असतं, याचं भान ठेवावं.'

ही सूत्रं लक्षात ठेवून जर मनुष्य जड सृष्टीशी व्यवहार करील, एकमेकांशी व्यवहार करील, तर तो अधिक आदर्श व्यवहार करू शकेल, हे उघड आहे. याच पद्धतीनं तो जर गुरू किंवा भगवंताशी व्यवहार करील, तर तो व्यवहारही आदर्श होईल आणि हे सर्व व्यवहार माणसाला नित्य, नूतन आनंदात ठेवतील आणि त्याचं आजचं निराशा, भय, अशांतता, दु:ख, अनिश्चितता, कोरडेपणा या सगळ्यांनी भरलेलं आयुष्य चांगल्या अर्थानं पालटू शकेल, असा विश्वास वाटतो.

*

११. झाकलेला ईश्वर

घरोघरी देवांची पूजा चालते तशीच ती एका घरी सुरू होती. अडचणींच्या जागेत, छोट्याशा देव्हाऱ्यात. पूजा करणाऱ्याचा उत्साह मात्र चांगला. फुलं भरपूर. उत्साहानं देवावर घालायचं काम सुरू होतं. देव लहानसर असल्यामुळं व फुलं भरपूर असल्यामुळं आणि त्याहीपेक्षा फुलं घालताना भान न राहिल्यामुळं जेव्हा पूजा संपली आणि नमस्कार करायची वेळ आली, तेव्हा देव दिसेनासे झाले होते. म्हणजे जी फुलं देवाची शोभा वाढवण्याकरता, त्याच्याबद्दल आदर व्यक्त करण्याकरता घातलेली होती, त्या फुलांनी अखेरीस त्या देवाची मूर्तीच झाकून टाकली आणि पूजेनंतर देवदर्शनानं प्रसन्न होण्याऐवजी ईश्वर झाकला जाऊन त्याचं दर्शनच दुर्लभ झालं.

उपनिषदांत या संदर्भात ऋषींनी जे म्हटलं आहे, त्याची या ठिकाणी आठवण होते. अर्थात ऋषींचं म्हणणं हे नेहमी सूत्रमय असल्यामुळं त्यात कितीतरी अर्थ भरलेला असतो. तो अर्थ जेव्हा आपल्यासमोर उलगडत जातो आणि अनुभवानं पटत जातो, तेव्हा त्यांतल्या अर्थाच्या छटा कळतात आणि त्याचं खरेपणही समजत जातं. असंच या सूत्राच्या बाबतीत होतं.

ऋषी म्हणतात,'सत्य किंवा खरा ईश्वर सोन्याच्या पात्रात झाकलेला आहे. ते तुम्ही बाजूला केलंत, तर तुम्हाला त्याचं दर्शन होईल.'

या सूत्रात दोन बाजू येऊन जातात. एक बाजू अशी की, ईश्वर किंवा सत्य हे सहज दिसण्याइतकं उघडं किंवा दृश्य स्वरूपात नाही. ते अदृश्य, सूक्ष्म किंवा झाकलेलं आहे आणि दुसरी बाजू अशी की, भगवंताला झाकणाऱ्या अनेक गोष्टी आहेत की, ज्या त्याच्या दर्शनाच्या आड येतात. हे लक्षात घेऊन, सावध राहून, त्या दूर करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. पुढं या सूत्रात म्हटल्याप्रमाणं या बाबतीतही आपले प्रयत्न कमी पडले, तर त्यात मदत करण्यासाठी भगवंतालाच प्रार्थनाही करावी लागेल.

आता या दोन्हीही बाजूंचा आपण आजच्या संदर्भात थोडा अधिक विचार करू या. अनेकांना अलीकडं असं वाटतं की, या सृष्टीचा चालक जर

ईश्वर आहे, तर तो आपल्याला इतर वस्तूंसारखा सहज समोर दिसावा. कुणालाही तो पाहता येण्यासारखा असावा. तर त्यांनी हे जरूर लक्षात ठेवावं की, अधिकाधिक सामर्थ्यवान गोष्ट ही सूक्ष्म होत जाते. साहाजिकच ती पाहायला दुर्लभ होत जाते. साधे सूक्ष्म जीवजंतू पाहायला आपले तथाकथित सामर्थ्यवान डोळे दुबळे पडतात आणि सूक्ष्मदर्शक यंत्र मदतीला घ्यावं लागतं, तर जी वस्तू सर्वांत सूक्ष्म आहे ती पाहायला माझे डोळे पुरे पडावेत, असं म्हणणं हास्यास्पद नाही का? जंतू पाहायला सूक्ष्मदर्शक यंत्राची मदत घ्यावी लागते, तर सूक्ष्मात सूक्ष्म असा ईश्वर पाहायला कशाची तरी मदत घ्यावी लागेल, एवढं तरी नक्की ना?

दुसरी बाजू निर्मिती आणि कर्त्याची. साधी लौकिक व्यवहारातील इमारत घेऊ. ती आपल्याला समोर उघड्या डोळ्यांनी दिसत असली आणि स्वाभाविकपणे तिचा कर्ता कोणीतरी आहे, हे नक्की दिसत असलं, तरी तो त्यापेक्षा वेगळा असतो. तो त्या इमारतीत नसतो आणि दुसरीकडं कुठंतरी शोधावा लागतो, हे साधं व्यावहारिक सत्य आहे. तर या सृष्टीचा कर्ता ईश्वर हा कुठंही सापडो, तो एकतर नुसत्या उघड्या डोळ्यांनी सृष्टीत दिसत नाही आणि महत्त्वाचं म्हणजे तो कोण आहे आणि कुठं आहे, याचा निदान वेगळा शोध घेण्याची गरज आहे, हे तरी मान्य करावं लागतं.

आता दुसऱ्या बाजूचा विचार करू या. उपनिषदांनी अत्यंत प्रगल्भतेनं 'भगवंत आणि ईश्वर किंवा ब्रह्म म्हणजेच सत्य' असं मानलेलं आहे. तेव्हा सत्याचं दर्शन म्हणजेच ईश्वराचं दर्शन आहे. आजच्या व्यवहारातलं उदाहरण पाहायचं म्हटलं, तर कुठल्याही एखाद्या घटनेत न्याय मिळवण्यासाठी दोन पक्ष जेव्हा न्यायालयात जातात तेव्हा सत्यशोधन सुरू होतं. आता ते करण्यासाठी दोन्ही बाजूंनी वेगवेगळे पुरावे समोर आणले जातात. त्याचा खरेखोटेपणा तपासून पाहिला जातो आणि त्यांतला खरा पुरावा स्वीकारला जातो.

तिसऱ्या बाजूला कायद्याचे नियम उभे असतात. ते नियम आणि स्वीकारलेला पुरावा आणि त्यांची सांगड घालणाऱ्या न्यायाधीशाची बुद्धी यांवर मूळ घटनेचं सत्यत्व ठरतं. आता हे उघडच आहे की पुरावा, कायदा आणि न्यायाधीशाची बुद्धी या तीनही गोष्टींनी मूळ घटना झाकली आहे. त्यामुळं अनेकदा खटल्याचा निकाल होऊनसुद्धा तो सत्यच आहे, याची खात्री देता येत नाही. उलट अनेकदा सत्य गोष्ट कधी पुढंच येत नाही. कारण या तीन किंवा अशा अनेक गोष्टींनी

ते सत्य झाकलेलंच असतं.

ही गोष्ट साध्या लौकिक व्यवहारातल्या एका घटनेची, तर मूळ सत्यमय ईश्वर पाहायचा तर तो कशाकशानं झाकला असेल याची कल्पनाच केलेली बरी. मूळ ईश्वराच्या दर्शनाच्या आड अत्यंत वाईट गोष्टीपासून अत्यंत चांगल्या गोष्टीपर्यंत कुठलीही गोष्ट आड असू शकेल. आपण एखाद्या गोष्टीविषयी आपलं मत ठरवतो ती खरी खोटी, चांगली वाईट ठरवतो त्या वेळी आपल्यावर आजपर्यंत झालेले संस्कार, आपले दृष्टिकोन, मतं ही नाही का आड येत ? म्हणूनच आपल्याला तसं वाटत नसलं तरी आपण ज्या गोष्टीला चांगलं किंवा खरं ठरवतो, त्याच गोष्टीला दुसरा वाईट किंवा खोटं ठरवतो - हा आपला व्यवहारातला अनुभव नाही का ? त्यातही मौज अशी की, एकानं चांगली आणि दुसऱ्यानं वाईट ठरवलेली वस्तू प्रत्यक्षात कदाचित दोन्हीही नसते आणि तिचं स्वरूप काही वेगळंच असू शकतं. अशा वेळी त्या वस्तूचं स्वरूप माझ्या किंवा इतरांच्या संस्कारांनी, पूर्वग्रहांनी, मतांनी झाकलेलं आहे, असं म्हणणं खरोखरच समर्पक आहे.

हीच गोष्ट आपण थोडी वरच्या पातळीवर पाहू. समजा, मी एखाद्या पक्षाचा सभासद आहे. दुसऱ्या पक्षानं एखादा चांगला कार्यक्रम किंवा चांगलं मत मांडलं आहे. एखादी खरी गोष्ट समोर आणली आहे. असं असलं तरी, ती गोष्ट माझ्या पक्षाची नाही, माझ्या युनियनची नाही, म्हणून आपण वाईट अथवा खोटी ठरवतोच ना? अशा वेळी त्या गोष्टीचं खरेपण माझ्या पक्षाच्या अभिमानानं किंवा बांधिलकीनं झाकलं गेलेलं आहे. या ठिकाणी ही बांधिलकी म्हणजेच ऋषींना अभिप्रेत असलेलं 'सोन्याचं पात्र' होय.

या वेळी आपल्याला याची आठवण होईल की, डोळ्यांदेखत घडलेल्या नैसर्गिक आपत्ती किंवा उत्पातांच्या प्रसंगी ती घटना किंवा त्या प्रसंगी करावी लागणारी मदत सत्य असूनही 'सर्वांनी पक्ष बाजूला ठेवून मदत कार्यात सहभागी व्हावं' असं आपल्याला आवाहन करावं लागतं. यातच सत्य कसं झाकलं जातं, याचा अनुभव स्पष्ट आहे. मग ते पात्र पक्षाचं असो, जातीपातीचं असो, मतांचं असो की आग्रहाचं असो.

ऋषींनी मात्र प्रतीकात्मकपणे या ठिकाणी सोन्याच्या पात्राचा उल्लेख केला आहे. कारण उघड आहे की, व्यक्तीला सर्वांत जास्त सोन्याचं किंवा पैशाचं आकर्षण

आहे. या आकर्षणापोटी त्याला भगवंत पारखा होणार आहे, हे ते जाणतात. माणूस पैशासाठी किंवा सोन्यासाठी वेळी भगवंतसुद्धा दूर करील, हे ते ओळखून आहेत. भगवंताच्या आड असं जे जे काही येईल, ते ते दूर व्हावं आणि त्याला भगवंताचं दर्शन व्हावं, अशी त्यांची इच्छा आहे. ही इच्छा अंतिमत: माणसाच्या कल्याणाचीच आहे, हे वेगळं सांगायला नको.

चांगल्या गोष्टीसुद्धा भगवंताच्या आड येऊ शकतात, हे सुरुवातीलाच दिलेल्या फुलांच्या उदाहरणावरून स्पष्ट होण्यासारखं आहे. फुलांच्याऐवजी त्या ठिकाणी आड येणारी गोष्ट म्हणजे एखादा सत्कर्मांचा डोंगर असू शकतो, कठोर तपश्चर्या असू शकते, हट्टानं केलेली समाजसेवा असू शकते, मठ, मंदिरं, सगुणात अडकणं, कर्मकांडं करणं - काहीही असू शकतं.

ईश्वराच्या दर्शनाची इच्छा बाळगणाऱ्यांनी या बाबतीत सावध राहिलं तरी त्यांचा प्रवास सुखरूप होईल, यात शंका नाही.

*

१२. खरी वैज्ञानिकता

आधुनिक विज्ञानाचा उगम जिथून मानला जातो, ती छोटीशी गोष्ट बहुतेक सर्वांना परिचित असेल. प्रत्येक गोष्टीचं खरेखोटेपण ग्रंथांचा आधार घेऊन बघायची परदेशात पद्धत होती. साहजिकच आजूबाजूची परिस्थिती, प्रयोगशीलता, प्रत्यक्ष अनुभवानिष्ठित ज्ञान हे दुरापास्त झालेलं होतं. प्रश्न साधासाच होता की, घोड्याला किती दात असतात? सात दिवस चर्चा आणि वेगवेगळ्या ग्रंथांतले दाखले, मतं-मतभेद-दावे होऊनही प्रश्नाचा निकाल लागेना. तेव्हा एका माणसानं प्रत्यक्ष एक घोडा त्या वादाच्या ठिकाणी खेचून आणला आणि सर्वांसमक्ष त्याचं तोंड उघडून दात मोजले. वादाचा निर्णायक आणि खरा निकाल तिथंच लागला.

ही गेल्या दोन-तीनशे वर्षांतली गोष्ट आहे आणि असं मानण्यात येतं की, प्रत्यक्ष प्रयोगाधिष्ठित अनुभवाधारे सत्य शोधण्याची वैज्ञानिक पद्धत तिथून सुरू झाली. तिचा पुढं विकास होऊन प्रयोगशाळा आणि आजची वैज्ञानिक दृष्टी आकाराला आली. या प्रयोगशील दृष्टीनं प्रत्येक गोष्टीकडं पाहाणं हे जरूरच स्वागतार्ह आहे. फक्त एक दोन गोष्टी त्यामुळं निर्माण झालेल्या दिसतात. त्यांचा विचार आपल्या विषयाच्या संदर्भात करणं योग्य ठरेल.

पहिलं असं की, ज्या गेल्या दोन-तीनशे वर्षांत परदेशातून तिथं नवं असलेलं हे वैज्ञानिक ज्ञान आपल्याकडं आलं त्या गेल्या दोन-तीनशे वर्षांतल्या काळात आपल्या देशात असं काही नसल्यामुळं प्रयोगशील आणि वैज्ञानिक दृष्टी असं आपल्याकडं पूर्वीसुद्धा काहीच नव्हतं, असा अनेकांचा समज झालेला दिसतो! त्यामुळं या साऱ्या अलीकडच्या काळात या परदेशी वैज्ञानिक प्रगतीनं फक्त दिपून जाण्याची व थक्क होण्याची प्रवृत्तीच वाढीला लागली.

साहजिकच दुसरं असं की, हे वैज्ञानिक दृष्टीचं तथाकथित शस्त्र हाती नवीन मिळाल्यासारखं ते कुठल्याही विषयाला लावून बघण्याची आणि त्यावर त्या विषयाची परीक्षा करण्याची उत्साही, पण काहीशी अपरिपक्व वृत्ती मूळ धरू लागली. त्याचा परिणाम म्हणून 'देव दाखवा','प्रत्यक्ष दिसला तर आहे म्हणू, न

दिसला तर नाही म्हणू' इतकंच नव्हे, तर 'देव, आत्मा, ईश्वर किंवा त्यासंबंधी विचार करणारे सगळे ग्रंथ काल्पनिक, भोंगळ आणि अशास्त्रीय आहेत' असा समज झालेली व त्यामुळं तसं सांगणारी मंडळी स्वत:ला विज्ञाननिष्ठ समजू लागली.

असं खरोखर आहे का हे पाहण्यासाठी उपनिषदांत काय सांगितलं आहे, हे पाहाणं थोडं उद्‌बोधक ठरेल. अनेक हजार वर्षांपूर्वी मुळातच जगातल्या वस्तूंची जड-चेतन, स्थूल-सूक्ष्म, दृश्य-अदृश्य अशा तऱ्हेची विभागणी ऋषींनी केलेली आहे, ही लक्षात घेण्यासारखी पहिली गोष्ट. समोर दिसणाऱ्या किंवा स्थूल वस्तूंच्या परीक्षणासाठी इंद्रियांचा प्रयोगशील वापर करण्याची माहिती त्यांना होती, ही दुसरी गोष्ट. याही पलीकडं जाऊन सूक्ष्म किंवा अदृश्य वस्तू किंवा तत्त्वं शोधायला याच इंद्रियांचा आधार किंवा प्रयोगाची दृष्टी म्हणजेच -नुसतं डोळ्यांना दिसतं म्हणून खरं आणि दिसत नाही म्हणून खोटं - एवढी ठोकळेबाज तथाकथित वैज्ञानिक पद्धत अपुरी ठरते, याचं पूर्ण भान त्यांना होतं ही तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट.

हे त्यांचे नुसतेच वैचारिक सिद्धांत होते काय? किंवा हे त्यांचं नुसतंच चिंतन होतं काय? किंवा त्या काळच्या शिष्यांना ते नुसतंच घोकावं लागत होतं काय? याची उत्तरं शोधण्यासाठी आपण उपनिषदांतल्या एक-दोन गोष्टी प्रत्यक्ष पाहू.

सूक्ष्म तत्त्वं शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्याला ऋषी सांगतात की,'तू श्रद्धा ठेवलीस तर या तत्त्वाचं ज्ञान तुला होईल', पण ते असं नुसतं म्हणून थांबत नाहीत. ते त्याला जवळ बोलावून विचारतात,'समोरचा विशाल वटवृक्ष तुला दिसतो का?' वृक्षाकडं पाहून शिष्य म्हणतो,'होय.' गुरू विचारतात,'तो वृक्ष कशातून निर्माण झाला?' शिष्य म्हणतो,'तेथे पडलेल्या त्या वृक्षाच्या फळातील बीपासून.' गुरू आज्ञा करतात,'जा आणि त्यातील एक फळ घेऊन ये.' ते फळ आणल्यावर गुरू त्याला सांगतात,'ते फळ फोड. त्यात तुला काय दिसतं?' शिष्य म्हणतो,'यात मला असंख्य बिया दिसतात.' 'त्यातली एक बी घेऊन फोड.'

त्यावर तो शिष्य ती बी फोडून पाहतो. त्यावर गुरू त्याला विचारतात, 'आता त्या फोडलेल्या 'बी'त तुला काय दिसतं आहे?' शिष्य उत्तरतो,'यात मला काहीही दिसत नाही.' गुरू म्हणतात,'या 'बी'पासून हा महान वृक्ष निर्माण झाला,

हे खरं आहे ना ? पण ती बी फोडल्यानंतर अखेरीस आत काहीच दिसत नाही. तरीही त्या न दिसणाऱ्या सूक्ष्म गोष्टीपासून एवढा मोठा वृक्ष कसा आकाराला येतो, याचा विचार कर. तुझी दृष्टी मागोवा घेताना एका विशिष्ट ठिकाणी येऊन थांबते. तिथं दृश्याचा आणि इंद्रियांच्या आधारानं अनुभव घेण्याचा प्रांत संपतो. या पुढचा अनुभव आणि ज्ञान हवं असेल तर तुझ्या लक्षात येईल की, आता श्रद्धा ठेवण्याची गरज आहे, तरच यापुढचं ज्ञान तुला होऊ शकेल.'

हीच गोष्ट दुसऱ्या एका बाजूनं प्रयोगानं त्याला सिद्ध करून दाखवताना ऋषी म्हणतात, 'एक भांडंभर पाणी आणि मूठभर मीठ घेऊन माझ्याकडं ये.' 'हे मूठभर मीठ आणि हे भांडंभर पाणी तुला प्रत्यक्ष दिसतं आहे ना? आता आपल्या डोळ्यांदेखत ते मीठ या पाण्यात टाक. ते भांडं कोपऱ्यात ठेवून दे.' दुसरे दिवशी सकाळी अध्ययनाला आल्यानंतर गुरू ते भांडं शिष्याला आणायला सांगतात आणि त्याला म्हणतात, 'या भांड्यात तुला मीठ दिसतं आहे का ?' शिष्य उत्तरतो, 'नाही.' गुरू त्याला त्या पाण्यात हात घालून ते मीठ आहे का, याची खात्री करायला सांगतात. त्यावर तो शिष्य उत्तरतो, 'माझ्या हातालाही मीठ लागत नाही.' 'आता डोळ्यांच्या किंवा त्वचेच्या साहाय्यानं पाहिल्यावर तुला विचारलं की यात मीठ आहे काय तर तू काय उत्तर देशील?' शिष्य उत्तरतो, 'यात मीठ नाही.' गुरू विचारतात, 'मीठ नाही हे तू कशावरून म्हणतोस?' शिष्य उद्‌गारतो, 'मला ते दिसत नाही, म्हणून नाही.'

त्यावर गुरू भांड्यातलं पळीभर पाणी घेऊन त्याला प्यायला सांगतात आणि विचारतात, 'या भांड्यात मीठ आहे किंवा नाही?' त्यावर शिष्य उत्तरतो, 'या पाण्यात मीठ आहे.' गुरू विचारतात, 'हे तू कशावरून म्हणतोस?' 'ते पाणी मला खारट लागतं त्यावरून.'

त्यानंतर हे गुरू त्याला भांड्याच्या मधल्या, तळाच्या आणि आजूबाजूच्या भागातलं पाणीही चाखून पहायला सांगतात. त्यावरून शिष्य, पाणी नुसतं खारट नसून ते सर्वत्र आणि सारखंच खारट आहे असा अनुभव सांगतो. तेव्हा ऋषी त्याला म्हणतात, 'जी गोष्ट तुझ्या डोळ्यांना प्रत्यक्ष दिसत नाही, ती गोष्ट प्रत्यक्षात मात्र असू शकते, हे तुझ्या लक्षात आलं का? यावरून मला दिसेल तेवढंच खरं असं ज्ञान करून घेणाऱ्याला कधी ज्ञानी म्हणता येईल का? उलट

दृष्टीच्याच नव्हे, तर वेळी इंद्रियांच्याही पलीकडं जाऊन वस्तूचं खरं स्वरूप समजून घेण्याची मनाची तयारी ठेवणं खऱ्या विद्यार्थ्याला किंवा जिज्ञासूला आवश्यक आहे.'

वरच्या उदाहरणावरून आपल्या हे लक्षात येईल की, हजारो वर्षांपूर्वीही आपल्याकडं अनुभवाची, प्रयोगाची वैज्ञानिकदृष्टी होती. ग्रंथांत लिहिलं किंवा कुणी सांगितलं म्हणून एखादी गोष्ट खरी मानण्याची त्यांना आवश्यकता वाटत नव्हती. ती ती गोष्ट आपल्या अनुभवानं स्वतः पारखून घ्यावी आणि इतरांनाही घेऊ द्यावी, ही दृष्टी ऋषींकडं होती. इतकंच नव्हे, डोळे काय, त्वचा काय किंवा इतर ज्ञानेंद्रियं काय, त्या सर्वांचा आवश्यक व पुरेसा उपयोग करतानाही इंद्रियांच्या मर्यादाही ऋषींच्या लक्षात आल्या होत्या.

या चर्चेवरून हेही दिसून येतं की, एका ज्ञानेंद्रियाच्या साहाय्यानं खरा ठरणारा अनुभव दुसऱ्या ज्ञानेंद्रियाच्या दृष्टीनं खोटा ठरू शकतो, तर उलट एका ज्ञानेंद्रियाच्या साहाय्यानं खोटा ठरणारा अनुभव दुसऱ्या ज्ञानेंद्रियाच्या दृष्टीनं खरा ठरू शकतो. यावरून आणखीही दोन गोष्टी स्पष्ट होतात - पहिली अशी की, कुठल्याच ज्ञानेंद्रियाचा अनुभव हा पूर्ण विश्वासार्ह असत नाही. त्यात थोडा का होईना भ्रम निर्माण होतो. या गोष्टीचं भान आपण व्यवहार करताना ठेवलं, तर ते परिपक्वपणाचं लक्षण होईल. दुसरं असं की, वस्तू जितकी सूक्ष्म होत जाईल तितकी ती समजून घ्यायला इंद्रियं कमी पडू लागतात. पुढं वस्तू हळूहळू तर्कानं व नंतर त्याहीपलीकडं जाऊन साक्षात तादात्म्यानं आणि अनुभवानं कळते, ज्यासाठी रास्त आणि योग्य श्रद्धेचीच गरज असते.

आपल्याकडं हजारो वर्षांपासून उपलब्ध असलेली उपनिषदांची ही व्यापक आणि खऱ्या अर्थानं वैज्ञानिकदृष्टी आपण लक्षात ठेवली, तर आपला व्यवहारही अधिक समजूतदार, सोयीचा होईल आणि आपला ईश्वराशी किंवा सूक्ष्म विश्वाशी येणारा संबंध अधिक जाणता आणि फलदायी होईल, असं वाटतं.

*

१३. ईश्वरप्राप्तीचा मार्ग

आजवर जगामध्ये वेगवेगळ्या धर्म, पंथांमधून ईश्वरप्राप्तीविषयीही, त्याच्या मार्गांविषयी जितकं बोललं किंवा सांगितलं गेलं आहे, तितकं इतर कुठल्या विषयांबाबत क्वचितच सांगितलं गेलं असेल. त्यात महत्त्वाच्या दोन प्रश्नांसंबंधी ऊहापोह केलेला दिसून येईल. प्रत्येकानं आपापल्या परीनं भगवंताचं वर्णन केलेलं आहे. कुणी त्याला वेगवेळ्या देवाच्या स्वरूपात, वेगवेगळ्या आकारात, कुणी त्याला मनुष्य स्वरूपात तर कुणी त्याला अज्ञात स्वरूपात मानलेलं आहे. मग त्या स्वरूपात प्रिय-अप्रिय असणाऱ्या गोष्टी, वस्तू यांची यादी सांगितलेली आहे. देवाला काय आवडतं, त्याला काय चालत नाही, तो रंगरूपानं कसा आहे, त्याची कुणाशी मैत्री आहे, त्याला कोण जवळचे वाटतात, त्याची शस्त्रास्त्रं कोणती आहेत, त्याचं कुणाशी शत्रुत्व आहे, तो कुणापेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ आहे, यांविषयीच्या असंख्य कल्पना आपल्याला या ग्रंथांतून आणि त्यांतल्या अधिकारी समजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडून ऐकायला मिळतात.

याचबरोबर या संदर्भात चर्चिला जाणारा दुसरा मोठा विषय म्हणजे, या देवाच्या प्राप्तीचे हजारो मार्ग आणि साधनं. मग त्यात पूजाअर्चा, त्याच्या पद्धती, अधिक परिणामकारक प्रकार, यज्ञ-याग, त्याचे अगणित प्रकार, त्याचे उपयोग, योगमार्ग, पाठ-पारायणं, अनुष्ठानं, पुरश्चरणं, मंत्रतंत्रांचे विधी - हे आणि अशासारखे असंख्य विषय आणि मार्ग आपल्यासमोर येत असतात. या प्रत्येक मार्गाच्या अधिकारी व्यक्ती, त्यांचे मठ, संप्रदाय, देवदेवळं, तीर्थक्षेत्रं - हाही एक फार मोठा विषय आहे.

या सगळ्या ग्रंथांत, व्यक्तींच्या सांगण्यात, ईश्वराची कल्पना आणि तिच्या प्राप्तीचा मार्ग, यात इतकी भिन्नता आहे, अनेकदा पराकोटीचा विरोधाभास आहे, भोंगळपणा आहे की, कित्येक माणसं या विषयाची जिज्ञासा असूनसुद्धा त्या सगळ्याला कंटाळून, या साऱ्या विषयापासून दूर राहून आपापलं कर्तव्य करीत राहणंच पसंत करतात. त्यातही या क्षेत्रातल्या व्यक्तींची लोभ, असूया, मत्सर असल्या वृत्तींच्या बाबतीतली दयनीय परिस्थिती, पैसा, सत्ता यांसारख्या

गोष्टींची वाटणारी आकर्षणं आणि पराकोटीचे अहंभाव - या साऱ्या गोष्टी पाहिल्या की, या सगळ्यापासून आपला काही फायदा होण्यापेक्षा तोटाच होण्याची शक्यता सामान्य विचारी माणसाला वाटते. तो या सगळ्यापासून दूर राहतो आणि ते बरोबरच आहे.

अर्थात, बाजूला राहून हा प्रश्न सुटतो किंवा मूळ प्रश्नाला उत्तर मिळतं असं नाही. याचं कारण असं की, मूळ प्रश्न हा वर सांगितला तसा देव, त्याचे मार्ग, तिथले मार्गदर्शक, पंथोपपंथ, त्यांतले भ्रष्टाचार, विरोधाभास - हा नसून माणसाची सदैव सोबत करणारं दुःख व त्याचा निरास हा आहे आणि तो नुसतंच बाजूला राहून सुटणार नाही, हे उघडच आहे. दुःखाचा विचार करताना अनेकदा 'का' या प्रश्नाला तोंड द्यावं लागतं, असा अनुभव येतो. माणसाला दुःख का असतं, त्याच्याच कर्मानं झालं म्हणावं तर सगळेच अनुभव एकीकडं कर्मांचे परिणाम म्हणून घडताना दिसत नाहीत. आपण न केलेल्या कर्मांचे परिणाम भोगावे लागतात, तसंच केलेल्या कर्मांची सर्व व पूर्ण फळंही पदरात पडताना दिसत नाहीत. दुसरीकडं कर्म आणि त्यांचे परिणाम न मानावे तर गोंधळच उत्पन्न होतो, शिवाय कर्मफळाचा किंवा कार्यकारणभावाचा खूपच प्रमाणात खरा ठरणारा सिद्धांत टाळणंही शक्य होत नाही.

याशिवाय काही मूलभूत प्रश्नही तसेच राहतात. उदा. आपण कुठून आलो ते कळत नाही, कसे जगतो ते कळत नाही, कधी आणि त्याच वेळी का जातो, पुढं काही होतं का ते कळत नाही. मनुष्य सामान्य असला तरीही वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्तानं त्याच्यापुढं हे प्रश्न उभे राहतात. त्याला अकाली मृत्यूंचा अर्थ लागत नाही. अचानक घडणारे अपघात आणि उध्वस्त होणाऱ्या आयुष्यांचा अर्थ लागत नाही. आपल्यापेक्षा कुवतीनं सर्वच बाबतीत खरंच कितीतरी कमी असलेली माणसं आपल्यापेक्षा कितीतरी उच्चपदावर का जातात आणि विलक्षण समृद्धीत का जगतात, हे त्याला कळत नाही.

अनेक दुष्प्रवृत्त आणि उघड उघड भ्रष्टाचारी माणसं, व्यसनी माणसं, प्रकृतीनं ठणठणीत राहून सुखेनैव का जगतात, याचा उलगडा त्याला होत नाही. त्याचवेळी अनेक सच्छील आणि सदाचरणी माणसं नाना शारीरिक व्याधींनी का ग्रस्त होतात आणि लौकिकदृष्ट्या अगदी साध्या परिस्थितीत का राहतात, हे त्याला कळत नाही.

अशा अनेक प्रश्नांनी मनुष्य भंडावला गेला की, त्याची उत्तरं तो आजूबाजूच्या परिस्थितीत आणि उपलब्ध ज्ञानात शोधायचा प्रयत्न करतो. या साऱ्यांची उत्तरं मिळावीत, अशी त्याला जशी एका बाजूनं अपेक्षा असते, तशीच दुसऱ्या बाजूनं, उघड उघड चुकीची दिसणारी परिस्थिती आपण सुधारावी, दुर्जनांना शासन व्हावं आणि सज्जनांना न्याय मिळावा, असंही त्याला सुप्तपणे कुठंतरी वाटत असतं. उत्तरांच्या शोधातून त्याचे काही प्रश्न सुटतात, पण काही खरे प्रश्न उभेही राहतात. हे प्रश्न सोडवण्यातला त्याचा सर्वांत मोठा मदतनीस म्हणजे त्याची बुद्धी आणि कार्यकारणभावाचा सिद्धांत होय. या दोन्हींच्या साह्यानं अनेक गोष्टी, भले त्या त्याला चूक वाटोत, त्यांची कारणं आणि अर्थ त्याला कळतो. माणसामाणसांच्या आणि व्यक्तींच्या स्वत:च्या वर्तनाला दिशा देण्यासाठी काही आचरणांच्या नियमांची गरजही त्याला दिसून येते. मग असे नियम त्याचा धर्म बनतो किंवा कायदेकानू-राज्यघटना बनते.

हे सगळं करूनही दोन गोष्टी तरी त्याला अनुत्तरित राहतात. या साऱ्या सृष्टीचा कर्ता किंवा नियंता कोण आणि सगळ्याचा अंतिम न्याय कुठं होईल? हे दोन प्रश्न अनुत्तरित राहिल्यावर मात्र त्याच्या बुद्धीची मर्यादा त्याच्या लक्षात येते. अशा वेळी तो एकतर याचं उत्तर यापलीकडं आहे हे गृहीत धरतो किंवा समर्थ देवाची किंवा आत्मतत्त्वाची कल्पना मांडतो.

पूर्वीच्या काळात अशी कल्पना भीतीपोटी मांडल्याचं सांगितलं जात असलं, तरी उपनिषदांचं मत जर पाहिलं, तर या भीतीच्या सिद्धांतात फारसं तथ्य नाही, असं आढळून येईल. उपनिषदांचं म्हणणं बघण्यापूर्वी आपल्याला एक साधी गोष्ट स्पष्ट झाली असेल की, सुरुवातीला देवाच्या ज्या स्वरूपांचा आणि त्याच्या प्राप्तीच्या हजारो मार्गांचा आपण ऊहापोह केला, त्याचा या मूळ अडचणींशी फारसा संबंध नाही. देवांचे हेवेदावे, मैत्री, शत्रुत्व, श्रेष्ठ-कनिष्ठता यांतल्या बऱ्याचशा गोष्टी तर मानवनिर्मित, गैरलागू वाटतील.

उपनिषदांनी हा प्रश्न सोडवताना दोन गोष्टींवर भर दिलेला आपल्याला दिसेल. त्यांचं पहिलं म्हणणं असं की, हे जे काही पलीकडं उरणारं कर्तृत्व किंवा अंतिम सत्ता आहे, तिचं खरं स्वरूप समजून घ्या. आज मानवी प्रयत्नानं किंवा बुद्धीनं या सगळ्याचा अर्थ लागत नाही, ही गोष्ट खरी. पण त्याचा परिणाम म्हणून

आपण सगळ्या बाबतीत स्वत:चं कर्तृत्व अंतिम समजणाऱ्या आपल्या अहंकाराच्या प्रवृत्तीला आवर घालण्याची गरज ओळखली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीशी तो त्या पलीकडच्या सत्तेचा प्रतिनिधी आहे, असं समजून नम्रतेनं वागलं पाहिजे.

याचबरोबर त्यांचं दुसरं म्हणणं असं की, माझ्या बुद्धीसारख्या सूक्ष्म घटकापासून स्थूल शरीराच्या हातापायांसारख्या सर्व घटकांना प्रेरणा देणारी, पण माझ्या बुद्धीला यत्किंचित आकलन न होणारी, जी कुणी आत्मशक्ती माझ्यामध्ये आहे, तिचे गुणधर्म पाहाता, तीही त्याच अंतिम सत्तेचा एक अंश आहे, याचं भान ठेवून मी जगावं, हाच उपनिषदांचा ईश्वरप्राप्तीचा सोपा मार्ग आहे.

या मार्गाची अनेक वैशिष्ट्यं आहेत. ही 'क्ष'शक्ती मानण्यामुळं वर उल्लेखलेल्या विश्वकर्त्याचा आणि न्यायाचा प्रश्न सुटेल. या दृष्टीत कुठला कर्मकांडाचा किंवा धर्मपंथाचा प्रश्न नसल्यामुळं त्या आधारे कुठली व्यवस्था निर्माण करून, माणसामाणसांमध्ये भेद करून कुणी कुणाचं शोषण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आपल्याला सृष्टीतला काही भाग कळत नाही. त्यामुळं येणारी नम्रता व्यक्तीचं जीवन आनंदी करील व त्याचबरोबर ही नम्रतेची प्रवृत्ती त्याच्या आजूबाजूच्यांनाही स्वास्थ्याची ठरेल.

या मार्गाचं आणखी एक मोठं वैशिष्ट्यं हे की, तो सदैव मोकळा, कुणालाही चालायला येईल असा, प्रयोगशील आणि वैज्ञानिक आहे. म्हणून तो मार्ग आजही टिकून तर आहेच, पण कालोचित आणि उपयुक्तही आहे. या मार्गामध्ये थोडक्यात सांगायचं, तर आकलन आणि वर्तन असे दोन घटक अभिप्रेत आहेत.

हे सर्व पाहता उपनिषदांनी या मार्गाला 'नान्य: पंथा विद्यते अयनाय' अर्थात ईश्वरप्राप्तीचा इतका सोपा, बुद्धिनिष्ठ आणि सर्वांना उपयोगी पडणारा मार्ग दुसरा नाही असं का म्हटलं, ते लक्षात येतं.

*

भगवंत जाणणाऱ्यांची भगवंताच्या प्राप्तीसाठी धडपड चालू असते, न जाणणाऱ्यांची किंवा न मानणाऱ्यांची निदान आनंदासाठी धडपड चालू असते. व्यापक अर्थानं पाहिलं तर दोघांचीही मुक्ततेसाठीच धडपड चालू असते. त्यासाठी अनेक मार्ग दोघंही आपापल्या परीनं चालत असतात. ईश्वर न मानणाऱ्यांचा प्रथम विचार करू.

ईश्वर न मानणारा झाला तरी जग मानतो, कायदेकानू मानतो, समज-संस्कृती, माणसाचा विकास हे सारं मानतो, बुद्धी मानतो, विवेक-शक्ती मानतो, कर्माचा मार्ग मानतो, कार्यकारणभाव मानतो. त्याची कल्पना अशी असते की, या जगाच्या पलीकडं किंवा दृश्य विश्वापलीकडं काहीही नसल्यामुळं माणसानं विचारानं आणि विवेकानं वागून, स्वत:च्या आणि समाजाच्या हिताचा विचार करून कृती केली, तर तो इथंच या जन्मात आनंदी राहू शकेल. या तशा साध्या आणि सरळ वाटणाऱ्या प्रमेयाला अनेक गोष्टी छेद देऊन जातात.

माणसं परस्परांत भेदाभेद करतात, गटतट करतात. आपापल्या कल्पना आदर्श समजून त्यांच्या अंमलबजावणीची वेळी सक्तीही करतात. धर्म, पंथ, राजकारण, शोषण, संकुचितता, भाषाभिमान, प्रांताभिमान, वंशाभिमान असल्या अनेक गोष्टींनी मूळच्या गोंधळात कमालीची भर पडते. अशा असंख्य घटनांमध्ये 'विवेकानं आणि विचारानं वागण्याचं' मूळ प्रमेय कुठं हरवून जातं, त्याचा पत्ताही लागत नाही.

त्यातच असं प्रमेय मांडणाऱ्यांचा, त्यांच्या बुद्धिनिष्ठतेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सकारण-अकारण अहंकार आड येतो, तो वेगळाच. त्यात आपापल्या अशा मतांविषयी वाटणारा अभिमान यात भर घालतो आणि विवेकाच्या कितीही गप्पा केल्या तरी वेळेला अटळपणे पुढं येणारा व्यक्तिगत स्वार्थ या मूळ चांगल्या प्रमेयाची पुरी वासलात लावतो. अखेरीला ईश्वरही नाही आणि आनंदही नाही असा शेवट झाल्याचं आपल्याला अनुभवायला येतं.

आता ईश्वर मानणाऱ्यांचा क्षणभर विचार करू. बऱ्याच ईश्वर

मानणाऱ्यांची एक नकळत धारणा असते की एका बाजूनं ईश्वर मानला म्हणजे आता आपली विचारानं किंवा विवेकानं राहायची जबाबदारी संपली, दुसऱ्या बाजूनं त्या ईश्वराला प्रसन्न ठेवण्यासाठी जे काही करायचं तेवढं केलं की, आपली उरलीसुरली जबाबदारी संपली. पहिल्या धारणेमुळं व्यक्तिगत आचरणाच्या शुद्धतेचा आणि सावधानतेचा विचार विसरायला माणूस मोकळा होतो. मग देवाला 'माझ्या मनासारखं होऊ दे' हे मागणंसुद्धा सयुक्तिक ठरतं. आपण मागितलेली गोष्ट देण्यानं दुसऱ्या कोणाला तरी त्रास उत्पन्न होऊ शकतो, इतकंच काय, आपल्याच मागण्यानं कालांतरानं आपलं स्वत:चंच नुकसान झाल्याचा अनुभवही माणसाला येऊ शकतो.

दुसऱ्या बाजूला देवाला प्रसन्न करण्याचा विषय. त्याचे मंत्रतंत्र सांगणारे इतके ग्रंथ आणि मध्यस्थ निर्माण होतात की, त्यातून अक्षरश: हजारो मार्ग उत्पन्न होतात. मग ते पूजाअर्चा, तीर्थयात्रांपासून, घोर-अघोर व्रतं, इतकंच नव्हे तर देवासाठी आणि देवाच्या नावावर युद्ध करण्यापर्यंत कितीही प्रकारचे असतात. रागावणाऱ्या, खूष होणाऱ्या, लोभी, मत्सरी अशा एखाद्या माणसाची कळा हळूहळू देवाला येऊ लागते आणि त्याला प्रसन्न करताकरता माणूस अनेकदा मेटाकुटीला येतो.

त्यात असे देवही माणसाच्या कल्पनेतले असल्यामुळं त्यांच्यात आपल्यासारखीच बरीच उच्च-नीचता आणि प्रकार असतात. त्यामुळं एकाच माणसाला एक देव न पुरता वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळे देव आणि त्यांच्या वेगवेगळ्या उपासना गरजेच्या ठरतात. या सगळ्यांत माणसाचा प्रपंच किंवा त्याची स्थिती माणसाच्या कर्मानुसार त्याच्या मृत्यूपर्यंत लौकिकदृष्ट्या आपोआपच थोडीफार बदलत राहाते - म्हणजे लग्नकार्य, मुलंबाळं, घरदार, नोकऱ्या-व्यवसाय होतात, एवढंच. या सगळ्यांत मूळ भगवंतप्राप्ती, की जे खरं, सरळ आणि चांगलं ध्येय आहे, ते कुठं हरवून बसतं किंवा विसरलं जातं ते कळतही नाही. म्हणून मनुष्य अनेक वर्षांच्या ईश्वरभक्तीनंतरसुद्धा आनंदाच्या बाबतीत आहे तिथंच असल्याचा अनुभव येतो.

ईश्वर मानणारे काय किंवा न मानणारे काय दोनही प्रकारच्या बहुतांश लोकांची निराशा, विमनस्कता, दु:ख किंवा रितेपणा अशी अखेर होते, हे

दुर्दैवानं खरं आहे. फक्त या खरेपणाला सामोरं जावं लागू नये, आपली खरी स्थिती निदान इतरांना कळू नये किंवा आपल्या खऱ्या स्थितीचा सामना करण्याची भीती वाटते म्हणून माणूस अखेर खोट्या आनंदात राहायचा मार्ग पत्करतो, असं अनेकदा आढळून येईल.

मग तो गाणी गाईल, चेष्टा-विनोद करील, कुठल्या मोठ्या संघटनेचा सभासद होईल, एखाद्या सामाजिक कार्याला वाहून घेईल - एकूण सगळं काही आनंदात चाललं आहे आणि मी कृतार्थ आहे, असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करील. अर्थात अशानं वस्तुस्थिती बदलत नसते, हे उघडच आहे. एका साध्या उदाहरणानं पाहायचं तर, माणूस जन्माला आल्यावर लहानपणी जितका निरागस आणि प्रसन्न असतो, तेवढा तरी आनंदाच्या प्राप्तीचे वरच्या दोन्हीही प्रकारचे मार्ग आयुष्यभर चोखाळून शेवटी असतो का? या प्रश्नाच्या उत्तरातच आपली स्थिती खरी कशी आहे, याचा अंदाज येऊ शकेल.

या साऱ्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही प्रकारचे मार्ग किंवा अन्य काही मार्ग असतील, तर ते सारे बाजूला ठेवून आनंदाकडं जाण्याचा काही मार्ग आहे काय? याचं एक मनोज्ञ उत्तर मुंडकोपनिषदामध्ये एका दृष्टांताच्या रूपानं आपल्याला मिळू शकतं. उपनिषदांनी असे कुठले पंथ, धर्म, बुद्धिनिष्ठ किंवा भक्तिनिष्ठ, वैज्ञानिक दृष्टीचे, ईश्वरवादी, निरीश्वरवादी असले विचार न करता माणसाचा विचार व त्याच्या ध्येयाचा विचार फक्त एक माणूस म्हणून केला आहे.

ज्याला आनंद मिळवायची जिज्ञासा आहे आणि ती मिळवण्याचा खरा मार्ग समजलेला आहे, तो माणूस त्यांच्या दृष्टीनं 'विद्वान' होय. असा 'विद्वान' माणूस या जन्मामध्ये साक्षात आनंदमय होऊन जातो, असं त्यांचं म्हणणं आहे. उपनिषदांचा आनंदाचा मार्ग - 'विस्मरण आणि समर्पण' अशा दोन तत्त्वांचा आहे. तो सर्वांना लागू आहे. किंबहुना त्या दोन गोष्टी केल्याशिवाय खरा आनंद प्राप्त होत नाही आणि मिळाल्यास तो टिकतही नाही.

यात 'विस्मरण' नामाचं आहे आणि 'समर्पण' रूपाचं आहे. इथं अभिप्रेत असलेलं 'नाम' म्हणजे अर्थातच भक्तिमार्गात 'सिद्ध आणि प्रसिद्ध' असलेलं 'भगवंताचं नाम' नक्कीच नव्हे. इथं अभिप्रेत असलेलं 'नाम' म्हणजे ज्यानं ज्यानं मनुष्य 'मनुष्य' म्हणून वेगळा ओळखला जातो, ते सर्व होय.

म्हणजे उदा. एखादा माणूस घेतला तर त्याला व्यक्ती म्हणून असलेलं नाव हे इथं 'नामां'मध्ये येतंच. कारण त्याच्या विशिष्ट व्यक्तिनामामुळं तो इतरांपासून वेगळा ओळखला जातो. पण हे 'नामा'चं थोडंच वर्णन झालं. तो कुणी जो 'राम' असेल तो कुणातरी श्रीमंताचा मुलगा असतो, सुशिक्षित असतो, रागीट असतो, दुराग्रही असतो, समाजवादी असतो, कम्युनिस्ट असतो, लेखक असतो, विचारवंत असतो, धनवान असतो, आदर्शवादी असतो - अशा ज्या-ज्यामुळं तो इतरांपासून वेगळा ओळखला जातो, ते ते त्याचं सारं म्हणजे इथं अभिप्रेत असलेलं 'नाम' होय.

इथं अभिप्रेत असलेलं 'रूप' म्हणजे व्यक्तीच्या नावासारखं त्या व्यक्तीचं शरीर हे तर आहेच, कारण त्या शरीरामुळंच तो इतरांपासून वेगळा ओळखला जातो, पण 'रूप' म्हणजे इथं त्याचं शरीर एवढंच अभिप्रेत नसून त्याची म्हणून जी जी वस्तू ओळखली जाते - त्याचं घरदार, जमीनजुमला, मालमत्ता, दागदागिने, गाडी, वाहनं अशा असंख्य गोष्टी, ज्या त्याच्या म्हणून इतरांपासून वेगळ्या ओळखल्या जातात त्या सर्व होत.

आता ह्या नामरूपाबद्दल उपनिषदांच्या मार्गाचा अभिप्राय असा की, व्यक्तीला ज्या प्रमाणात त्याच्या या 'नामा'चं विस्मरण घडेल आणि या त्याच्या 'रूपा'चं ती व्यक्ती ज्या प्रमाणात 'समर्पण' करील, त्या प्रमाणात ती व्यक्ती आनंदाची वाटचाल करील. उघडच आहे की, या मार्गाला माणसांचे कुठले भेदाभेद लागू नाहीत. 'ईश्वरवादी' मनुष्य या मार्गाची वाटचाल करू शकतो तितकीच वाटचाल एखादा 'निरीश्वरवादी'ही करू शकतो.

ईश्वरवादी माणसाला समर्पण करायला ईश्वर समोर असेल तर निरीश्वरवादी माणसाला अर्पण करायला समाजपुरुष किंवा निसर्ग समोर असेल. 'नाम' विसरायला मात्र दोघांनाही स्वत:कडंच बघावं लागेल आणि विस्मरणाचा एकच मार्ग चालावा लागेल. समजा, मी भक्तिमार्गी मनुष्य आहे. तर माझी अडचण अशामुळं होते की,'माझ्या' कल्पनेतला ईश्वर मी मानतो,'माझ्या' मतांप्रमाणं मी त्याची आराधना करतो, 'मला' हवं असलेलं मी त्याच्याकडं मागतो. त्यामुळं ती खऱ्या अर्थानं ईश्वराची आराधना होत नाही आणि म्हणून ती आनंदही देत नाही. पण हेच जर मी माझ्या 'नामा'च्या विस्मरणाचा किंवा

विलयाचा अभ्यास करीत असेन, तर जसा खरा आहे तशा ईश्वराची मी आराधना करीन, मला हवं आहे ते न मागता त्याला द्यायचं आहे ते घेईन.

'निरीश्वरवादी' माणसाच्या बाबतीत विचार-विवेकाचा मार्ग तसाच असला तरी माझ्या मतांप्रमाणं चूक-बरोबर न ठरता वस्तुस्थितीवर चूक-बरोबर ठरेल. कृतींच्या परिणामांचा विचार करून मार्ग काढतानासुद्धा माझे-माझे आग्रह, मतं यांनुसार निष्कर्ष न ठरता ते वस्तुस्थितीला धरून निघतील. त्यामुळं माझा खोटा 'मी' बळकट न होता, खऱ्या 'मी'ला वाव आणि स्थान मिळेल. एखादी कृती मला बरोबर वाटते आहे म्हणून ती न करता, ती कृतीच बरोबर आहे म्हणून मी ती करीन. अशामुळं भ्रम आणि चुकीच्या वाटा टाळून मी याच आयुष्यामध्ये आनंद प्राप्त करून घेऊ शकेन.

हे सारं उपनिषदांनी एका समर्पक दृष्टांतानं समजावून दिलं आहे. त्यांचं म्हणणं असं की, माणसाला आनंद मिळवायचा असेल तर ती जगातली सर्वांत मोठी वस्तू आहे. ती मिळवायची असेल तर आपल्यालाही सर्वांत मोठं व्हावं लागतं. इथंपर्यंतच्या भागावर बहुतेकांचं एकमत होतं. पण उपनिषदांच्या दृष्टीनं खरी अडचण इथून पुढं आहे. मोठं व्हायला स्वत:चं लहानपण मान्य करावं लागतं आणि ते सोडावंही लागतं. बहुतेकांना आनंदी व्हायचं असतं - मोठं व्हायचं असतं, पण ते स्वत:ला आणि स्वत:च्या लहानपणाला आणि स्वत:च्या वेगळेपणाला कायम ठेवून! ही अडचण स्पष्ट व्हायची असेल आणि दूर व्हायची असेल तर उपनिषदांतला खालील श्लोक लक्षात ठेवणं उपयोगी ठरेल.

यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रे
अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय
तथा विद्वान नामरूपाद् विमुक्तः
परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ।।

अभिप्राय असा की, वाहणारी नदी, तिला जर समुद्र व्हायचं असेल तर ती आपलं 'नाम' आणि 'रूप' सोडून देते आणि समुद्रात समर्पित होते. म्हणून 'गंगा' काय किंवा 'कृष्णा' काय, जेव्हा 'गंगा' किंवा 'कृष्णा' म्हणून नावानं आणि पाण्यानं वेगळ्या राहात नाहीत, तेव्हाच त्या कल्पनातीत समुद्र

होऊ शकतात, अर्थात पूर्ण आणि आनंदमय होऊ शकतात. यावरून स्वत:चं बाह्य आणि आंतरिक अस्तित्व कायम ठेवून वर्षानुवर्षं भक्ती करणारे आनंद का मिळवू शकत नाहीत, याचंही उत्तर आपल्याला जाता जाता मिळून जाईल आणि केवळ स्वत:च्या बुद्धी आणि विवेकशक्तीवर विसंबून आनंद मिळवू पाहाणारा निरीश्वरवादीही आनंद का मिळवू शकत नाही, याचंही उत्तर मिळून जाईल.

म्हणून स्वत:च्या 'नामा'चं विस्मरण आणि स्वत:च्या 'रूपा'चं समर्पण हा उपनिषदांचा मार्ग आपल्याला आजही विचारप्रवृत्त करणारा व उपयोगी ठरेल असं वाटतं.

*

१५. ईश्वरासारखं रहावं

आपण स्वत:ला कुणीही समजत असलो तरीही कधीकधी आपण खरे कोण आहोत? असा प्रश्न विचारी माणसाला पडतो. आपण म्हणजे आपल्याला अत्यंत प्रिय असलेली आपली एखादी वस्तू नव्हे, इतकंच काय, ज्याला आपण नक्कीच आपलं समजतो, ते आपलं शरीर म्हणजेसुद्धा आपण नव्हे, असंही विचार करणाऱ्या माणसाच्या लक्षात येतं. यावरून आपण म्हणजे खरं आपल्यामधलं जे चैतन्य आहे ते होय, इथंपर्यंत आपण येऊन पोहोचतो.

आपल्या वस्तूंसाठी आपण काही करून पाहिलं, तर त्यानं आपण कायमचे सुखी होत नाही. आपण आपल्या हात-पाय-नाक-कान अशा कुठल्या शरीराच्या भागासाठी सुखाचं करून पाहिलं तरी त्यानंही अखंड सुखी होत नाही. एकूण शरीराला सुखाचं होईल म्हणून काही वागून पाहिलं तरी आपल्याला ते कायमचं सुखाचं होत नाही. त्यापलीकडं जाऊन आपल्या मनाप्रमाणं वागायचं ठरवलं आणि ते काही काळ सुखाचं वाटलं तरी, सतत एकतर मनाप्रमाणं वागता येत नाही आणि वागलं तरी तेही कायमचं सुखाचं ठरत नाही. मग आपलं जे खरं स्वरूप त्या चैतन्याप्रमाणं, आत्म्याप्रमाणं किंवा साध्या भाषेत आपल्या आतल्या ईश्वराप्रमाणं जर वागलं तर ते खरं व कायमचं सुखाचं होईल, असं उपनिषदांचं म्हणणं आहे.

आता आत्म्याप्रमाणं वागावं म्हटलं तर कसं वागावं ? हा प्रश्न सहज उपस्थित होईल. त्याचं उत्तर देताना उपनिषदं म्हणतात की, प्राणाचं-आत्म्याचं जसं स्वरूप आहे, त्याची जशी वैशिष्ट्यं आहेत आणि त्याच्या क्रिया जशा चालतात, तसं आपण वागलं तर, ते आपल्याला आनंदाचं ठरेल. ही प्राणाची वैशिष्ट्यं कशी आहेत, हे समजून घेतलं तर, आपल्याला जसं आपण शरीराला हवं आहे तसं वागतो, जसं आपण मनाला हवं आहे तसं वागतो, तसं आपण आत्म्याला किंवा प्राणाला हवं आहे तसं वागू शकू.

शरीर काय किंवा मन काय, हे सदैव एका स्थितीत राहू शकत नाहीत. पण प्राण मात्र सदैव एका - म्हणजे फक्त आनंदाच्या - स्थितीतच राहतो. ही आनंदाची स्थिती सुख आणि दु:ख किंवा समाधान-असमाधान याही द्वंद्वाच्या

पलीकडची स्थिती असते. म्हणून प्राण किंवा आत्मा किंवा आतला ईश्वर याप्रमाणं आपण वागलो तर आपणही सदैव एका स्थितीत म्हणजे आनंदात राहू शकू. या ठिकाणी चैतन्य, प्राण आतला ईश्वर, आत्मा किंवा अंतरात्मा हे सर्व शब्द वेगवेगळे असले तरी एकाच अर्थानं वापरले आहेत.

या प्राणाची काही वैशिष्ट्यं सांगताना ऋषींनी दोन-तीन उदाहरणं दिली आहेत. त्यांतल्या एका उदाहरणाच्या साह्यानं आपण या अंतरात्म्याची वैशिष्ट्यं समजून घेऊ. ऋषी म्हणतात, हा अंतरात्मा वायूसारखा असतो. 'जेवढं घर तेवढा वारा' या न्यायानं तो माणसाच्या शरीरात वावरतो. म्हणून मुलाच्या ठिकाणी लहानपणी जेवढं चैतन्य आहे, तेवढंच ते त्याच्या मोठेपणी असतं आणि तेवढंच ते त्याच्या वृद्धपणी असतं. एखाद्या गोऱ्या माणसाच्या ठिकाणी जेवढं चैतन्य आहे, तेवढंच ते एखाद्या काळ्या माणसाच्या ठिकाणी असतं. उंच-ठेंगू, श्रीमंत-गरीब, श्रेष्ठ-कनिष्ठ असा कुठलाही भेद हा अंतरात्मा किंवा हे चैतन्य त्यात वावरताना करीत नाही. या उपमेनं व्यक्त होणारे अंतरात्म्याचे काही गुण लक्षात घेण्यासारखे आहेत.

आपण घर किती मजली बांधतो, त्यात किती खोल्या उभ्या करतो, कुठं किती भिंती घालतो, याच्याशी त्यात वावरणाऱ्या वाऱ्याचा काही संबंध नसतो. घर उभं झालं की त्यात तो नांदतो. त्याला जेवढी जागा दिली जाईल त्यात तो वावरतो. तो मोठ्या जागेत जितक्या आनंदानं राहतो तितक्याच आनंदानं तो लहान जागेत राहतो. हा वायूचा गुण अंतरात्म्याला किंवा चैतन्याला लागू होतो. माणूस मोठा म्हणून जास्त चैतन्यमय असत नाही आणि लहान म्हणून कमी चैतन्यमय असत नाही. माणसाच्या लहान-मोठेपणाबद्दल किंवा वर सांगितलेल्या कुठल्याही भेदाबद्दल अंतरात्म्याची कधी तक्रार असत नाही.

हे वैशिष्ट्य आपण आपल्या जीवनाला थोडं लागू करून पाहू. माणसाच्या शरीराप्रमाणं, मनाप्रमाणं, अंतरात्म्याप्रमाणं वागण्यात काय फरक होतात ते या वैशिष्ट्यात सहज स्पष्ट होतं. शरीराप्रमाणं मनुष्य राहू जाईल तर, त्याच्या त्याच्या शरीराप्रमाणं त्याला सुखाची होईल, अशा जागेची अपेक्षा त्याला राहील. मनाप्रमाणं वागू जाईल तर, मनाच्या ज्या ज्या आवडी आहेत किंवा त्यावर जे जे संस्कार आहेत, त्यानुसार जागा त्याला लागेल. आपल्या हे सहजच लक्षात येईल की,

शरीराच्या सुखसोयींप्रमाणं किंवा मनाच्या अपेक्षांप्रमाणं माणसाला राहायला जागा मिळणं, हे किती कठीण आहे. किंबहुना बराचसा काळ त्याला शरीराच्या किंवा मनाच्या अपेक्षेपेक्षा वेगळ्या परिस्थितीत काढावा लागण्याची शक्यता जास्त आहे.

त्यामुळं साध्या राहण्याच्या जागेच्या बाबतीतसुद्धा माणसाला आयुष्यात सुखापेक्षा दु:खातच अधिक काळ काढावा लागतो. पण याउलट अंतरात्म्याचं जे वायूसारखं वैशिष्ट्य आहे, ते लक्षात घेऊन मनुष्य त्याच्या राहाण्याच्या जागेत राहील तर जेवढं घर तेवढा वारा, जेवढं शरीर तेवढं चैतन्य, जेवढं घर-जसं घर तेवढा आणि तसा होऊन माणूस राहू शकेल. वाऱ्याची जशी कमी जागेबद्दल तक्रार नाही, जास्ती जागेबद्दल उल्हास नाही, पण आहे त्या घरामध्ये मात्र कानाकोपऱ्यातून भरून राहण्याची तत्परता आहे, तशी चैतन्याला लहान-मोठ्या, काळ्या-गोऱ्या शरीराबद्दल तक्रार नाही. मात्र जे शरीर वाट्याला येईल त्याच्या कणाकणापर्यंत किंवा नखशिखान्त जाणिवेनं व्यापून राहण्याची पूर्ण तत्परता आहे. तशा पद्धतीनं आत्म्याचा हा गुण लक्षात घेऊन माणूस राहील, तर त्याच्या राहण्याच्या लहान-मोठ्या कशाही जागेत आनंदानं राहून कर्तव्य करण्याचं त्याचं काम तो तत्परतेनं पार पाडू शकेल.

हे उदाहरण केवळ त्याच्या निवासाच्या जागेला लागू नाही तर, त्याच्या प्रपंचाला, नोकरी-व्यवसायाला, त्याच्या वाट्याला आलेल्या भूमिकेला सर्वांना ते लागू आहे. प्रपंच कदाचित एकट्याच माणसाचा असेल, कदाचित मूल-बाळ नसलेल्या दोघांचाच तो असेल, कदाचित एकत्र कुटुंबातल्या दहा माणसांचा असेल. पण आपली वृत्ती शरीराप्रमाणं किंवा मनाप्रमाणं राहण्याऐवजी दिल्या जागेत आनंदानं आणि तत्परतेनं राहाणाऱ्या प्राणाप्रमाणं असेल तर, यांतल्या कुठल्याही प्रपंचात माणूस तितक्याच आनंदानं राहू शकेल. मूल-बाळ नसेल तर ते कधी होईल आणि हा प्रपंच कसा वाढेल या चिंतेतही तो राहणार नाही आणि दहा माणसं असतील तर आपण तिघं-चौघंजण वेगळे राहून कधी सुखी होऊ अशा चिंतेतही तो राहणार नाही. हा झाला आत्म्याच्या गुणाप्रमाणं राहण्याचा दुसरा प्रकार.

याच उदाहरणानं स्पष्ट होणारा आत्म्याच्या गुणाप्रमाणं राहण्याचा आणखी एक प्रकार आपण पाहू. परिस्थितीचा फक्त बाह्य आकार आपण पाहिला. तिच्या अंतरंगालाही या प्राणाप्रमाणं राहण्याचा गुण कसा लागू होतो ते आपण पाहू.

एखाद्याच्या वाट्याला कधी राजाची भूमिका येते, कधी रंकाची. अंतरात्म्याची कोणाच्याच शरीरात राहायला नाराजी नसते. तो जसा राहतो तसाच जर प्राणाच्या गुणाप्रमाणं माणूस राहील तर, तो राजा म्हणून सुखात नाही आणि रंक म्हणून दुःखात नाही. विजयी म्हणून सुखात नाही आणि पराभूत म्हणून दुःखात नाही. अंतरात्मा राजाचं किंवा विजयी माणसाचं शरीर म्हणून त्याला चिकटून बसत नाही. म्हणजे राजा म्हणून मनुष्य जास्त काळ जगत नाही आणि रंक किंवा पराभूत मनुष्य म्हणून लवकर मरत नाही. म्हणून आत्म्याच्या गुणाप्रमाणं माणूस राहील तर तो परिस्थिती चांगली आहे म्हणून टिकवायचा प्रयत्न करणार नाही आणि वाईट आहे म्हणून दुःख करीत राहणार नाही. यात परिस्थितीत अंतरात्म्याच्या गुणाप्रमाणं राहण्याचं वैशिष्ट्य मात्र आपण लक्षात घ्यावं, एवढंच सांगितलं आहे.

आत्म्याच्या आणखी वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य थोडं उदाहरणानं पाहू. अंतरात्म्याचं वर्णन करताना ऋषींनी आणखी एक उपमा दिली आहे. ते म्हणतात, आत्मा हा डोळ्यांसारखा आहे. पाहणं हे डोळ्यांचं काम जसं ते तटस्थपणे करतात, तसं चैतन्य हे शरीरामध्ये तटस्थ राहतं. डोळ्यांवर शारीरिक ताण येणं किंवा अशा स्वरूपाची एखादी अपवादभूत परिस्थिती क्षणभर सोडून देऊ. एरवी कुठल्याही परिस्थितीत डोळा उघडला की, डोळ्यांचं काम तितक्याच तटस्थपणे सुरू होतं. प्रिय-अप्रिय, हवं-नको असे कुठले भाव येऊ न देता, डोळा जे जे समोर येईल ते तितक्याच तटस्थपणे पाहतो. त्याहूनही विशेष म्हणजे चांगल्या दृश्यानं तो लिप्त होत नाही, वाईट दृश्यानं तो नाराजही होत नाही. या ज्या क्रिया घडतात, त्यावेळी डोळे बंद करावेस वाटणं किंवा उघडेच ठेवावेसे वाटणं, या क्रिया प्राणाच्या नसून शरीराच्या किंवा मनाच्या असतात.

एखादा सेवक जसा फक्त काम करणं जाणतो, कुठलं, किती, का हे जाणत नाही, तसं डोळा फक्त पाहाणं जाणतो. आत्मा हा फक्त त्याचं काम जाणतो. तो लिप्त होणं जाणत नाही. क्षणभर आपण शरीराप्रमाणं आणि मनाप्रमाणं वागायचं ठरवलं, तर शरीराला सुखावह होईल ते आपण पाहातच राहण्याची शक्यता आहे. जे मनाला हवंसं वाटेल ते पाहातच राहाण्याची शक्यता आहे. जे शरीराला आणि मनाला दुःखकारक व नकोसं असेल ते न पाहण्याची शक्यता आहे. पण प्राणाच्या गुणाप्रमाणं राहू तर मात्र,आपण फक्त सांगितलं आहे तोपर्यंत पाहायचं काम तत्परतेनं

करू आणि डोळे बंद केल्यावर पाहण्याची इच्छा न धरता न पाहण्याचं कामही आनंदानं करू.

यात अशी एक शंका उत्पन्न होण्याची शक्यता आहे की, मग माणसाला अयोग्य ते टाळावं आणि योग्य ते पहावं असं जे स्वातंत्र्य आहे ते त्यानं वापरावं की नाही? तर त्याबद्दल असं म्हणता येईल की, काय पाहावं किंवा काय पाहू नये हे ठरवण्याचं स्वातंत्र्य माणसाला जरूर आहे आणि त्यानं ते वापरल्यासच त्याची योग्य दिशेनं प्रगती होऊ शकते, हे खरंच. पण तो निर्णय घेण्यासाठीसुद्धा त्याला शरीराच्या किंवा मनाच्या गुणाप्रमाणं वागून चालत नाही.

शरीराला सुखाचं वाटतं आहे म्हणून जर तो पाहातच राहिला किंवा मनाप्रमाणं आहे म्हणून जर तो पाहातच राहिला किंवा त्याच्याविरुद्ध आहे म्हणून ते पाहाणं बंद करू लागला, तर ते केवळ सुखलोलुपतेचं किंवा इंद्रियलोलुपतेचं पोषण होईल आणि ते त्याच्या हिताचं नक्कीच ठरणार नाही.

अशा वेळी स्वत:ला काय वाटतं यापेक्षा स्वत:च्या कल्याणाचं किंवा हिताचं काय आहे, त्याचा विचार करून निर्णय घेण्याचा जो तटस्थपणा आहे तोही त्याला पुन्हा प्राणाच्या किंवा चैतन्याच्या तटस्थपणाकडूनच शिकावा लागेल. कारण प्राण सुखानं लिप्त नाही आणि दु:खानं अलिप्त नाही. प्राण किंवा अंतरात्मा केवळ कर्तव्यानं बद्ध आहे. त्यामुळं प्राणाकडं बघूनच किंवा प्राणाच्या गुणानुसारच आपल्याला पाहण्याचा किंवा न पाहण्याचा निर्णय करणं हिताचं ठरतं.

या उदाहरणातून आणखी एक अर्थ सूचित होतो, तोही लक्षात घेण्यासारखा आहे. शरीराच्या किंवा मनाच्या गुणानुसार वागायला जाऊ तर परिस्थितीनुसार वाट्याला आलेलं, पण शरीराला किंवा मनाला नको म्हणून वाटणारं एखादं काम न करण्याकडं आपला कल होईल. त्यामुळं कर्तव्यात किंवा परमेश्वराची इच्छा अंमलात आणण्यात कसूर होईल. डोळ्यांच्या किंवा प्राणाच्या गुणाप्रमाणं वागू तर मात्र आपली भूमिका वेगळी राहील. डोळा फक्त पाहाणं जाणतो, दृश्य कसं आहे, यानं तो लिप्त होत नाही, तसा माणूससुद्धा प्राणाच्या गुणाप्रमाणं वागत असेल तर - हवं किंवा नको यापेक्षा परिस्थितीनं जे वाट्याला आलं आहे ते न नाकारता, ते स्वीकारून आपलं कर्तव्य करण्यात व आनंदात राहण्याकडं त्याचा कल होईल.

म्हणून ऋषी सुचवतात त्याप्रमाणं, आपण शरीराच्या किंवा मनाच्या गुणाप्रमाणं राहण्यापेक्षा आत्म्याचे गुण समजून घेऊन त्याप्रमाणं राहू तर आपण सदैव आनंदात राहू. वर वर्णन केलेले अंतरात्म्याचे फक्त काही गुण आहेत. आणखी गुणही आपण आपल्या चिंतनानं शोधू शकू, त्यानुसार वागू शकू.

'तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम्' अर्थात याप्रमाणं वागणाऱ्यांना शाश्वत शांती लाभेल, इतरांना नाही हे स्पष्टच आहे.

*

१६. एक जिव्हाळ्याचा प्रश्न

प्राचीन काळापासून आजपर्यंत प्रत्येक माणसाचा पाठपुरावा करणारे काही प्रश्न आहेत. इतर अनेक प्रश्न काळ आणि परिस्थितीनुसार निर्माण होतात आणि काळ-परिस्थिती बदलली की, ते प्रश्न विरूनही जातात. कधी काळ परिस्थिती बदलते, कधी आपण बदलतो. त्यामुळं असे प्रश्न कालांतरानं नाहीसे होतात. पण काही प्रश्न मात्र असे असतात की, काळ-परिस्थिती-माणसं कितीही बदलली तरी ते प्रश्न अनादि काळापासून कायमच राहतात. त्यातला एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'भीती' हा होय.

हा जिव्हाळ्याचा प्रश्न अशासाठी आहे की, जितका तो पूर्वीच्या आणि सर्व परिस्थितीतल्या माणसांना भेडसावणारा होता तितकाच तो आजही आहे. शिवाय तो एक प्रश्न माणसाच्या आयुष्यात आणखी अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. म्हणजे असं की, एक भय उत्पन्न झालं आणि ते समाधानकारकपणे नाहीसं झालं नाही, तर त्यापासून पळणं अशा साध्या प्रक्रियेपासून हिंसा, संरक्षणाची धावपळ, दुसऱ्यावर दोषारोप, दंभ, इतर कुठल्या शक्तींना साकडं घालणं इथंपासून ते जारण-मारणापर्यंत मनुष्य काहीही करायला जातो. म्हणून हा प्रश्न सुटला तर, इतरही अनेक प्रश्न सुटून माणूस स्वस्थ व सुखी होऊ शकतो.

भय हा प्रश्न कठीण अशासाठी आहे की, अनेकदा आपल्या अनेक व्यवहारांच्या मागं तो असतो याची कल्पनाही आपल्याला नसते. म्हणजे एखादा माणूस पाच गुरुवारी देवाला जायचं ठरवतो किंवा एखादा आठवडा एखादं वाचन करायचं ठरवतो. तो ते नियमानं करतोही, तो काळ संपतो. पण सहाव्या-सातव्या गुरुवारीही तो देवाला जातच राहतो. तो सांगताना मात्र असं सांगतो की, ते छान वाटतं आहे म्हणून मी करतो आहे.

वस्तुस्थिती अशी असते की, पाच वार देवाला गेल्यानंतर त्याच्या मनाला एक प्रकारचं स्वास्थ्य मिळालेलं असतं. त्यामुळं ते जाणं बंद करायचं म्हटलं तर त्याला अशी नकळत भीती वाटते की, त्याचं हे मिळालेलं स्वास्थ्य जाणार तर नाही ना? मग तो तसाच भीतीपोटी जात रहाणं पसंत करतो.

व्यवहारात मात्र हे खरं कारण एकतर त्याला कळत नाही किंवा मान्य करायचं धाडस होत नाही. म्हणून तो पाच वारी गेल्यामुळं आता आपल्याला देवदर्शनाची गोडी लागली आहे, त्यामुळं मी तसाच पुढं जात राहिलो आहे, असं मानतो व तसंच इतरांनाही सांगतो. वास्तविक पाहिलं तर त्याचं हे पुढचं जाणं भक्तीपोटी नसून भीतीपोटी असतं. त्यामुळं त्यात भक्तीचा फायदा तर नसतोच, पण सक्तीचा आणि दंभाचा तोटा मात्र असतो.

हीच गोष्ट आपल्या इतर अनेक वागण्यांना लागू आहे. उदा. आपल्या व्यवहारातल्या प्रेम किंवा आदराच्या कृती घ्या. मनुष्य माझ्या पत्नीवर माझं फार प्रेम आहे असं दाखवतो, वागतो आणि समजतोही. ते व्यक्त करण्यासाठी तो शंभर प्रकारच्या कृती आयुष्यभर करतो. पत्नीही याच समजुतीत असते. प्रत्यक्षात मनुष्याला प्रत्येक वेळी जर त्याची खरी प्रतिक्रिया विचारली किंवा तो अशा प्रसंगी खरा कसा वागू इच्छितो असं विचारलं तर, त्याचं उत्तर अनेकदा वेगळं असतं. मग तो खऱ्यापेक्षा वेगळं का वागतो असं विचारलं, तर खरं वागलो किंवा खरं जे म्हणायचं आहे ते बोललो तर काय होईल, यापोटी तो खरं न वागता दुसऱ्या काही पद्धतीनं वागलेला असतो, असं लक्षात येईल. त्यामुळं त्याची कृती वरवर पाहाता प्रेमाची वाटली तरी ती खऱ्या प्रेमाची नसते. तिचं खरं कारण खरं वागल्यास पत्नीच्या होणाऱ्या प्रतिक्रियांची किंवा पत्नीची वाटणारी भीती असते.

हीच गोष्ट पत्नीलाही पतीच्या बाबतीत लागू असते. या स्वरूपाचं वागणं हे मूळ प्रेमाच्या भावनेमध्ये तर भर टाकू शकत नाहीच, उलट मनासारखं किंवा खरं न वागता आल्याचा सूक्ष्म ताण मनावर निर्माण करीत असतं. त्यातून त्या व्यक्तीबद्दलचा एक प्रकारचा राग किंवा तिरस्कारही निर्माण होतो. त्यामुळं अनेकांच्या आयुष्यात परस्परसंबंधांमध्ये पुढं पुढं एक प्रकारचा कोरडेपणा व दुरावा निर्माण होतो, असं आढळेल. त्याचं मूळ या व्यवहारातल्या दंभामध्ये आणि त्यालाही कारण असलेल्या मूळ भीतीमध्ये आहे.

हीच गोष्ट मोठी माणसं, गुरू, नोकरीतले वरिष्ठ, समाजातली मोठी माणसं, मोठे मानले जाणारे धर्म, ग्रंथ, पंथ अशा अनेक बाबतीत बाह्यतः दाखवल्या जाणाऱ्या आदराची असते. अगदी वस्तुनिष्ठपणे पाहिलं व साऱ्या

गोष्टी आदरणीय असल्या तरी, काल-परिस्थिती-विचार-सर्वसमावेशकता अशा एखाद्या दृष्टीनं त्यांच्यात काही त्रुटी, उणीव जरूर असू शकते आणि ती एखाद्याच्या लक्षात येऊन त्यानं तशी प्रतिक्रिया दिली तर त्यात फारसं चूकही नसतं. उलट अशा प्रतिक्रियेनं ती उणीव दूर होऊन ती मूळ गोष्ट अधिक चांगली व आदर्श होण्याची शक्यता असते. तरीही अशी खरी प्रतिक्रिया दिली तर काय होईल, अशा भीतीनं माणूस ती देण्याऐवजी खोटेपणानं आदर देणंच पसंत करतो. त्यातच अशी खरी प्रतिक्रिया दिली तर इतरांना आपल्याबद्दल काय वाटेल, अशा भीतीपोटीही माणूस आदर दाखवणंच पसंत करतो.

या साऱ्या दंभाच्या कृती असल्यामुळं त्या त्याच्या हिताच्या ठरत नाहीत आणि ज्याच्याबद्दल हे चाललं आहे, तोही या खोट्या आदरामुळं फसून जाऊन, आपण बरोबर असल्याच्या भ्रमात राहण्याची शक्यता असते, जे त्याच्याही अंतिम हिताचं ठरत नाही.

माणसाच्या वागण्याचे हे आणि असे असंख्य प्रकार हे भीतीपोटी घडत असतात. हे जर लक्षात आलं, तर प्रश्न कठीण आणि जिव्हाळ्याचा का आहे हे कळू शकेल. या भीतीला अज्ञान, अनिश्चितता, धैर्याचा अभाव, स्वत:च्या खोट्या प्रतिमांची काळजी, मूळ प्रश्नांपासून पळण्याची प्रवृत्ती अशी अनेक कारणं सापडण्यासारखी असली तरी, उपनिषदांनी त्याचा काय विचार केला आहे ते आपण पाहू.

ऋषींचं म्हणणं असं की, एकपणा निर्भयता आणतो तर दोनपणामुळं भीती निर्माण होते. आपण स्वत:ला ज्यावेळी दुसऱ्यापासून वेगळं समजतो तेव्हा भीती उत्पन्न होते. उदाहरण म्हणून आपण हे वरच्या एका प्रसंगाला लावून पाहू. ज्यावेळी पतीला पत्नीविषयीची खरी प्रतिक्रिया देण्याची भीती वाटते त्यावेळी हे उघडच आहे की, तो तिच्यावर कितीही प्रेम आहे असं समजत असला तरी तो स्वत:ला तिच्यापासून वेगळा मानतो. म्हणून तिच्या प्रतिक्रियांची काळजी त्याला वाटते. खऱ्या प्रेमामध्ये हे वेगळेपण अपेक्षित नसतं. अशा वेळी माणसाला वस्तुस्थितीची काळजी वाटेल, पण प्रतिक्रियेची काळजी वाटणार नाही आणि अर्थात प्रतिक्रियेची भीतीही वाटणार नाही. मग तो खरं मत, खरी प्रतिक्रिया देईल आणि त्यामुळं वागण्यातला दंभही टळेल आणि ते दोघांच्या

हिताचंही ठरेल.

म्हणून उपनिषदांचं एक सूत्र आहे की,'द्वितीयाद् वै भयं भवति।' अर्थात माणसाला दुसऱ्यापासून भय उद्भवतं. हेच उदाहरणानं पाहिलं तर, जिथं उभयतांत प्रेमानं एकपण असतं तिथं एखादी गोष्ट चुकली किंवा पटली नाही तरी दुसरा हा आपलाच असल्यानं म्हणजेच दोघांत एकपण असल्यानं तो ते समजून घेईल व आपण त्यावर मार्ग काढू, याची पूर्ण खात्री असते. त्यामुळं भीतीचा प्रश्न उद्भवत नाही. म्हणजे क्षणभर असं समजा की, बाहेर बाजार करायला गेल्यावर पत्नीकडून पैसे हरवले आणि दोघांत दोनपण असेल तर ही खरी गोष्ट कशी सांगावी, याची तिला भीती वाटेल. ते लपवून ठेवण्याकडं तिचा कल राहील. काही विचारणा झालीच तर खोटं सांगावं लागेल. म्हणजे दोनपणामुळं आणि भीतीमुळं दंभ येईल आणि नुकसान होईल. शिवाय मूळ पैशाचं नुकसान तसंच राहील.

पण याच जागी जर 'एकपण' असेल तर, वस्तुस्थिती तीच असून व ती काळजी करण्यासारखी असूनसुद्धा ती लवकरात लवकर पतीच्या कानावर घालावी, असं वाटेल. दंभाचा प्रश्न उद्भवणार नाही. त्यालाही ती चूक किंवा नुकसान 'तिचं' न वाटता 'आपलं' नुकसान आहे, असं वाटेल. मूळ पैशाच्या नुकसानीची वस्तुस्थिती जरूर काळजी करण्यासारखी असेल, त्यासाठी सावधगिरी दाखवण्याची आवश्यकताही असेल. पण पुढची कृती 'पत्नीची खरडपट्टी' ही न होता दोघांना मिळून ते पैसे कसे वाचवता किंवा उभे करता येतील ते करणं, ही असेल. आपल्या हे लक्षात येईल की, अशा आदर्श आणि विधायक कृतीची आणि संबंधाची सुरुवात दोनपण व भीती यांतून न होता 'एकपणा' व 'निर्भयता' यांतून झालेली आहे.

उपनिषदांनी मांडलेला मुद्दा मूलभूत असून त्याचा अधिक विस्तार केला तर हे 'एकपण' पती-पत्नीपुरतं मर्यादित न राहाता ते मुलंबाळं - इतर समाज असं व्यापक होत जाऊ शकतं. ते तसं झाल्यास माणसाच्या सर्व कृती अखेरीस निर्भयतेच्या होऊ शकतील.

त्यामुळं त्या योग्य व आनंदाच्याही होऊ शकतील. उदाहरण म्हणून संतांच्या किंवा आदर्श पुरुषांच्या गुणांमध्ये 'निर्भयता'हा जो सर्वांत मोठा गुण सांगितला जातो, त्याचं कारण आपण पाहिलं तरीही ऋषींच्या म्हणण्याची सत्यता आपल्याला कळू शकेल. संतांना आपल्यापासून कुणी वेगळा असेल असं वाटतच

नाही. त्यामुळं त्यांची कृती अत्यंत सहज, सर्वांच्या भल्याची आणि कोणताही दंभ न येता होत असते.

भीतीच्या या सूत्राचा थोडा आणखी विचार करू. उपनिषदांची हे कारण सांगण्यामागची पार्श्वभूमी अशी आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणं सृष्टीचा आरंभ एका मूळ पुरुषापासून झाला. त्याला एकट्याला करमेना म्हणून त्यानं दुसऱ्या जीवाची - 'स्त्री'ची उत्पत्ती केली. या दोनपणातून पुढं अनेकपणाचा प्रवास झाला. आनंदासाठी मनुष्य 'दोनपण' स्वीकारतो. आजही व्यवहारानं आपला असा अनुभव आहे की, जर 'एकपणा'त आनंद आहे, तर एकटा मनुष्य सुखी असला पाहिजे, तो निर्भयही असला पाहिजे. पण तसं घडताना दिसत नाही. माणसाला एकट्याला करमत नाही आणि त्याला एकटेपणाची भीती वाटते. म्हणजे दुसऱ्याची 'दोनपणा'ची त्याला आनंदासाठी गरजही आहे. दुसरा आला की, एकाकीपणाची भीती संपते, आनंद मिळतो. पण त्या दुसऱ्याची भीती सुरू होते. हा तात्त्विकदृष्ट्या पेच मानला जातो आणि यामुळंच अनादिकालात जिथं कुठं दोन माणसं अस्तित्वात आली, तिथंपासून आनंद आणि भीतीचा हा पेच कायम आहे.

या पेचाला मग इतक्या हजारो वर्षांत काही मार्ग मिळाला नाही का, असं आपल्याला वाटेल. त्याचं उत्तर असं की, ज्याला हा पेच जाणवलेला नाही, त्याच्यावर ज्यानं विचार केलेला नाही. त्याच्या दृष्टीनं हा पेच कायम आहे. त्याला अज्ञानामुळं आनंदाबरोबर भीतीत, दंभात, दुःखात वावरावं लागतं. किंबहुना, बहुतांश लोकांची हीच परिस्थिती असते. पण यावर अधिक विचार केला तर लक्षात येईल की, आनंदासाठी 'दोनपणा'ची गरज आहे, हे खरं, पण 'दोनपणा' बरोबरच माणसाला आणखी एक मोठी शक्तीही लाभलेली असते, तिचा तो विचार करीत नाही. ती शक्ती म्हणजे 'प्रेम' होय.

आनंदासाठी बाह्यतः किंवा आकृतीनं दोन झालेली माणसं प्रेमाच्या शक्तीनं अंतरंगी एक होऊ शकतात, हे जर त्याच्या लक्षात आलं तर दोनपणामुळं निर्माण होणारा भीती, दंभ, दुःखाचा धोका माणूस सहज टाळू शकेल. म्हणजे एका बाजूनं बाह्यतः दोनपणामुळं त्याला आनंद मिळेल आणि दुसऱ्या बाजूनं प्रेमाच्या शक्तीच्या आंतरिक एकपणामुळंही त्याला आनंद मिळेल. यात आता भीतीचा वावर

मात्र आपोआपच संपून गेला आहे, असं लक्षात येईल.

हे तत्त्व संतांच्या बाबतीत पाहिलं, तर प्रेमाची ही शक्ती दोन व्यक्तींच्यापुरती मर्यादित न ठेवता, ते त्या विधायक शक्तीनं समस्त जीवनमात्रावर प्रेम करून सर्व सृष्टीशी 'एकपणा' संपादन करतात. म्हणून ते सदैव अत्यंत निर्भय, आनंदित राहू शकतात, हे लक्षात येईल.

ही विद्या लक्षात न आली तर मात्र माणसाला एकतर एकाकीपणाच्या दु:खाला सामोरं जावं लागतं, नाहीतर दुसऱ्याच्या भीतीला तरी तोंड द्यावं लागतं आणि काहीही झालं तरी ही विद्या पूर्ण माहीत नसल्यामुळं अर्धं सुख आणि अर्धं दु:ख त्याच्या पदरात पडतं. याला उद्देशून ऋषींनी ही विद्या माहीत नसल्यास 'आपलं हे अर्धवटासारखं होतं' असं विनोदानं म्हटलं आहे. जर आपण त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ लक्षात घेतला नाही तर, आपली परिस्थितीही अशी होण्याची आणि राहण्याची शक्यता आहे आणि समजून घेतलं आणि त्याप्रमाणं वागलो तर मात्र, संतांसारखं निर्भय आणि आनंदातही राहणं आपल्याला शक्य आहे.

ऋषींचा भयावरला हा मार्ग व विचार भयाच्या प्रश्नाचा कदाचित समग्र उलगडा करू शकत नसला, तरी तो भयाचा प्रश्न बराचसा निकालात काढू शकतो, असं मात्र दिसून येतं.

*

माणसाची वरवर पाहाता कितीही कार्यक्षेत्रं दिसली आणि कितीही प्रकारची धडपड त्यानं केली तरी, त्याचा मूळ उद्देश हा 'सुख' मिळवण्याचा आहे, असं दिसून येईल. 'सुखाची' ओढ माणसाला एवढी आहे की, त्यासाठी दुःख सोसायलासुद्धा तो तयार असतो. 'सुखाचं' होणार असेल तर माणूस वेळी उपाशी रहायला तयार होईल. शरीर कष्ट सोसायला तयार होईल, चांगलं किंवा वाईट कुठलंही कृत्य करायला तयार होईल. इतकी धडपड आयुष्यभर केल्यानंतर आता सगळीकडं 'सुखच सुख' होईल म्हणावं, तर तेवढं मात्र कुठं कुणाला झाल्याचं आढळत नाही.

याचं कारण असं की, माणसाला वरवर सुख मिळवण्याचे मार्ग दिसतात. त्यांची वाटचालही तो करतो. पण सुख मुळात नक्की काय केल्यानं मिळतं, याचा विचार मनुष्य आयुष्यात फार क्वचितच करताना दिसतो. एखादा आजार नीट समजावून न घेता त्याच्यावर उपाययोजना करण्याची गडबड करावी किंवा एखाद्या यंत्रात बिघाड कुठं आहे ते नीट न शोधता ते दुरुस्त करायची धडपड करावी, तसा काहीसा प्रकार सुखाच्या बाबतीत होतो, असं दिसतं. या साऱ्या परिस्थितीवर उपनिषदांनी खूप विचार करून ठेवला आहे. ते सगळं जर आपण विचारात घेतलं तर उपयोगाचं होईल, असं वाटतं.

उपनिषदांचं 'सुखाचं' सूत्र असं आहे 'भूमैव सुखम्' म्हणजे 'विशालतेत सुख आहे' त्याच्या बरोबरीनं स्पष्ट होण्यासाठी त्यांनी सांगितलं आहे, 'नाल्पे सुखमस्ति।' अर्थात 'संकुचिततेत सुख नाही', ऋषींच्या दृष्टीनं मनुष्य मनानं जितका मोठा होत जाईल, तितका तो सुखी होत जातो. अत्यंत विशाल असलेला म्हणजे 'विश्वमन' झालेला म्हणजेच लक्षणेनं 'संत' हा सर्वांत सुखी राहील, याचा अनुभव आता आपल्याला येतोच. 'हे विश्वचि माझे घर' किंवा सगळ्या विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना करणारे श्री ज्ञानेश्वरांसारखे संत हे अत्यंत समाधानात आणि आनंदात असलेले आपल्याला दिसतील.

यातली 'भूमा' किंवा 'विशालता' ही ऋषींची कल्पना काय आहे,

ती आपण थोडी समजावून घेऊ. आपली सुखाची कल्पना 'मी' आणि 'माझ्यापुरती' मर्यादित आहे. त्यामुळं माझ्या कल्पनांनुसार, पूर्वग्रहांनुसार, मतांनुसार, इच्छांनुसार, गरजांनुसार त्या त्या गोष्टींची पूर्तता झाली की, मी 'सुखी' होणार, अशी माझी धारणा आहे. त्यामुळं त्या गोष्टी पुऱ्या करण्याच्या मागं मी असतो.

पण अनुभव असा येतो की, माझ्या मतांप्रमाणं किंवा माझ्या कल्पनांप्रमाणं एखादी गोष्ट घडून येऊनसुद्धा ती अनेकदा सुखाची होत नाही. झालीच तर ते सुख टिकत नाही आणि अनेकवेळा माझ्या मतापेक्षा किंवा कल्पनेपेक्षा वेगळं काही घडूनसुद्धा ते मला 'सुखाचं' ठरतं. या अनुभवांचा आपण विचार करावा, असं उपनिषदांना वाटतं. जर माझ्या कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडूनसुद्धा मी सुखी होत असेन तर, 'माझ्या कल्पनेप्रमाणं घडल्यानं मी सुखी होईन' ही धारणाच मुळात दूषित आहे, हे मान्य करणं भाग आहे. त्याचं कारणही आपण शोधलं पाहिजे, असं ऋषींना वाटतं.

याचं कारण त्यांच्या दृष्टीनं असं की, माझी कल्पना लहान, मर्यादित आहे, हे मी अजून ओळखलेलं नाही. कल्पनेचं जग इतकं विशाल आहे की, त्यांतल्या फार कमी कल्पना माझ्याकडं आहेत. त्या एवढ्याशा कल्पनांनी मी सुख मिळवायला जातो, इथं घोटाळा आहे. म्हणून वर म्हटल्याप्रमाणं अनुभव मला येतो. याला उपनिषदं 'अल्प' असा शब्द वापरतात आणि म्हणतात, 'अशा अल्प कल्पनांनी सुख होत नाही.' कल्पना जर विशाल होईल तर ती त्याप्रमाणं सुख देऊ शकेल.

जे कल्पनेच्या बाबतीत खरं, तेच विचार, दृष्टिकोन, मतं यांबाबतीत खरं. आता ही 'अल्प' कल्पना 'विशाल' कशी करायची हा प्रश्न उद्‌भवेल. आपण दोन माणसांतल्या एका कृतीचं उदाहरण घेऊ. एखादं घर बांधायचं आहे तर घरातला एक माणूस जर आपल्या कल्पनेप्रमाणं ते बांधील तर, नंतर ते त्याला आणि इतरांनाही प्रत्यक्ष राहाताना सुखाचं होत नाही. कारण त्यानं घरातल्या इतरांच्या कल्पनांचा विचार त्यात केला नाही. तो केला असता, तर त्याच्या व इतरांच्या सुखात वाढ झाली असती. म्हणजेच त्यांची 'अल्प' कल्पना त्यानं 'विशाल' केली असती, तर ती सर्वांनाच सुखाची पडली असती.

मग ही 'अल्पकल्पना' तशी का होते, तर ती त्याच्या 'मी'ला बांधून

ठेवली जाते - म्हणजेच ती 'स्वकेंद्रित' राहते म्हणून आणि म्हणूनच ती कमी सुखाची ठरते. 'मी'चा ज्या वेळेला 'आम्ही' होतो, त्या वेळी स्वाभाविकच कल्पनांत भर पडलेली असते. ती विशाल झालेली असते. त्या वेळी ती 'अधिक सुखाची' ठरते.

क्षणभर असा विचार करू की,'आम्ही'चा 'आपण सर्व' झाला तर 'अधिक सुखा'चंसुद्धा 'पूर्ण सुख' होऊ शकेल. म्हणून 'अल्प'ची व्याख्या करताना, ज्यात अजून दुसरं काहीतरी विचारात घ्यायचं राहिलं आहे किंवा दुसरं काहीतरी जाणायचं, ऐकायचं, पाहायचं राहिलं आहे ते 'अल्प', अशी व्याख्या करावी लागेल आणि 'विशाल' म्हणजे ज्याच्यात दुसरं काही जाणायचं, पाहायचं, ऐकायचं, विचारात घ्यायचं राहिलेलं नाही ते 'भूमा' किंवा 'विशाल', अशी केलेली आहे. आपल्याला हे सहज पटू शकेल की, सर्व बाजूंनी विचार करून केलेली कृती व्यवहारातसुद्धा अधिक सुखाची ठरते.

म्हणून उपनिषदांनी मांडलेल्या विशालतेतून जाणाऱ्या या सुखाच्या मार्गाचा आपण विचार केल्यास आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या अनेक दुःखांची कारणं कळतील, उत्तरंही मिळतील. त्यामुळं इथून पुढची वाटचाल जास्तीत जास्त सुखाकडं राहील, अशी आशा वाटते.

*

माणूस पदोपदी ज्ञान मिळवतो आहे. वेगवेगळ्या विद्या शिकतो आहे. त्याची सर्वसाधारण समजूत अशी आहे की, या विद्या शिकलो तर माझ्या जीवनातलं दुःख दूर होईल. त्याला स्पष्ट कल्पना नसली तरी, ते दुःख कधी अज्ञानाचं असतं, कधी पैसा, मानमान्यता-सत्ता यांच्या उणिवांचं असतं. अधिक खोल पाहिलं, तर मुळात माणसाला खरं दुःख 'बंधनाचं' असतं.

एखाद्या माणसाला तुरुंगात टाकलं म्हणजे दुःख तुरुंगाचं असण्यापेक्षा त्यामुळं येणाऱ्या हालचाली-खाणंपिणं-फिरणं यांवरच्या बंधनांचं दुःख जास्त असतं. त्या क्षणी त्याला असं वाटत असतं की, तुरुंगातून बाहेर पडलो तर माझ्या हालचालींवरचं बंधन कमी होईल, मी मोकळेपणानं हिंडू-फिरू शकेन आणि त्यामुळं मला सुख होईल. अर्थात हे वरवर पाहाता खरं वाटलं तरी, नुसता तुरुंगातून बाहेर पडून माणूस सुखी झाला, असं होत नाही. कारण ते काही त्याच्यावरचं एकमेव बंधन नव्हे की, जे सुटलं की माणूस मुक्त आणि सुखी व्हावा. बाहेर आला तरी त्याला पोटाचं-भुकेचं बंधन असतं. अशा वेळी खायला मिळालं की, तात्पुरतं भुकेचं बंधन सैल होतं आणि माणसाला सुख वाटतं. पण तेच जर त्याच्याकडं खायला काही नसेल तर, तुरुंगातून सुटूनसुद्धा भुकेच्या बंधनामुळं तो दुःखातच राहू शकतो.

ही सगळी परिस्थिती पाहिली तर विद्यांच्या बाबतीतही माणसाची हीच स्थिती आहे, असं लक्षात येईल. एखादी विद्या मिळवून तिच्याविषयीच्या अज्ञानाच्या बंधनातून सुटून मनुष्य आनंदी होऊ पाहात असला, तरी त्या विद्येनं त्याची पैशाची उणीव दूर न झाल्यास, पुन्हा तो पैशाच्या उणिवेच्या बंधनात म्हणजेच दुःखात राहतो. एक विद्या शिकून पुरणार नाही म्हणून दोन-तीन विद्या शिकणारा एक वेळ पैशाच्या उणिवेतून सुटतो, त्या दृष्टीनं तो सुखी होतो. पण लग्न करायला मुलगी नाही मिळाली तर पुन्हा प्रपंचातल्या उणिवेनं दुःखी होतो. त्याही बंधनातून सुटला तर पुन्हा मुलाच्या उणिवेनं दुःखी होतो. हे जर असंच चालणार असेल आणि या विद्या जर माणसाला बंधनातून असं थोडं थोडं मुक्त करणाऱ्या असतील आणि अर्थातच

परत दुःखात पडावं लागणार असेल तर, अशी एखादी विद्या नाही का की, जिच्यामुळं माणसाला पूर्ण, कायमचं मुक्त होता येईल आणि त्याच्या दुःखाचा अंत होईल आणि तो अखंड आनंदात राहू शकेल?

याचं उपनिषदांचं उत्तर होकारार्थी आहे. त्यांचं म्हणणं असं की, वर वर्णन केल्या तशा कितीही विद्या मिळवल्या तरी, माणूस अंतिमतः कधीच सुखी होऊ शकणार नाही. सुख पूर्णतेतून येतं. या साऱ्या विद्या आणि त्यांचा अभ्यास विषय नश्वर व अपूर्ण आहे. म्हणून त्या माणसाला कधीच पूर्ण समाधान देऊ शकत नाहीत. उदाहरणानं पाहायचं झालं, तर असं म्हणता येईल की, क्षणभर असं समजा की, माणसाला तहानेचं दुःख आहे. ते दूर करायला पाणी हवं. म्हणून आपण पाणी मिळवण्यासाठी धडपड करून ते आणतो आणि त्याला ते देतो. पाणी प्याला की, माणसाची तहान भागते आणि त्याचं तहानेचं दुःख कमी होतं. या विद्या मिळवणं व त्याच्या साहाय्यानं बंधमुक्त होऊन सुखी होणं हा त्यातला प्रकार आहे. अर्थात, पुढं जशी माणसाला थोड्या वेळानं तहान लागते व तो पुन्हा दुःखी होतो, त्यातलाच हा प्रकार आहे.

पण या तहानेच्या दुःखावर जसा पाणी पाजणं हा मार्ग आहे, तसा ती तहानच नाहीशी होणं-करणं, हाही मार्ग आहे. तो सापडला तर जसा या तहानेवरच्या दुःखावर आणि बंधनावर कायमचा उपाय होईल, तसं काहीसं या वेगळ्या विद्येचं स्वरूप राहील. अर्थात, यात एक दोष सहज दिसेल की, तहानच नाहीशी होण्याच्या मार्गानं दुःख नाहीसं झालं तरी उद्या भुकेनं दुःख होऊ शकेल. म्हणून अशीही विद्या असावी की, जिनं या एकूण दुःखाचं मूळच नाहीसं होईल किंवा त्या ज्ञानानं एकूणच तहान एकदाच अशी पुरी होईल की, जिच्यामुळं पुन्हा कुठल्याही प्रकारची तहान किंवा दुःख माणसाला उत्पन्न होणार नाही.

उपनिषदांचं निःसंदिग्ध म्हणणं असं की, माणसाला स्वतःचं ज्ञान होणं किंवा पर्यायानं ईश्वराचं ज्ञान होणं, हे ज्ञान हाच त्या दुःखावरचा एकमेव उपाय आहे. स्वतःच्या स्वरूपाचं ज्ञान देणारी आत्मविद्या हीच माणसाच्या एकूण दुःखाचा नाश करायला समर्थ आहे. कारण त्या विद्येनं माणसाला त्याच्या दुःखाचं मूळ कारण, मग ते त्याचं वेगळेपण असो, बंधनं असोत, उणिवा असोत, अहंकार असो, कर्तृत्व असो - त्याचं ज्ञान होतं आणि मूळ दुःखाचं कारणच संपत

असल्यानं एक वेळ खायला-प्यायला नसलं तरी माणसाच्या सुखावर त्याचा परिणाम होऊ न देण्याची विद्या साधते. ही एक विद्या अभ्यासली तरच हे साध्य होईल. अन्य लौकिक विद्या एकाच्या जागी दहा जरी मिळवल्या तरी त्यातून हा दुःखाचा अंत साधणार नाही.

हा मुद्दा स्पष्ट करताना उपनिषदांत दिलेलं एक उदाहरण आजच्या भौतिक विद्यांच्या मागं लागलेल्या आणि त्यातून आपण सुखी होऊ, अशी खात्री बाळगणाऱ्यांनी लक्षात ठेवण्यासारखं आहे.

ऋषी म्हणतात, जसं चामडं गुंडाळावं तसं जर माणसाला आकाश गुंडाळता आलं, तरच आत्मविद्या किंवा देवविद्या मिळवल्याशिवाय मनुष्य (इतर विद्यांनी) सुखी होऊ शकेल! अर्थात आकाश गुंडाळणं जेवढं अशक्य आहे, तेवढंच खऱ्या ईश्वराचं किंवा स्वतःच्या खऱ्या स्वरूपाचं ज्ञान न घेता इतर विद्यांनी सुखी होणं अशक्य आहे.

यदा चर्मवदाकाशं वेष्टयिष्यन्ति मानवाः
तदा देवं अविज्ञाय दुःखस्यांतो भविष्यति ।।

त्यामुळं लौकिक विद्या पोटासाठी अवश्य मिळवाव्या, पण त्या आपल्याला अंतिम सुख देऊ शकणार नाहीत, याची खात्री बाळगावी आणि त्यांच्याच बरोबर आत्मविद्येची कास धरावी, हे सुज्ञपणाचं होईल.

*

१९. काय मागावं ?

'जिथं माणूस आहे, तिथं मागणं आहे' अशी म्हण व्हावी, इतकं माणसात मागणं मुरलेलं आहे. जन्मल्यापासून माणसाचं मागणं सुरूच होतं. प्रथमतः तो शारीरिकदृष्ट्या परावलंबी असतो म्हणून ते असतं. आईवडिलांच्या आणि घरच्यांच्या मदतीशिवाय जागचं हालणंसुद्धा तेव्हा माणसाला शक्य नसतं. स्वाभाविकपणे त्यानं मदतीचा हात अपेक्षित करणं योग्यच आहे. पण पुढं वयानुसार वाढणारा माणूस स्वतंत्र होऊनसुद्धा मागण्याची सवय विसरत नाही, हेच खरं. तो या ना त्या रूपात मागतच राहतो.

याचं एक कारण असं म्हणता येईल की, शरीरानं हळूहळू स्वतंत्र होणारा माणूस मनानं मात्र मोठा झाला तरी स्वतंत्र होत नाही. उलट त्याची अतृप्ती वाढत राहून, मनानं परावलंबी बनून, तो अधिकच मागत सुटतो. काही बाबतीत त्याला अशा मागण्याला पर्याय नसला, तरी कुणाकडून आणि काय मागावं याचा विचार मात्र त्याला करता येण्यासारखा आहे. तो विचार करू शकल्यास माणूस योग्य ठिकाणी, योग्य गोष्टी मागू शकेल आणि ते देणाऱ्याच्या आणि घेणाऱ्याच्याही हिताचं ठरेल.

थोडं उदाहरणानं बघायचं झालं तर किराणाच्या दुकानात जाऊन किराणा वस्तू मागणं हे योग्य असलं, तरी तिथं शरीराच्या दुःखावर औषध मागण्यात अर्थ नसतो. तितकंच दवाखान्यात जाऊन आजारावर औषध मागणं रास्त असलं, तरी भवरोगावर औषध मागण्यात अर्थ नसतो. याही पुढं जाऊन संतांकडं किंवा देवळात गेल्यावर किराणा माल किंवा देहदुःखावर औषध मागण्यात अर्थ नसतो. तिथं आसक्तीतून सुटण्याचा उपाय किंवा अखंड समाधान मागावं, हे रास्त असतं.

पण हा विचार न केल्यामुळं किंवा ते भान न राहून कुठंतरी, काहीतरी मनुष्य मागत सुटतो, हे खरं आहे. म्हणून काही वेळा संतांकडं जाऊनसुद्धा प्रपंचातली एखादी गोष्ट मागून किंवा एखाद्या 'आजारातून मला बरं करा' असं आपण म्हणताना दिसतो.पण हे कस्तुरीच्या दुकानात हिंग मागितल्यासारखं

होतं. अर्थात संतांकडं ते मिळणार नाही असं नसतं, पण जे मिळण्यासारखं आहे ते मात्र मिळत नाही, हे नुकसान आहे.

यात पुन्हा शारीरिक परावलंबीपणाच्या बाबतीत लहान मुलाला नुसतं मागता येतं. तसं मात्र आयुष्यभराच्या या मागण्यामध्ये नसतं. पुढच्या या मागण्यामध्ये त्याची काही किंमत देणंही अपेक्षित असतं. किंबहुना ज्याला योग्य, चांगलं आणि पुरेसं मिळवायचं आहे, त्यानं त्या त्या वस्तूची योग्य ती किंमत द्यावी, हे अधिक चांगलं. हे लक्षात न आलं, तर निष्ठेचा किंवा अपेक्षित साधनेचा बंदा रुपया न देता माणूस संतांच्याकडं जवळीक किंवा कृपा मागायला जातो. अशा वेळी योग्य किंमत न देताही आपण हे मागतो आहे, हे माणूस लक्षात तर घेत नाहीच, उलट ते मागणं न मिळाल्याची संतांच्याबद्दल तक्रार मात्र तो करतो. हीच गोष्ट व्यवहारामध्येसुद्धा घडत असलेली आपल्याला दिसेल. म्हणून मागण्याचा हा विषय जरा समजून घेतला, तर आपलं जीवन अधिक सुखाचं आणि सुसंवादाचं होईल.

या बाबतीत उपनिषदांत घडलेली एक घटना काही प्रकाश टाकून जाते. त्यातल्या 'याज्ञवल्क्य' नावाच्या मोठ्या ब्रह्मज्ञ ऋषींचा गृहस्थाश्रम उत्तम चालला होता. काही काळानं त्यांनी विचारपूर्वक संन्यास स्वीकारण्याचं ठरवलं. ऋषी म्हणून त्यांच्याकडं जशी आत्मविद्येची संपत्ती होती, तशीच त्यांच्या आश्रमाची भरपूर लौकिक संपत्तीही होती. ऋषींच्या दोन पत्नी होत्या. पहिली - मैत्रेयी, दुसरी - कात्यायनी. त्यांनी संन्यास घ्यायचं ठरवल्यामुळं आश्रमाची व त्या उभय पत्नींची योग्य ती सर्व व्यवस्था करण्याच्या दृष्टीनं त्यांनी दोघींनाही सांगितलं की, त्यांना ते लौकिक संपत्ती वाटून देण्याचं ठरवीत आहेत.

देणारा समर्थ असला तरी घेणाऱ्याच्या मनाच्या ठेवणीनुसार जो तो मागतो, हेच खरं. मैत्रेयी येऊन ऋषींना म्हणाली की, 'तुम्ही देऊ केलेली सर्व संपत्ती घेऊन मी समाधानी आणि मुक्त होऊ शकेन का?' त्यावर ऋषी म्हणाले, 'आजवर संपत्तीनं कुणी कधी समाधानी किंवा मुक्त झालेला नाही. उलट संपत्तीनं समाधान जातं. संपत्तीनं मोक्ष मिळण्याची कुठलीही आशा नाही. मात्र संपत्तीनं तुझा चरितार्थ उत्तम चालेल. तुला सर्व लौकिक सुखं मिळू शकतील.'

त्यावर मैत्रेयी म्हणाली, 'माझ्या आयुष्याचं कल्याण साधणं, हे मला माझं पवित्र कर्तव्य वाटतं. ते जर मला या संपत्तीच्या साह्यानं पार पाडता येत नसेल तर

मला ही संपत्ती नको. तुम्ही मला हे कल्याण साधण्याचा मार्ग दाखवू शकाल का?' ऋषींनी आनंदानं होकार दिला. त्यावर मैत्रेयीनं, 'मला तुमच्याकडची कल्याणकारी विद्या द्यावी आणि कात्यायनीला हवी असल्यास ही सर्व लौकिक संपत्ती द्यावी.' अशी विनंती केली.

लक्षात घेण्यासारखं आहे की, कात्यायनीचं संपत्ती आणि तिच्यापासून मिळणारं सुख एवढंच मागणं असल्यामुळं तिनं याज्ञवल्क्यांची सारी संपत्ती मोठ्या आनंदानं स्वीकारली. ऋषींना कात्यायनीच्या मागण्याबद्दल वाईट वाटत नसलं व त्यांनी ते सर्व मागणं पुरवलंही असलं तरी, मैत्रेयीच्या मागण्यानं मात्र ते आनंदित झाले. ते तिला म्हणतात, 'प्रिया बत अरे नः सती प्रियं भाषसे।' अर्थात 'तू मला प्रिय आहेसच, पण हे तू सुरेखच बोललीस आणि मागितलंस!'

पुढं याज्ञवल्क्यांनी तिला जी विद्या सांगितली, तिच्यातून निर्माण झालेलं आत्मविद्येचं उपनिषद तिला मुक्ती देऊन तर गेलंच, पण ते आज हजारो वर्षं झाली तरी, टिकून आहे, वाचलं जात आहे आणि त्यामुळं अनेकांचं कल्याण होत आहे. याउलट मागणं छोटंसंच असल्यामुळं याज्ञवल्क्य खूप मोठं काही देऊ शकत असूनसुद्धा ते कात्यायनीला कधी मिळालं नाही. तिची संपत्तीची मागणी मात्र अपेक्षेपेक्षा जास्त पुरी झाली. ती तिच्या आयुष्यात चरितार्थाला उपयोगी पडली आणि तो विषय तिथंच संपला. आज कात्यायनीची 'मागणी' पुरी झाल्यामुळं ना तिचा उद्धार झाला, ना इतर कोणाला पुढं मार्ग मिळाला.

सारांशानं आपलं मागणं, त्यापासून होणारं आपलं भलं, देणाऱ्याची कुवत, आपल्या मागण्यानं सहज होऊ शकणारं इतरांचं भलं, अशा अनेक दृष्टींनी आपल्या मागण्याचा आपण सातत्यानं विचार करीत असावं, हेही उपनिषदांकडून शिकण्यासारखं आहे.

*

२०. चिंतनाचं पथ्य

मनुष्य हा चिंतनशील प्राणी आहे. 'मनुष्य' या शब्दातच - 'मनन' करतो तो माणूस - अशी व्याख्या केली गेली आहे. मननाच्या विषयाला कुठलं बंधन नसलं, तरी जितके विषय माणूस डोळ्यांनी आणि कानांनी आत घेतो तितके तितके त्याचे चिंतनाचे विषय वाढत जातात, हे खरं. माहीत नसलेल्या एखाद्या विषयाबद्दल माणसाला चिंतन करण्याची क्षमता नाही, असं नाही. तो तेही करू शकतो. पण माहीत असलेल्या विषयांच्यावर मात्र त्याचं चिंतन अखंड सुरू असतं.

चिंतन ही एक आवश्यक आणि मोठी क्षमता माणसाजवळ आहे. एखाद्या विषयाचा अभ्यास करताना त्याला ती फार उपयोगी पडते. तितकीच एखादा प्रश्न सोडवतानाही त्याला ती उपयोगी पडते. मग तो प्रश्न परीक्षेतला असो की आयुष्यातला असो. लौकिक विद्यांच्या अभ्यासामध्ये या चिंतनाचं मोठं स्थान आहे. चिंतनानं आकलन होतं. त्या त्या विषयाच्या बाजू समजतात, विषय पक्का होतो.

याच चिंतनाचं पारमार्थिक अभ्यासात त्याहूनही मोठं स्थान आहे. याचं कारण असं की, एक तर परमार्थ हा विषय सूक्ष्माकडं जाण्याचा आहे. लौकिक विद्येतल्या वस्तू, त्यांचे विषय हे अनेकदा दृश्य स्वरूपात बाहेर पाहाता येतात, त्यांचं निरीक्षण, प्रयोग करणं शक्य असतं. पण परमार्थात आनंद असो, समाधान असो, भगवंत असो, त्याकडं जाण्याचा मार्ग असो, सर्व चराचरांत भरलेला ईश्वर असो सगळेच विषय तसे अंतरंगाचे आणि सूक्ष्म असतात. त्यामुळं ते बरेचसे चिंतनावर अवलंबून असतात.

उदा. लौकिकदृष्ट्या आपण एखादं घर बांधलं तर त्याचा कर्ता - मी किंवा मी नेमलेली चार माणसं - अशा तऱ्हेनं दाखवता येतात. पण पारमार्थिकदृष्ट्या विचार करू गेलं की, खरे कर्ते अनेक आहेत असं म्हणता म्हणता, अखेर खरा कर्ता भगवंतच आहे किंवा 'क्ष' आहे, इथंपर्यंत आपण येऊन पोचतो. हा सर्व विचार करायला लौकिक निरीक्षण प्रयोगापेक्षा माणसाला चिंतनशक्तीच जास्त उपयोगी

पडते. म्हणून परमार्थामध्ये अनुभवाबरोबरच असे अनुभव सांगणाऱ्या पूर्वीच्या श्रेष्ठ लोकांच्या ग्रंथांतल्या शब्दांवरही सातत्यानं चिंतन केलं जातं.

या सगळ्यांत पुढंपुढं एक अडचण निर्माण होते, तिच्याकडं उपनिषदांनी लक्ष वेधलं आहे. ते आपण समजून घेऊ. शास्त्राच्या किंवा संतांच्या ग्रंथाचं चिंतन आपल्याला गरजेचं आहे, हे आपण पाहिलंच. कारण त्यामुळंच आपल्याला आत्मप्राप्तीचा किंवा ईश्वरप्राप्तीचा मार्ग नीट कळतो, त्या मार्गावर चालताना होणाऱ्या आपल्या चुका कळतात, त्या मार्गावरचे भ्रम, धोके कुठले तेही कळतं, चिंतनानं त्या मार्गाची ओढही वाढत जाते.

त्यामुळं अनेकदा असं आढळून येतं की, या मार्गातली माणसं रात्रंदिवस वाचन करीत राहतात. विवरण करणारे, अर्थ सांगणारे, भाष्य करणारे, निरूपण करणारे, प्रवचन करणारे रात्रंदिवस तेच करीत राहतात. बरं, ग्रंथांना तोटा नाही. 'ज्ञानेश्वरी' संपली की 'दासबोध', 'दासबोध' संपला की 'गाथा','गाथा' झाली की 'भागवत' - असा हा चिंतन-मननाचा उद्योग आयुष्यभर सुरू राहतो. या सगळ्या चिंतनाच्या प्रक्रियेत हळूहळू आपण मुळात चिंतन कशासाठी सुरू केलं, याचा विसर पडायला लागून मनुष्य हळूहळू त्या चिंतनातच रमायला लागतो आणि त्यांतल्या विचारांचा डोक्यात भरपूर साठा झाला की, खूप काही केल्याच्या भ्रमात कृतार्थतेचा भास होऊन, मूळ काम तसंच राहतं. अखेर एके दिवशी मनुष्य काळाच्या स्वाधीन होतो.

वास्तविक, चिंतनाचा मूळ उद्देश हा आपलं स्वत:चं किंवा भगवंताचं खरं स्वरूप कळावं, हा आहे. हा उद्देश इथंच संपत नाही, तर इथं तो फक्त सुरू होतो. स्वरूप कळल्यानंतर त्या स्वरूपाचं सतत अनुसंधान ठेवून त्यानुसार मी उरलेलं आयुष्य जगणं, हा त्याचा खरा उद्देश आहे. म्हणजे एकदा चिंतनानं वस्तू कळल्यानंतर पुढं फक्त त्या 'स्वरूपाचं' चिंतन व त्यानुसार कृती हा चिंतनाचा खरा महत्त्वाचा उद्देश आहे. पण या भाराभर वाचनाच्या, चिंतनाच्या आणि त्याचीच गोडी लागण्याच्या उद्योगामध्ये 'मूळ' काम तसंच राहतं, ही शोकांतिका आहे.

ती शोकांतिका टाळायची असली तर उपनिषदांचं एक सूत्र आपण अवश्य लक्षात ठेवावं, असं आहे. 'नानुध्यायाद् बहून् शब्दान्' अर्थात 'भाराभर शब्दांचं-ग्रंथांचं चिंतन करू नये'. उपनिषदं पुढं म्हणतात की, त्यानी नुसताच शीण होईल,

मूळ काम होणार नाही. त्यासाठी थोड्याशाच शब्दांचं किंवा ग्रंथांचं अधिक चिंतन करून त्यात अपेक्षित असलेली कृती करण्याची गरज जास्त आहे. शब्द आणि चिंतन हे गरजेपुरतं आणि मोजकं असलं की, आयुष्यात कृतीला वेळ मिळतो आणि कृती केल्यानं माणसाचं खरं काम होतं.

म्हणून 'चिंतन' ही अत्यंत महत्त्वाची व उपयोगी शक्ती असली तरी, उपनिषदांनी सुचवलेली ही काही पथ्यं लक्षात ठेवणं आपल्याला अधिक फलदायी ठरेल.

*

२१. देवाचं स्वरूप काय ?

असं म्हणतात की, माणसाच्या भाषेवरून त्याच्या विचारांची आणि संस्कृतीची कल्पना येऊ शकते. म्हणूनच त्याच्या भाषेवरून म्हणजेच भाषेत दिसणाऱ्या दृष्टिकोनावरून राजाचा शिपाई कोण, अंमलदार कोण, प्रधान कोण आणि स्वत: राजा कुठला हे ओळखणाऱ्या साधूची गोष्ट प्रसिद्ध आहे. जसं बोलण्यावरून किंवा दृष्टीवरून माणसाच्या आतल्या स्थितीची थोडीफार कल्पना सामान्य माणसालाही येते, तशीच माणसाच्या अंतरंगाच्या विकासाची कल्पना आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीवरून येते. ती म्हणजे माणसाची आनंदाविषयीची कल्पना.

प्रत्येक मनुष्य कळत नकळत आनंदासाठीच जगत असला तरी, आनंदाची कल्पना सर्वांची सारखी नाही. एखाद्या व्यक्तीला एखादी गोष्ट मिळाल्यावर किंवा केल्यावर जसा आनंद होईल, तसा तो दुसऱ्याला त्याच गोष्टीनं होईल, असं नाही. म्हणूनच सुटीचा दिवस आनंदात घालवायचा म्हणजे नक्की काय करायचं याचं उत्तर अनेकांचं वेगवेगळं असतं. रविवार किंवा सुटीचा काळ नुसतं झोपून राहण्यात घालवण्यापासून ते खाण्यापिण्याचे वेगवेगळे प्रयोग करणं, भटकंती करणं, बाजारहाट करणं, नव्यानव्या वस्तूंची खरेदी करणं, तीर्थक्षेत्राला जाणं, नातेवाईक-इष्टमित्रांना भेटणं, वाचन करणं, मैफली ऐकणं, एखादी कला शिकणं, समाजकार्य करणं, ध्यान-जप-पूजापाठ करणं या आणि अशा अनेक गोष्टी मनुष्य करताना दिसतो. त्या करताना प्रत्येकाचा उद्देश आपापल्या परीनं आनंदात राहण्याचाच असतो.

या साऱ्या प्रकारांत सुसूत्रता किंवा स्तर आहेत काय आणि ते कसे आहेत, याचा विचार उपनिषदांनी केला आहे आणि त्यावरून माणसाच्या जीवनाचं जे अंतिम ध्येय-ईश्वर किंवा देव त्याचंही स्वरूप ठरवण्याचा प्रयत्न ऋषींनी केला आहे. तो आपण समजून घेऊ.

यावर सुरुवातीलाच एखादा असं म्हणेल की, हे कुठलेही प्रयत्न न करता मी खाऊन पिऊन आनंदात आहे, तर मग हे सारं समजून घेण्याची गरज कुठं

आहे? आणि असे कमीजास्त प्रकार आनंदात कसे असू शकतील? याचं उत्तर असं की, एखादा कामगार एखादं मशीन चालवतो, त्याला ते चालवण्याचं ज्ञान असलं तर तो ते चालवू शकतो. म्हणजे ते मशीन चालवण्यासाठीसुद्धा काही ज्ञानाची गरज माणसाला असते, तर आनंदासारख्या एवढ्या महत्त्वाच्या गोष्टीच्या बाबतीत त्याला ज्ञानाची, म्हणजेच समजून घेण्याची गरज नाही, असं कसं असू शकेल?

म्हणजे त्याला त्या ज्ञानाची गरज तर आहेच, पण त्याचबरोबर क्षणभर असा विचार करू, नुसतं मशीन चालवण्याचं जाणणाऱ्याला रोजच्या कामात काही अडथळा वाटत नसला तरी, एखाद्या क्षणी ते मशीन बंद पडलं तर अशा वेळी नुसतंच मशीन चालवता येण्याचं ज्ञान पुरेसं ठरत नाही. किंबहुना ते त्या क्षणी निरुपयोगी ठरतं. बंद पडलेलं मशीन दुरुस्त कसं करावं, याचं ज्ञान नसेल तर कामगाराचं काम अडून बसतं.

त्यामुळं नुसताच आनंद होतोय या समजुतीत न राहता आनंद म्हणजे काय, तो का होतो, तो कशावर अवलंबून असतो, त्याचे काही प्रकार असतात का, आनंद कशानं जातो, काय केल्यानं तो परत येऊ शकतो, या सगळ्याचं ज्ञान जर माणसाला असेल तर तो आनंदात असताना त्याचं अडणार नाहीच, पण दु:ख आल्याससुद्धा त्याचं अडणार नाही. म्हणून आनंदाच्या उपनिषदांनी केलेल्या अभ्यासाची माणसाला गरजही आहे आणि उपयोगही आहे.

उपनिषदांचं सर्वांत महत्त्वाचं आणि आपल्याला विचार करण्यासारखं म्हणणं असं की, देवाचं खरं स्वरूप 'आनंद' हे होय. ईश्वर म्हणजे माणसासारखी कुठली दगडाची किंवा हाडामांसाची किंवा आणखी कशाची आकृती नाही. तर अत्यंत निर्भेळ, कशावरही अवलंबून नसलेला, निरुपाधिक, कुणालाही, कधीही अनुभवता येण्यासारखा आनंद होय. ही देवाची कल्पना अत्यंत शुद्ध, कालातीत आणि आजही समर्पक वाटणारी आहे.

फक्त या स्वरूपातला आनंद सामान्य माणसाजवळ किंवा असामान्य वाटणाऱ्या माणसाजवळ आज नाही. त्याऐवजी त्या आनंदाचा भास उत्पन्न करणाऱ्या अनेक गोष्टी त्याच्याजवळ आहेत. त्यांनाच तो 'आनंद' किंवा 'देव' किंवा उपनिषदांच्या भाषेत 'ब्रह्म' समजतो आहे. जर तो समजून घेईल, विचार करील, आपला अनुभव ताडून पाहील, तर त्याला या खऱ्या ब्रह्माची किंवा आनंदाची

कल्पना येऊ शकेल.

त्यानं थोडा विचार केला तर, त्याच्या हे सहज लक्षात येऊ शकेल की, वर सांगितलेली आनंदाची विशेषणं त्याच्या आजच्या आनंदाला लागू पडत नाहीत. उदाहरणार्थ, शरीराचा आनंद आहे परंतु तो शरीर ठीक असेपर्यंत आहे, गप्पाटप्पांचा आनंद आहे पण तो त्या चालू असेपर्यंत आहे, पैशाचा आहे पण तो आनंद पैसा असेपर्यंत आणि उपयोगाला येतो आहे तोपर्यंत आहे, माणसांचा आनंद आहे, पण ती मनाप्रमाणं वागतात तोपर्यंत आहे. खाण्यापिण्याचा आनंद आहे पण तो ते मिळतं आहे आणि सोसतं आहे तोपर्यंत आहे. म्हणजे या आनंदाला वर म्हटलेली आनंदाची कुठलीच विशेषणं लावता येत नाहीत. उदाहरणार्थ, निरुपाधिक, अखंड, कुणावर अवलंबून नसलेला इत्यादी. या सगळ्यांवर विचार केला तर आनंदाचे प्रकार आणि स्तर असू शकतील, हे उपनिषदांचं म्हणणं आपल्याला पटतं. हे प्रकार कोणते असू शकतील आणि त्यातून खालच्या प्रकाराकडून माणसाला वरच्या प्रकाराकडं कसं जाता येईल, हेही उपनिषदांकडून शिकता येतं.

आपल्या हे लक्षात येऊ शकेल की, त्या त्या पातळीवरचा आनंद म्हणजेच त्याचं त्या त्या पातळीवरचं ब्रह्म किंवा त्याचा त्याचा देव होय. हे सारं समजून घ्यायला आणि शिकायला जो जाईल, त्याचा अर्थातच 'समजून घेणं' हाही एक आनंद होय. म्हणजे हे समजून घेणाऱ्याचा 'जिज्ञासा' हा पहिला देव होय.

म्हणून उपनिषदांचा पहिला मंत्र 'तत्विजिज्ञासस्व। तद् ब्रह्म इति।' शिकून घेणाऱ्याचा आनंद शिकण्यात असतो आणि तोच त्याचा देव होय. आपण उपनिषदांचं आनंदाविषयीचं किंवा देवाच्या खऱ्या स्वरूपाविषयीचं म्हणणं समजावून घेताना 'या जिज्ञासा देवाला' प्रार्थना करून पुढं निघालेलं बरं. या पुढच्या सगळ्या प्रवासात आनंदाचे वेगवेगळे प्रकार आणि श्रेणी कुठल्या हे समजून घेण्यासाठी ज्या चिकाटीनं आणि तटस्थतेनं साधना करावी लागेल, त्याला उपनिषदं 'तप' असं म्हणतात आणि अर्थातच त्याचा आनंद हाही एक 'तपदेव' होय. हे 'तपब्रह्म'आपल्याला पुढचं सारं समजून घ्यायला मदत करील.

समजून घ्यायला लागल्यावर प्रथम बऱ्याच माणसांचा देव किंवा आनंद हा 'शरीर' किंवा त्याच्या पोषणासाठी लागणारं 'अन्न' हा असतो, हे लक्षात येतं. 'अन्नं ब्रह्मेति व्यजानात्।' सामान्य माणसाची विचार करण्याची कुवत ही शरीराच्या

सुखापलीकडं जात नाही आणि तोच त्याचा 'देव' असतो, हे आपल्याला सहज पटण्यासारखं आहे. म्हणून खाण्यापिण्यात, हिंडण्याफिरण्यात, कपड्यालत्त्यात, दागदागिन्यात आनंद मानणारं जग कशाला देव मानून बसलेलं आहे आणि ते खऱ्या देवाच्या दृष्टीनं नक्की कुठं आहे, हे आपल्या लगेच लक्षात येतं.

अधिक विचार केला तर जगण्याची धडपड किंवा काहीही करून जिवंत राहावं असं वाटणारे लोक 'प्राणो ब्रह्मति व्यजानात्।' म्हणजे 'प्राण' टिकणं हाच आनंद आहे किंवा 'प्राण' हाच देव आहे, असं मानून जगतात.

पण आपला हा अनुभव असेल की, अधिक उच्च आनंदासाठी उपाशी राहाणारी म्हणजेच 'अन्न ब्रह्म' न मानणारी माणसंही आपल्याला दिसतात. ती शरीरकष्टांची पर्वा करीत नाहीत. हिंडणंफिरणं, कपडालत्ता याचीही ही माणसं फारशी पर्वा करीत नाहीत. त्याचबरोबर जिवाची क्षिती न बाळगता उच्च आनंदासाठी धडपडणारी माणसं 'प्राणं ब्रह्म'ही न मानता पुढे जातात. ती त्यांचं ध्येय किंवा मनानं घेतलेली गोष्ट अधिक श्रेष्ठ मानतात. ते प्राप्त करण्यातच त्यांचा आनंद असतो. 'मनो ब्रह्मेति व्यजानात्' हे मानणारी माणसं मनोदेवाचे उपासक होत.

वरचे सारे प्रकार हे शेवटी प्रामुख्यानं स्वत:वर अवलंबून असणारे प्रकार आहेत. त्याही पलीकडं जगाला अस्तित्व आहे. स्वत:च्या व त्या साऱ्या जगाच्या साध्या आणि विशेष ज्ञानामध्ये खरा आनंद आहे असं मानणारी ही माणसं 'विज्ञानम् ब्रह्मेति व्यजानात्' या वर्गातली माणसं होत. त्यांचा आनंद हा सर्व 'ज्ञाना'च्या प्राप्तीवर आहे. त्या प्राप्तीसाठी ती माणसं शरीराकडं दुर्लक्ष करू शकतात, मनाच्या ओढीच्या विरुद्ध जाऊ शकतात, वेळी प्राणही देऊ शकतात. हे लोक 'विज्ञानब्रह्मा'चे किंवा 'विज्ञानदेवा'चे उपासक होत.

आनंदाचा शेवटचा आणि सर्वश्रेष्ठ प्रकार हा केवळ 'आनंद' हाच देव मानणारे होत. सुरुवातीला वर्णन केल्याप्रमाणं अत्यंत निरुपाधिक, कुणावरही, कशावरही अवलंबून नसलेला आनंद हेच त्यांच्या आयुष्यातलं 'उपास्य दैवत' असतं. शरीर, प्राण, मनाच्या ओढी, ज्ञानाचं आकर्षण, या सगळ्यांवर ते सहज मात करतात आणि शुद्ध आनंदामध्ये आयुष्यभर राहण्याचा प्रयत्न करतात. हे मानणारी ही माणसं 'आनंदो ब्रह्मेति व्यजानात् ।' या श्रेष्ठ वर्गातली माणसं होत.त्यांचा आनंद

निरुपाधिक असल्यामुळं धडधाकट शरीरप्रकृती, आजारपणं, लोकान्त-एकान्त, सधनता-निर्धनता, यश-अपयश अशा कुठल्या परिस्थितीनं त्यांचा आनंद वाढत नाही आणि कमीही होत नाही. लौकिक देवधर्म, उपासना, यात्रा अशा गोष्टी असल्यानं किंवा नसल्यानं त्यांच्या 'आनंद देवाच्या' उपासनेत वाढ किंवा घट होत नाही. सामान्य माणसालासुद्धा अवश्य गाठण्यासारखं हे खऱ्या देवाचं स्वरूप होय.

जिज्ञासेच्या वृत्तीनं हा सारा आनंदाचा अभ्यास आपण केला तर आजही आपल्याला तो खऱ्या आनंदाची प्राप्ती करून देईल.

*

२२. भेदांपलीकडं

माणसाला जीवनात इतक्या भेदांना सामोरं जावं लागतं की, त्यांच्यात सुसंवाद घडवताना त्याची निम्मी शक्ती खर्ची पडते. एखादी गोष्ट करावी म्हणून सांगणारे भेटतात, तसंच करू नये म्हणून सांगणारेही भेटतात. एखादी गोष्ट चांगली आहे म्हणून सांगणारे भेटतात, तसं ती चांगली नाही म्हणून सांगणारे भेटतात. साध्या व्यवहारातल्या गोष्टीपासून माणसाची भेदांना सुरुवात होते, ती प्रत्यक्ष देव आहे-नाही, एक आहे-अनेक आहेत इथंपर्यंत सर्व विषयांत हे भेदभाव त्याचा पाठपुरावा करीत राहातात. त्यात निसर्गानं निर्माण केलेले काळा-गोरा, उंच-ठेंगू, मंद बुद्धी-तीव्र बुद्धी असे भेदभाव हे तर त्याच्या पाचवीला पुजलेले आहेत. त्यात माणूस स्वतःच्या अल्पबुद्धीनं वंश, वर्ण, जाती, पंथ, आचारप्रणाली, राज्य, देश, वेळी देवही - अशा अनेक भेदांची अनादिकालापासून अगणित भर टाकीत आहे, ती वेगळीच.

निसर्गाचे भेद हे एक प्रकारे अपरिहार्य असले तरी माणसानं निर्माण केलेले भेद मात्र कितीतरी प्रमाणात परिहार्य आणि कमी करण्याजोगे असतात. तसं पाहिलं तर भेद असायला काही हरकत नाही. काही भेद काही वेळा उपयोगी ठरणारेही असतात. पण असे काही मोजके अपवाद सोडले तर उरलेल्या सगळ्या भेदांनी माणसाच्या जीवनात दुःखच निर्माण केलेलं आहे. त्याची हानीही घडवलेली आहे. अशा वेळी या भेदांचा निरास करण्यासाठी प्रयत्न करण्याची माणसाला गरज वाटणं स्वाभाविक आहे.

माणसाची सामान्य प्रवृत्ती पाहिली तरीसुद्धा त्याला भेदभावाची वागणूक मिळाली तर नको वाटते. त्याला एखाद्यानं श्रेष्ठ-कनिष्ठ, जवळचा-लांबचा, आतल्या गोटातला-बाहेरच्या गोटातला, आपल्या पक्षाचा-दुसऱ्या पक्षाचा अशी वागणूक दिली तर ते त्याला अपमानाचं वाटतं. त्याचा त्याला राग येतो. पण त्यातही त्याला दोन्हीचा राग येत नाही, म्हणजे जवळचा म्हणून वागवल्याबद्दल राग नसतो, आतल्या गोटातला म्हणून वागवल्याबद्दल राग नसतो तर लांबचा किंवा बाहेरच्या गोटातला म्हणून वागवल्याबद्दल त्याला राग येतो. त्याचबरोबर

हाच विचार दुसऱ्याच्या बाबतीत करताना मात्र त्याला जवळचा म्हणून एखाद्यानं वागवल्याबद्दल ह्याला राग येतो.

यावरून भेदभावांचा त्याला सरसकट राग नसून आपल्या सोयीनुसार त्याला भेदभाव हवेच असतात, असं उलट लक्षात येईल. म्हणून एका बाजूनं भेदभावानं त्रासलेला आणि म्हणून भेदभावांविरुद्ध ओरडणारा माणूस दुसऱ्यानं आपल्या बाबतीत आपल्या सोयीचे भेदभाव करावेत, अशी अपेक्षा ठेवतो आणि इतरांच्या बाबतीतसुद्धा आपल्या सोयीनुसार भेदभाव करून मोकळा होतो. म्हणून हा भेदभावांचा तिढा हजारो वर्षं तसाच कायम आहे.

खरं पाहाता, भेदभाव हा हानिकारकच आहे आणि तो जितका नाहीसा होईल तितका माणसाला आनंदाच्या दृष्टीनं हिताचाच आहे. जो थोडाफार भेदभाव माणसाला चालतो असं दिसतं, ते त्याचं भेदभावावरचं प्रेम नसून तो त्याचा स्वार्थ असतो. त्याला खऱ्या अर्थानं भेद नाहीसा केल्याशिवाय स्वत:लाही सुख लागत नाही आणि बाहेर समाजातही सुख लागत नाही. म्हणून भेदापलीकडं जाण्यासाठी खऱ्या अर्थानं जे प्रयत्न केले जातील ते मानवजातीच्या आंतरिक आणि बाह्य कल्याणाचेच ठरतील, यात शंका नाही. असे प्रयत्न फार पुरातन काळापासून सुरू आहेत. त्यांतला उपनिषदांचा प्रयत्न आपण थोडक्यात समजून घेऊ.

उपनिषदांचा प्रयत्न हा निसर्गातल्या मूलभूत भेद व अभेद या तत्त्वांवर आधारलेला आहे. निसर्गानंसुद्धा माणसात काळागोरा, उंचठेंगू असा भेद केला असला तरी, थोडं पुढं जाऊन पाहिलं तर हा भेद नसून ते वैविध्य आहे. त्याचबरोबर एखाददुसऱ्या बाबतीत असलेल्या वैविध्याबरोबर माणूस म्हणून अन्य जवळजवळ सर्व बाबतीत निसर्गानं अभेदच ठेवला आहे. म्हणूनच गोऱ्या माणसाला हात-पाय-डोळ्यांची जी आणि जेवढी देणगी निसर्गानं दिली आहे तितकी आणि तेवढीच देणगी त्यानं काळ्या माणसालाही बहाल केली आहे. हे केवळ बाह्य गोष्टीबद्दल नाही तर, मन, बुद्धी, अंत:करण अशा आतल्या कुठल्या देणगीबद्दलही निसर्गानं भेद केलेला नाही. या साऱ्यात सर्वांत प्रधान असलेली जिवंतपणाची किंवा चैतन्याची देणगी सर्व माणसांना तितकीच समान आहे.

हे लक्षात घेऊन उपनिषदांनी सर्व माणसांतला आत्मा किंवा चैतन्य हा सर्व भेदांपलीकडं जाण्याचा महत्त्वाचा मुद्दा धरला आहे. आजही सर्व भेदांवर मात

करण्यासाठी तो तितकाच उपयोगी आहे. एखाद्या साध्या घरामध्ये पाच-सात माणसं वावरतात. ती शरीर, शिक्षण, कुवत अशा अनेक बाबतीत भिन्न असली, त्यांच्यात अनेक प्रकारचा भेद असला तरी आपण एका कुटुंबातले आहोत, अशा स्वरूपाचा किंवा आपली उपासना एक आहे अशा स्वरूपाचा सर्वांना एकत्र आणणारा एखादा मुद्दा समोर ठेवला तर एकमेकांतले भेद कमी होतात, भेदांमुळं चौघांची तोंडं चार दिशांना अशा वृत्तीमुळं होणारं नुकसान टळतं. उलट एकमेकांना समजून घेऊन एकत्र राहून आपल्या कुटुंबाचं आणि व्यक्तीचं जे ध्येय असेल ते साध्य करण्यात असा सर्वांना समान असलेला मुद्दा समोर ठेवणं किती उपयोगी होतं, हे आपण पाहातोच. मोठ्या पातळीवर मानवता किंवा उपनिषदांच्या भाषेत सर्वांना एकपणानं वावरणारं चैतन्य हा मुद्दा समोर ठेवून इतर भिन्नतेकडं किंवा वैविध्याकडं पाहिलं तर भेदापलीकडं जाणं आणि आनंदात राहणं आपल्याला जरूर शक्य होईल.

ईश्वरविषयक ज्ञान हे खरं म्हणजे माणसातली भिन्नता बाजूला ठेवून त्याला चैतन्याच्या एका मुद्यावर एकत्र आणण्यासाठी व त्याची प्रगती घडवून आणण्यासाठी निर्माण झालेलं आहे. हे ज्ञान देणारे धर्म, पंथ किंवा त्यांतले ज्ञानी अनेक असल्यानं त्यामधूनही मनुष्य भेदांच्या चक्रात सापडतो आणि तुमचे गुरू-आमचे गुरू, तुमचा पंथ-आमचा पंथ, तुमची उपासना-आमची उपासना असल्या भेदांना बळी पडतो. परिणामी दुःख आणि नुकसान होतं. अशा वेळी माणसांनी भिन्न भिन्न ज्ञानी माणसांकडं आणि ते देत असलेल्या ईश्वरी ज्ञानाकडं कसं पाहावं, हे सांगण्यासाठी उपनिषदांनी एक सुरेख दृष्टांत दिला आहे.

ऋषी म्हणतात, वेगवेगळ्या पंथांच्या मार्गानं, उपासनेच्या मार्गानं ईश्वरी ज्ञान देणारे जे वेगवेगळे गुरू आपल्याला दिसतात, ते वेगवेगळ्या गाईंसारखे समजावेत. 'गवां अनेक वर्णानाम्' ते ज्या ईश्वराचं ज्ञान देतात ते दुधासारखं समजावं. ते दूध सर्वत्र एकच असतं. म्हणून शहाण्यानं पंथापंथाच्या आणि गुरू-गुरूंच्या मुद्यावर भेद किंवा वाद न करता ते देत असलेलं ज्ञान हा महत्त्वाचा मुद्दा समजावा. त्याच्या हे लक्षात येईल की, हे ज्ञानी वेगवेगळे असले तरी ते देत असलेलं ज्ञान मात्र दुधासारखं सर्वत्र एकच आहे.'क्षीरवत् पश्यते ज्ञानम्'. आपण आपला अनुभव पाहिला तर अनेक धर्मांची तत्त्वं मुळात सारखीच असतात, आचरणासाठी त्यांनी दिलेले आदर्श सारखेच असतात, पंथ कोणतेही असले तरी

सर्व संतांच्या सांगण्याचा भावार्थ एकच असतो. आपण ज्यावेळी ते विचारात न घेता धर्मांच्या किंवा पंथांच्या नुसत्या नावावर जातो त्यावेळी मात्र भेद दिसतात. इतकंच नव्हे तर, त्यावरून पुढे धर्माधर्मांतला, गुरू-गुरूंतला वाद-वितुष्ट, युद्धंही जन्माला येऊ शकतात.

वास्तविक पाहिलं, तर उपनिषदांनी दिलेल्या उदाहरणाप्रमाणं हे भेद 'जलचंद्रवत्' आहेत. म्हणजे चंद्र एकच असूनही वेगवेगळ्या ठिकाणी पाण्यात जसं चंद्राचं अनेक प्रकारचं प्रतिबिंब दिसतं. अशी प्रतिबिंब कितीही प्रकारची, वेगवेगळ्या स्वरूपाची दिसली तरी मूळ चंद्राकडं लक्ष ठेवल्यास हा भेद दिसत नाहीसा होतो आणि एकाच शीतल चंद्राचं आल्हाददायक दर्शन होऊ शकतं. तसं या वरवरच्या भेदांकडं, पंथांकडं, गुरूंकडं पाहताच माणसानं मूळ भावार्थाकडं लक्ष ठेवलं तर, त्याला हे भेद जाचक ठरणार नाहीत.

या दोनही उदाहरणांचं वैशिष्ट्य असं की, काही वेळा भेद मुळाशी दिसतात काही वेळा ते विस्तारात दिसतात. ते समजून घेण्यासाठी एक सोपा मार्ग आहे. अशा वेळी अनेकत्व वा भेद मुळाशी दिसले तर 'गाई अनेक, पण दूध एक' या न्यायानं मुळाशी भेद दिसले तरी परिणामांत वा विस्तारात एकत्व असतं, हे समजून घ्यावं.

तसंच अनेकत्व वा भेद विस्तारात वा परिणामांत दिसले तर, जलचंद्राच्या उदाहरणाप्रमाणं प्रतिबिंबात अनेक चंद्र दिसले तरी, मूळ चंद्र एकच या न्यायानं परिणामांत वा विस्तारात भेद दिसले तरी मुळात एकत्व आहे हे समजून घ्यावं.

सर्वत्र एकत्वाकडं दृष्टी ठेवण्यानं आपल्याला भेदांपलीकडं तर जाता येईलच, पण शांतता आणि प्रगतीही साधता येईल.

*

पुरातन काळापासून आजपर्यंत ज्ञान देणारे आणि ज्ञान घेणारे ही परंपरा अविरत चालत आलेली आहे. अध्ययन आणि अध्यापन, गुरू आणि शिष्य या कल्पना पूर्वीच्या काळीही प्रचलित होत्या आणि ज्ञानाची क्षेत्रं कितीही विस्तारली तरी अधिकाधिक विकसित स्वरूपात त्या आजही प्रचलित आहेत.

फक्त आजच्या परिस्थितीत असं अनेकदा आढळून येतं की, शिकवणाऱ्याला विद्या येत असली, त्याच्या विशिष्ट विषयाच्या बाबतीत तो तज्ज्ञ असला तरी माणूस म्हणून तो अनेकदा इतर सामान्य माणसांसारखा असू शकतो. पर्यायानं इतर माणसांसारखाच तो स्वार्थी, आग्रही असू शकतो.

त्यामुळंच असं आढळून येतं की, शिष्याला ज्ञान देताना गुरू स्वतःचं महत्त्व राखील, हातचं राखून देईल, मी सांगतो तसंच कर असा आग्रह धरील, आपल्या वागण्यातल्या इतर त्रुटी, चुकीच्या गोष्टी आदींचं समर्थन करील, त्यानं शिकवलेलं सगळं शिष्यानं शब्दशः आणि पूर्ण पाळावं असा आग्रह तो धरील, विशेषतः आपण जे सांगतो आहोत, विषय जसा शिकवतो आहोत किंवा आपल्या ग्रंथांत जे सांगितलं आहे ते सर्व त्यानं खरं धरावं, त्याच्या चूक-बरोबरपणाविषयी शिष्यानं शहानिशा करू नये, त्यावर प्रयोग करून ते चूक-बरोबर ठरवू नये असा त्याचा दुराग्रह राहील. किंबहुना प्रयोगशील राहून शिष्याला योग्य वाटणारं त्यानं स्वीकारावं किंवा अयोग्य वाटणारं त्यानं टाकावं असं सांगण्याचा मोठेपणा फार क्वचित आढळून येतो.

ही परिस्थिती आज आहे असं नव्हे तर पूर्वीच्या काळापासून ती तशीच चालत आलेली आपल्याला दिसून येईल.

पूर्वीच्या वातावरणाप्रमाणं असे प्रयोग करणारा किंवा गुरूंचं या बाबतीत न ऐकणारा, गुरूंच्या क्रोधाचा किंवा शापाचा विषय झाल्याचंही आपल्याला आढळून येईल. त्याला माणूस म्हणून दोन-तीन कारणं असल्याचं आपल्याला दिसून येईल. पहिलं म्हणजे जो विषय ते शिष्याला शिकवतात त्या विषयात आपण पूर्ण तज्ज्ञ असून त्यात आपलं ज्ञान म्हणजे जणू काही शेवटचा शब्द

आहे, अशी स्वत:ची ठाम समजूत.

दुसरं म्हणजे समजा, त्या ज्ञानात शिष्यानं प्रयोगाच्या मार्गानं किंवा स्वत:च्या अभ्यासानं काही त्रुटी किंवा चुका दाखवल्या तर त्याच्या आपल्याबद्दलच्या आदराच्या प्रतिमेला तडा जाण्याची अकारण भीती. तिसरं म्हणजे स्वत:चं महत्त्व त्या ज्ञानाच्या किंवा गुरुत्वाच्या निमित्तानं प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती. या साऱ्या प्रवृत्ती अगदी संगीतापासून संगणकापर्यंत कुठल्याही क्षेत्रात नांदताना आपल्याला अनेकदा आढळतील.

मानवी प्रवृत्ती म्हणून जरी आपण हे समजून घेऊ शकलो तरी, ही प्रवृत्ती माणसाचा अपरिपक्वपणा दाखवते आणि त्यामुळं ती त्याज्य आहे हे स्पष्ट होण्यासारखं आहे. या प्रवृत्तीमुळं ज्ञानाच्या विकासाला मर्यादा पडतात, नवनवीन परिस्थिती आणि अनुभव यांचा समावेश ज्ञानात होऊ शकत नाही, त्यामुळं ते ज्ञान शिळं व कालबाह्य बनत जातं, शिष्याचा विकास खुंटतो, नवा विचार करण्याची क्षमता कमी होते. - हे सगळे धोके उघड आहेत. त्यातून मानवी संबंधांची जी हानी होते ती तर याहूनही मोठी आहे. कारण प्रत्येक माणसाला स्वाभाविकपणे स्वातंत्र्याची अपेक्षा आहे. खऱ्या अर्थानं एकमेकांविषयी विश्वास, प्रेम व आदर या भावनांची गरज आहे आणि त्यावरच गुरूंच्या अशा थोड्याशा कोत्या प्रवृत्तीमुळं आघात होतो, असंही दिसून येईल.

ज्ञानाचे जे दोन मुख्य प्रकार असतात - भौतिक विद्या आणि आत्मविद्या - त्या दोनही बाबतीत या प्रवृत्तीचा जाताजाता विचार केलेला उपयोगी ठरेल, असं वाटतं. भौतिक विद्येमध्ये ती विद्या मिळवणारा माणूस हा त्या विद्येपुरता गुरू होतो. माणूस म्हणून तो इतरांसारखाच सामान्य असू शकतो. म्हणूनच एखादी व्यक्ती शास्त्रज्ञ म्हणून जागतिक कीर्तीची असू शकते आणि त्याच वेळेला तरी व्यक्ती काम-क्रोध-लोभाच्या बाबतीत एखाद्या सामान्य माणसासारखी असू शकते. तर आत्मविद्येच्या बाबतीत ती विद्या मिळत जाण्याबरोबर माणसात माणूस म्हणून बदल होत जाणं अपेक्षित असतं. त्यामुळं या दोनही विद्यांच्या संदर्भात वर पाहिलेली गुरूची भूमिका महत्त्वाची ठरते.

आता ही त्रुटी बाळगणारे गुरू पुरातन काळापासून आजपर्यंत आहेत असं आढळलं तरीही, उपनिषदांच्या अतिपुरातन काळातसुद्धा या प्रवृत्तींचा विचार, त्यावर

उपाय व त्याचं प्रत्यक्ष आचरण करणारे गुरू उपनिषदांत भेटतात, हे पाहून आपल्याला खचितच आनंद आणि प्रेरणा मिळेल, असं वाटतं. त्याची दोन विषयांच्या संदर्भातली उदाहरणं आपण नमुन्यादाखल पाहू.

गुरूंची भूमिका दोन प्रकारची आहे. एक स्वत: सहवासात राहून बोलण्याचालण्यातून, वागण्यातून, प्रत्यक्ष उपदेशातून शिकवणं आणि दुसरं म्हणजे त्यांनी त्यांचा उपदेश किंवा शिकवण मांडण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या ग्रंथांतून शिकवणं. या दोन्हीही बाबतीतलं गुरूंचं औदार्य आणि थोरपण दर्शवणारे पुढील उद्‌गार आपण अवश्य शिकावे आणि आचरावे, असे आहेत. उपनिषत्कार ऋषी उपदेशग्रंथांच्या बाबतीत शिष्याला शिकवताना म्हणतात की, 'शहाण्या शिष्यानं सर्व ग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा आणि त्यातलं टिकाऊ, उपयोगाला येणारं, कालातीत सत्य ठरणारं ज्ञान स्वीकारावं आणि ग्रंथातला किंवा उपदेशातला इतर मजकूर टाकून द्यावा.' आपल्या शिष्याला एवढी मोकळीक देणारे उपनिषत्कार, ऋषी मनाच्या किती उदार आणि आदर्श भूमिकेवर असतील, हे नुसतं कळूनही आनंद वाटतो, तर अशांचा शिष्य बनण्यामध्ये किती आनंद असेल !

हाच मुद्दा उदाहरणानं स्पष्ट करताना उपनिषदात म्हटलं आहे की, कांडून ठेवलेलं धान्य असावं तसे ग्रंथ असतात. जरी ते उपदेशाचे असले, जरी ते गुरूच्या अनुभवांवर आधारलेले असले तरी त्यांच्यात फोलकट असू शकतं. म्हणून धान्यार्थी मनुष्य जसा पाखडून, फोलकट बाजूला करून टाकतो, तसं खऱ्या शिष्यानं ग्रंथांतला कालबाह्य, ठिसूळ, बदलणं आवश्यक असलेला भाग नि:शंकपणे टाकून द्यावा. हे लिहायला सोपं असलं तरी, त्यासाठी आपल्या लिखाणात किंवा ग्रंथात काही टाकण्याजोगं असू शकेल हे मान्य करायला गुरूच्या मनाचा किती मोकळेपणा आणि औदार्य लागेल, याची कल्पना आपण करू शकतो. यात शिष्यांच्या स्वतंत्र बुद्धीला जितका वाव आहे, तितकीच त्यांच्यावर सारअसार निवडण्याची मोठी जबाबदारीही आहे.

याही पलीकडं गुरूंच्या सहवासातून शिकण्याचा जो पहिला प्रकार आपण वर पाहिला त्याबाबतीत उपनिषदांतल्या गुरूंपासून कुणीही शिकावं, असा आदर्श त्यांच्या उपदेशात आहे. उपनिषदांतले आचार्य शिक्षण पूर्ण होऊन घरी परतणाऱ्या आपल्या शिष्याला 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, अतिथि देवो भव' असा उपदेश

करताना 'आचार्य देवो भव' - गुरूला देव मान - असं जरूर सांगतात, पण त्याचबरोबर हेही सांगण्याचा मोठेपणा दाखवतात की, 'अस्माकं यानि सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि' - अर्थात माझ्या वर्तनात जे जे चांगलं आणि आदर्श आहे त्याचं तू पुढं अवश्य अनुकरण कर, पण जे जे अनादर्श असेल, बरोबर नसेल त्या माझ्या इतर वर्तनाचं तू कधी अनुकरण करू नकोस.

ज्या शिष्याला बारा वर्षं घरी ठेवून घेतलेलं आहे, मुलासारखा सांभाळलेला आहे, ज्याला स्वत:जवळची अमूल्य विद्या दिलेली आहे, त्याला निरोप देताना हा उपदेश करण्याचा प्रांजळपणा आणि औदार्य आपल्याला विचार करायला लावणारं आहे. व्यक्ती म्हणून माझंही काही चुकू शकतं, माझ्या ठिकाणीही काही अनादर्श गोष्टी असू शकतात, हे ओळखण्यासाठी लागणारं संतुलन, तटस्थवृत्ती व धाडस हे तर या गुरूंच्या ठिकाणी आहेच, पण त्याचबरोबर शिष्याला निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य देण्याचा मोठेपणा आणि त्याच्या निर्णयशक्तीवरचा विश्वासही प्रेरक आणि आश्वासक आहे.

हजारो वर्षांपूर्वीचा हा आदर्श आपल्याला आजही विचारप्रवृत्त करील अशी खात्री वाटते.

२४. उपासनेचे टप्पे

उपासना करण्याची गरज उपनिषदांनी वेगळ्या पद्धतीनं आणि नेमकेपणानं मांडली आहे. त्यांच्या दृष्टीनं ज्याला ज्ञान हवं असेल त्यानं प्रथम उपासना केली पाहिजे. ज्या माणसाला लौकिक शिक्षण आहे, तो आपण सुशिक्षित समजतो. असा मनुष्य म्हणजे त्या काळातला 'मंत्रवेत्ता' माणूस होय.

अशा लौकिक शिक्षण झालेल्या माणसाचं शिक्षण खऱ्या अर्थानं झालं आहे की नाही हे कसं ओळखावं, याची खूण ही आपल्याला उपनिषदांत मिळते. त्यातला असा 'मंत्रवेत्ता' म्हणजे 'सुशिक्षित' हे शिक्षण झाल्यावर ओळखतो की, मी 'नुसता मंत्रवेत्ता'च झालो. मी 'आत्मवेत्ता' झालो नाही. म्हणजे मी शिक्षित किंवा सुशिक्षित झालो, पण 'आनंदी' झालो नाही. इतपत कळल्यामुळं हे त्या काळातले 'मंत्रवेत्ते' ऋषी 'आत्मवेत्त्या' ऋषींकडं जाऊन आपली वस्तुस्थिती कबूल करतात आणि मला आत्मविद्या किंवा आनंदाची विद्या कृपा करून सांगा, अशी विनंती करतात.

यात लक्षात घेण्यासारखं आहे की, त्या काळच्या सुशिक्षितांना आपल्याला काय येत नाही आणि महत्त्वाचं ज्ञान कोणतं याची स्पष्ट व नम्र जाणीव शिक्षणानं होत असे. त्यात त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. अशा जिज्ञासू मंत्रवेत्त्याला आत्मज्ञानाचा मार्ग सांगताना आत्मवेत्त्या ऋषींनी त्याला 'उपासनेची' जरूर असल्याचं सांगितलं आहे.

यावरून आपल्या असं लक्षात येईल की, आपली नेहमीची मंत्रतंत्र, जपजाप्य, स्तोत्रपाठ, पारायणं, तीर्थयात्रा असल्या कुठल्या उपासनेपेक्षा इथं अभिप्रेत असलेली उपासना वेगळी आहे. ही उपासना सांगताना ऋषींनी अनेक टप्पे सांगितलेले आहेत. त्यातील महत्त्वाचे टप्पे लक्षात घेण्यासारखे आहेत.

त्यांचं म्हणणं असं की, आजवर आपण शिकलेलं सर्व शब्दमय आहे. त्या अर्थानं ते सर्व 'नाम' आहे. 'सत्य' त्यापलीकडं आहे. हे ओळखणं ही पहिली 'नामोपासना' 'नामोपास्स्व' होय. या साऱ्या शिक्षणाचं मूळ असलेल्या 'वाणी'ची उपासना करणं ही दुसरी उपासना आहे. 'वाचम् उपास्स्व' या

सगळ्या शब्दज्ञानाला आणि त्याचा आधार असलेल्या 'वाणी'ला बांधू शकणारं माणसाचं मन समजून घेणं, ही तिसरी उपासना आहे. 'मन उपास्स्व' असं त्यांचं म्हणणं आहे.

त्याही पुढं जाऊन या मनाला कार्यरत करणारा 'संकल्प' श्रेष्ठ आहे. हे समजून घेऊन संकल्पशक्तीची उपासना करणं, ही चौथी गरजेची उपासना आहे. म्हणजेच 'संकल्पम् उपास्स्व'. पाचवी उपासना म्हणजे हे मनाचे संकल्पसुद्धा ज्यांतून उद्‌भवतात ते आपले संस्कार, मनाच्या खोल धारणा इत्यादींचं मूळ असलेलं चित्त अभ्यासणं, ही होय. म्हणजेच 'चित्तम् उपास्स्व' त्यांच्या दृष्टीनं सहावी उपासना म्हणजे ध्यानाचा अभ्यास होय.

कारण या सृष्टीमध्ये खरं तर अखंडपणे ध्यान सुरू आहे. आपल्याही अंतरंगामध्ये तसंच ध्यान सुरू आहे. चित्तासारखा खोल विषय समजून घ्यायलासुद्धा ध्यानशक्तीचीच गरज आहे. म्हणून 'ध्यानम् उपास्स्व' या पलीकडं गरजेच्या असलेल्या अजून दोन उपासना ऋषींनी सांगितल्या आहेत. त्या म्हणजे जडाचं आणि सूक्ष्माचं सातत्यानं आकलन करून देणारी 'विज्ञानाची' उपासना होय, म्हणून 'विज्ञानम् उपास्स्व'. याबरोबर कुठलीही उपासना करायची म्हटली तर माणसाला लागणारं शारीरिक व मानसिक बळ अपरिहार्य आहे. हे ओळखून त्यासाठी 'बलोपासना' करायलाही उपनिषदांनी आवर्जून सांगितलेलं आहे. म्हणून ते म्हणतात, 'बलम् उपास्स्व'.

उपनिषदांची ही उपासनेची कल्पना पाहिली की, आपल्या एक लक्षात येईल की, माणसाला सुशिक्षित करण्यापलीकडं जाऊन तो स्वत:ला सर्व मार्गांनी जाणून घेऊन आनंदमय कसा होईल, हे पाहण्याकडं त्यांचा कल आहे. त्यामुळं या उपासनांचा आपणही विचार केला आणि त्यानुसार वेळीच प्रयोग केला तर, आपल्यालाही या आत्मानंदाचा लाभ झाल्याखेरीज राहणार नाही.

*

२५. आगळीवेगळी व्रतं

उपनिषदांच्या काळातली व्रताची कल्पना वेगळी आणि व्यापक आहे. त्याचे नमुन्यादाखल चार प्रकार पाहाणं आपल्याला उद्‌बोधक ठरेल. त्यांतला पहिला प्रकार आपल्या वाणीचं नियमन करणं हा होय. या नियमनामध्ये त्यांना व्रत म्हणून हे अपेक्षित आहे की, या सृष्टीमध्ये निसर्गाच्या चक्रानुसार ज्या घटना होतात, त्यानं उद्विग्न होऊन त्यावर टीका करणं आपण टाळावं.

उदाहरणार्थ, सृष्टीच्या चक्रानुसार स्वधर्म म्हणून आणि या सृष्टीला ते अंतिमतः हिताचं होईल म्हणून सूर्य तापत असतो. केवळ आपल्याला उकाड्याचा त्रास होतो म्हणून सूर्याला दूषणं देणं योग्य नव्हे. तीच अवस्था सतत पाऊस पडून आपली गैरसोय झाली असता पावसाला नावं ठेवण्याच्या बाबतीत आहे. 'ऋतून् न निंदेत् । तद् व्रतम् ।' तीच गोष्ट आपल्याला काही वेळा त्रासदायक वाटणाऱ्या निसर्गातल्या ऋतूंच्या बदलाच्या बाबतीत आहे. या सगळ्याच वेळी आपण बेसावधपणे निंदा करीत जातो ते आवरणं, हे उपनिषदं व्रतच मानतात. तीच गोष्ट इतर पशुपक्षी आणि आपल्याबरोबर जगणाऱ्या लोकांबद्दल आहे, हेही लक्षात घेण्यासारखं आहे. ऋषी म्हणतात,'पशून् न निंदेत् । लोकान् न निंदेत्। तद् व्रतम् ।'

यांतला व्रतांचा दुसरा प्रकार हा - मी मनानं संकुचितपणाचा व लघुकोनाचा किंवा कोतेपणाचा त्याग करावा - असं सांगणाऱ्या व्रतांचा आहे. माणसानं 'माझा आनंदी व्हायचा योगच नाही' असं कधी म्हणू नये तर, आनंदी व्हायला लागणारं मोठं मन आपल्या ठिकाणी कसं येईल, याचे प्रयत्न करावेत. हे प्रयत्न एखादी उपासना सांभाळावी तसे आपण करू शकू का, याचा विचार करण्याची खरी गरज आहे. यासाठी ते व्रत म्हणून सांगतात की,'महामनाः स्यात्। तद् व्रतम्।' म्हणजे मोठ्या मनाचा होणं हे माझं कर्तव्य व उपासना आहे.

तिसरा प्रकार असा की, मी माझ्या परीनं वाणी आवरून किंवा मनाचा संकुचितपणा टाकून जो प्रयत्न करीत आहे, त्याला इतरांसंबंधीच्या आपल्या

भूमिकेची जोड देणं. ही जोड द्यायला त्यांनी एक व्रत सांगितलं आहे. ते म्हणजे इतरांच्या ठिकाणी आपण स्वतः आहोत, अशी कल्पना करणं आणि त्यानुसार आपण कसे वागू किंवा काय वागणं अपेक्षित करू तसं वागण्याचा प्रयत्न करणं. सर्व ठिकाणी मीच आहे, असं समजून वागण्याला त्यांनी 'सर्वम् अस्मि इति उपासीत । तद् व्रतम् ।' असं म्हटलं आहे.

या सर्वांत महत्त्वाचं आणि वेगळं वाटणारं एक व्रत त्यांनी सांगितलं आहे. ते म्हणजे जास्तीत जास्त प्राणाप्रमाणं किंवा आत्म्याप्रमाणं राहण्याचं. याचे गुण आपण पूर्वीच पाहिले आहेत. त्या गुणांनुसार शरीरस्वरूप किंवा मनस्वरूप न राहता प्राणस्वरूप राहणं याला ते फार महत्त्वाचं व्रत समजतात. म्हणून ते म्हणतात की, एकच व्रत 'आचरेत प्राण्याच्चैव अपान्याच्च ।'

तसं पाहिलं तर हे एक व्रत जरी आचरता आलं तरी, त्यात इतर सर्व व्रतंही येतील व आपल्याला आनंदी जीवनही जगता येईल.

*

अग्नीला आहुती देऊन यज्ञ करण्याचा विधी पूर्वापर असला तरी उपनिषदांमध्ये आलेले काही यज्ञ किंवा होम जरा विचार करण्यासारखे आहेत. त्यांतला एक म्हणजे 'आंतरिक होम'. ऋषींचं म्हणणं असं की, माणसामध्ये दोन यज्ञ सतत आलटून पालटून चालू आहेत. एक श्वासाचा आणि दुसरा वाणीचा. हे दोन महत्त्वाचे असण्याचं त्यांच्या दृष्टीनं कारण असं की, यांतला एक चालू असतो तेव्हा दुसरा चालू नसतो. म्हणजे माणूस बोलतो त्या वेळेला तो श्वास घेत नाही आणि ज्या वेळेस श्वास घेतो त्या वेळेस तो बोलत नाही. त्यामुळं या दोन गोष्टींकडं त्यानं विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

याचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे माणूस जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत हे आतले दोनही यज्ञ अखंडपणे सुरू राहतात. म्हणून त्यांचं म्हणणं असं की, या दोनही क्रियांचं - म्हणजेच 'श्वास आणि वाणी' माणसानं जर नियमन केलं तर या आंतरिक यज्ञाचा किंवा अग्निहोत्राचा त्याला अधिक लाभ आहे. तुलनेनं पाहिलं तर, बाहेरच्या यज्ञाच्या आहुती मर्यादित, कर्ममय आणि थांबणाऱ्या आहेत. तर आंतरिक यज्ञाच्या आहुती अखंड, सहज आणि अधिक परिणामकारक व फलदायी आहेत.

हे जाणून प्राणाची-श्वासाची व वाणीची उपासना करणारे लोक त्या काळात फार प्रचलित असलेली बाह्य अग्निहोत्रं किंवा यज्ञसुद्धा करीत नसत, असं उपनिषदांनी लिहिलं आहे, हे विशेष आहे. या बाबतीत वाणीची उपासना करणं किंवा आहुती देणं म्हणजे काय ? आणि प्राणाची किंवा श्वासाची उपासना करणं म्हणजे काय ? हा विषय जिज्ञासूंनी अधिक खोलात जाऊन विचार करण्यासारखा आहे.

याचबरोबर उपनिषदांनी सांगितलेला एक महत्त्वाचा होम हाही विचार करण्यासारखा आहे. इतर कितीही होम केले तरीही हा सर्वश्रेष्ठ होम माणसानं अवश्य करावा असाच आहे. तो म्हणजे स्वतः 'मी'पणाचा त्याग करणं होय. सूत्र असं आहे 'मी स्वतःचाच स्वतः होम करीत आहे.' 'अहमेवाहं माम्

जुहोमि । स्वाहा ।'

यापासून अनेक अर्थ निघू शकतील. त्यांतला एक साधा अर्थ असा की, अखेर माणसाला भगवंताच्या किंवा आनंदाच्या आड येते ती परिस्थिती किंवा इतर काही नसून स्वत:चा 'मी'च आड येतो. त्यामुळं त्याचा स्वाहाकार होणं हे गरजेचं आहे. त्याचं स्मरण या मंत्रामुळं आपल्याला होऊ शकेल.

दुसरं असं की, माणूस कितीही अजिंक्य झाला तरी दुसरी माणसं, परिस्थिती, निसर्ग यातलं काही ना काही त्याच्या 'मी'चा पराभव करतंच. जर माणूस स्वत:ला शहाणा किंवा समजूतदार समजत असेल, तर त्यानं ही वेळ येऊ न देता स्वत:च या 'मीपणा'चा होम करावा, हे अधिक औचित्याचं नाही काय ?

*

२७. सर्वश्रेष्ठ दान

उपनिषदांच्या कल्पनेनुसार माणसाच्या जीवनात अगदी प्राथमिक पातळीवर तरी अन्नाला जेवढं महत्त्व आहे तेवढं इतर कुठल्या गोष्टीला क्वचितच असेल. म्हणून अन्न भरपूर पिकवणं, करणं, देणं याला त्यांनी व्रतच म्हटलं आहे. त्यातच अन्न कसंही मिळालं तरी त्याला नावं न ठेवणं या व्रताचाही समावेश आहे. उदाहरणार्थ 'अन्नं न निन्द्यात् । तद् व्रतम् ।'

त्यालाच धरून दानाच्या बाबतीत ते 'अन्नदान' हे सर्वश्रेष्ठ मानतात. त्यामागची त्यांची भूमिका अशी की, अन्नामुळं प्राण, प्राणामुळं बल, बलामुळं तप आणि पुढं तपामुळं श्रद्धा-मेधा-मनोजय-मनन-शक्ती या मार्गानं शेवटी आत्मसाक्षात्कारापर्यंतचं सर्व काही होत असतं. म्हणून माणसानं अन्नदान करावंच, पण ते करताना या अन्नदानामुळं हे सर्व व्हावं एवढ्या व्यापक भूमिकेनंही करावं. स्वीकारणाऱ्यानंही या भूमिकेचं भान ठेवून ते स्वीकारावं. या अर्थानं ते म्हणतात, 'तस्मात् अन्नं ददन्, सर्वाणि एतानि ददाति ।'

म्हणजे एवढ्या मोठ्या भूमिकेनं अन्न दान दिलं, तर बल-तप-श्रद्धा अशा व्यापक गोष्टींचं दान दिल्यासारखं- देणाऱ्याच्या बाजूनं घडेल अणि जर घेणाऱ्याला या 'अन्नदाना'च्या व्यापकतेची कल्पना असेल, तर तो नुसतं अन्न स्वीकारीत नसून 'बल-तप-श्रद्धा-मनोजय' इथंपर्यंत सारं स्वीकारीत आहे, या दृढ श्रद्धेनं अन्नदान स्वीकारील - जे उभयतांचंही कल्याण करील.

*

२८. मनच बंधमुक्तीचं कारण

माणसाचा व्यवहार असो किंवा त्याचा हा आत्मविद्येचा प्रवास असो, सर्वत्र खरी भूमिका मनच बजावीत असतं. मनानंच मनुष्य निर्भयही होतो आणि भयभीतही होतो. मनानंच मनुष्य उभारी धरतो आणि महत् कार्यही करतो. त्याचबरोबर तेच मन खचतं आणि मनुष्य सामान्य कामही करू शकत नाही. आपण या पुस्तकात पूर्वी पाहिल्याप्रमाणं आपल्या दु:खाची कारणं शोधायला मनच उपयोगी पडतं.

तेच मन वस्तू-इंद्रियं-शरीर या सगळ्यांना चिकटून तात्पुरतं सुखात राहतं आणि लगेच दु:खातही पडतं. पुढं अधिक प्रगल्भ झाल्यास तेच मन स्वत:च्या ठिकाणच्या ईश्वरस्वरूप अंतरात्म्याचा शोध घेऊन त्यावर स्थिर राहून अखंड आनंदाचा अनुभवही घेऊ शकतं. म्हणून माणसाच्या बंधनालाही कारण मनच आहे आणि मुक्तीलाही कारण मनच आहे. 'मन एव मनुष्याणाम् कारणं बंधमोक्षयो: ।'

यावर महत्त्वाचा प्रकाश टाकताना हेच बंधनाचं कारण असलेलं मन मोक्षाचं कारण कसं होऊ शकेल, याचं स्पष्टीकरण देताना ऋषी म्हणतात, 'बंधाय विषयासक्तं मुक्त्यैनिर्विषयं स्मृतम् ।' अर्थात विषयांच्या मागं लागलं तर तेच मन बंधनाला कारण होतं आणि निर्विषय झालं तर तेच मन मोक्षालाही कारण होतं. हा मनाचा स्वभाव ओळखून आपण ते वापरू शकलो, तर आपल्या प्रश्नाचं उत्तर आपल्यालाच गवसू शकेल.

*

२९. भोजनभूमिका

माणसाला जेवण करणं किंवा खाणं अपरिहार्य आहे, हे खरं. पण ज्याला ईश्वराचा मुक्काम गाठायचा आहे किंवा आत्मानंदाचा अनुभव घ्यायचा आहे, त्यानं कोणत्या भूमिकेनं खावं किंवा जेवावं, हे सांगताना उपनिषदांत एक विचारप्रवर्तक पण छोटंसं सूत्र दिलं आहे. 'औषधवत् अशनं आचरेत् ।' अर्थात औषध समजून जेवावं किंवा खावं.

आता या म्हणण्यात अनेक गोष्टी सूचित केल्या आहेत. उदाहरणार्थ, नाईलाज झाल्याशिवाय मनुष्य औषध घेत नाही. घेतलंच तर मोजकंच घेतो. ते चांगल्यात चांगलं शुद्ध घेतो. त्याचं पथ्य पाळतो. या आणि अशा अनेक गोष्टी औषधाप्रमाणं आपल्या जेवणाला आणि खाण्यालाही लागू होतील. अशा पद्धतीनं व वृत्तीनं खाल्लं तर, माणसाची शारीरिकच नव्हे तर मानसिक व आध्यात्मिक प्रकृतीही चांगली राहील असं वाटतं.

*

३०. खऱ्या प्रेमाची गरज व विद्या

तसं पाहाता 'प्रेम' हा फार प्रचलित आणि गुळगुळीत शब्द झाला आहे, ही गोष्ट खरी आहे. पण उपनिषदांनी त्याच्यावर जो विचार केला आहे तो पाहता, याच शब्दाला अत्यंत मोलाचं आणि वेगळं परिमाण नक्की मिळू शकेल, असं वाटतं.

'प्रेम' ही तशी प्रत्येकालाच लाभलेली एक शक्ती आहे. तितकाच तिचा इतरांकडून प्रत्येकाला अनुभवही आहे. फक्त ज्या अर्थानं आपलं एकमेकांवर प्रेम असतं किंवा आहे असं आपल्याला वाटतं, त्याबद्दल मात्र ऋषी आपल्याला सावध करून काही तत्त्वं सांगतात. खऱ्या प्रेमाचा मार्गही दाखवून देतात. साधारणपणे माणसाला आपलं आई-वडिलांवर, पती-पत्नीवर किंवा मुलाबाळांवर

प्रेम आहे, असं वाटतं. त्याच्या कल्पनेनुसार तो त्यांच्यासाठी सोसतो, त्यागही करतो. तीच गोष्ट त्याची मित्रमंडळी व इतर समाजाबद्दलची असते. पण त्यानं क्षणभर त्यावर विचार करावा, असं उपनिषदांचं म्हणणं आहे.

उदाहरणार्थ, पत्नीवर खूप 'प्रेम' करणाऱ्या माणसाची पत्नी दुर्दैवानं काही कारणानं त्याच्या मनाविरुद्ध वागू लागली, आजारपण, अपघात, व्यंग अशा काही कारणानं तिच्यापासून त्याला अहोरात्र त्रास सुरू झाला तर मात्र त्याचं 'प्रेम' आटायला सुरुवात होते. पत्नी तीच असली तरी ती त्याला हळूहळू नकोशी होते. वर व्यवहारानं तो कसाही वागला तरी आतून 'प्रेम' उरलेलं नसतं. हा अनुभव कुठल्याही नात्यात, कुणालाही तपासून बघण्यासारखा आहे.

यावर उपनिषदांचं आपल्याला सावध करणारं म्हणणं असं की, माणसाचं मुळात दुसऱ्या व्यक्तीवर प्रेम नसून खरं पाहाता त्याचं स्वत:वर प्रेम असतं. म्हणून त्याला स्वत:ला कुठल्याही कारणानं लौकिकदृष्ट्या प्रिय असलेल्या कुठल्याही व्यक्तीकडून त्रास उत्पन्न झाला आणि स्वत:ची गैरसोय झाली की, त्या व्यक्तीवरचं त्याचं तथाकथित 'प्रेम' आटतं. म्हणजे त्याच्या स्वत:च्या स्वत:वरच्या प्रेमात त्याला थोडाही खंड चालत नाही.

याचाच अर्थ असा की, त्या व्यक्तीचं प्रेम आपल्याला वाटतं किंवा वाटायला सुरुवात होते, त्याच वेळी ते त्या व्यक्तीवरचं प्रेम नसून ती व्यक्ती आपल्या मनाप्रमाणं आहे, आपल्या मनाप्रमाणं वागते म्हणून उत्पन्न झालेलं प्रेम असतं, हे ओळखून असलेलं बरं. म्हणून ऋषी म्हणतात,'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति ।'

अर्थात एवढाच बोध देऊन उपनिषदं थांबत नाहीत, तर ती म्हणतात की, मग आपलं खरं ज्याच्यावर प्रेम आहे तो 'मी' कोण याचा शोध घेतला तर, माणसाला मूळ प्रेमाचा विषय सापडू शकेल. तो शोधताना त्याला त्याचा 'खोटा मी','देहबुद्धीचा मी' किंवा 'शरीरमनाचा मी' वाटेत सापडेल आणि अधिक शोध घेतला तर याही पलीकडे असलेला, अखंड प्रेमस्वरूप असलेला 'अंतरात्मा' सापडेल. म्हणूनच खोट्या 'मी'च्या सुखासाठी धडपडूनसुद्धा माणसाला खरं सुख मिळत नाही. म्हणजेच खोट्या 'मी'वर प्रेम करूनसुद्धा माणूस सुखी होत नाही.

याउलट खऱ्या 'मी'चं म्हणजे आपल्या आत्मस्वरूपाचं नुसतं दर्शन झालं तरी मनुष्य आनंदित होतो. लौकिक व्यवहारामध्ये एखाद्यावर आपलं प्रेम असणं म्हणजे जसं आपण त्याच्या मनासारखं करणं समजतो, तसंच ह्या 'खऱ्या मी'वर 'खरं प्रेम' करणं म्हणजे खऱ्या 'मी'च्या मनाप्रमाणं म्हणजे त्याच्या गुणधर्माप्रमाणं वागणं, हे त्यावर खरं प्रेम करणं होय. तो जसा सर्वांशी समान आहे, स्थिर, सदैव शांत, आनंदित, तटस्थ आहे तसं आपण राहाणं म्हणजे आपल्या आत्म्यावर खरं प्रेम करणं होय.

उपनिषदांच्या या उद्‌बोधनाकडं आपण पाहिलं व त्यावर मनन घडलं तर, आपण प्रेमाच्या भ्रामक कल्पनांतून बाहेर पडू आणि खऱ्या प्रेमाच्या आनंददायी मार्गाला लागू, असा विश्वास वाटतो.

*

३१. आनंदाच्या विद्येची गरज

आज मनुष्य इतक्या प्रकारच्या विद्या शिकतो, पण त्या शिकण्याचा खरा उद्देश त्याला क्वचितच माहीत असतो. मनुष्य इतक्या प्रकारे जगण्याचा प्रयत्न करतो, पण त्याला त्याचा मूळ उद्देश क्वचितच माहीत असतो. असं का म्हटलं जातं, ते आपण थोडंसं समजून घेऊ.

एखादं वाहन मनुष्य शिकतो किंवा रसायनशास्त्र-अर्थशास्त्रासारखा विषय मनुष्य शिकतो, गायन किंवा वादन यांसारखी कला मनुष्य शिकतो. त्यावेळी या प्रत्येक शिक्षणामागं त्याचा काही उद्देश असतो. एखादं वाहन शिकताना त्याची अशी कल्पना असते की, मला या वाहनावर नियंत्रण येईल. म्हणजे साध्या भाषेत मला ते वाहन येऊ लागेल. अर्थ किंवा रसायन यासारखं शास्त्र शिकताना त्याची भूमिका थोडी वेगळी असते. त्या त्या शास्त्राची माहिती मला होईल एवढ्या उद्देशानं तो ते शिकताना दिसतो. गायन-वादनासारख्या कलांच्या बाबतीत त्या त्या कलांचा विस्तार पाहाता नियंत्रण मिळविण्याची कल्पना जास्त दूर जाते आणि मला थोडीफार माहिती होईल हा त्याचा शिकतानाचा वरवरचा उद्देश दिसतो.

तो आयुष्यभर अशा कितीही प्रकारच्या साध्या किंवा मोठ्या विद्या शिकला आणि त्याचे वरवर पाहाता असे वेगवेगळे उद्देश दिसले तरी, एवढ्याच उद्देशासाठी तो हे करतो का असं जर विचारलं तर मात्र त्याचं उत्तर थोडं वेगळं मिळतं. उदाहरणार्थ, वाहन शिकणारा नुसतंच वाहन यावं, एवढ्या उद्देशानं शिकत असेल असं म्हणणं जरा कठीण जातं.

कारण तसं नुसतं वाहनावर नियंत्रण येऊन त्याला काहीच उपयोग नसतो. कारण त्याचा उद्देश किंवा ध्येय मूळ कुठलं तरी वेगळं असतं. त्याला नोकरीसाठी किंवा व्यवसायासाठी किंवा अन्य काही कामासाठी कुठंतरी जायचं असतं. ते उद्दिष्ट जर त्याच्या या वाहनावर नियंत्रण मिळवण्यामुळं साध्य होत असलं, तर या वाहनविद्या शिकण्याचा त्याला उपयोग असतो. समजा, त्याचं हे उद्दिष्ट साध्य होणार नसेल तर त्या शिकण्याचा मला काही उपयोग नाही,

असं तो म्हणतो. म्हणजेच वाहन शिकताना आता त्याचा उद्देश नुसतंच वाहनावर नियंत्रण मिळवणं एवढा नसून, त्या नियंत्रणाचा स्वत:ला काही उपयोग होणं, हा असतो. हे आपल्याला मान्य होण्यासारखं आहे.

आपल्या उद्दिष्टाचा विषय तसा एवढ्यावर संपत नाही. हे उदाहरण पुढं चालवायचं म्हटलं तर नियंत्रण मिळवणं आणि नोकरीला किंवा व्यवसायाला त्यामुळं लवकर जायला मिळणं ही दोनच उद्दिष्टं आहेत असं मानलं आणि एखाद्याच्या बाबतीत ती दोनही पुरी होत आहेत असं दिसलं तर, ती पुरी झाल्यामुळं उद्दिष्टं पुरी होण्याचा हा विषय समाधानकारकपणे संपला पाहिजे. पण वाहनाच्या नियंत्रणामुळं तो वेळेत नोकरीला पोचला किंवा व्यवसायानिमित्त फिरू शकला व जर त्या नोकरीत पुरेसा पगार नसेल किंवा व्यवसायात पुरेशी प्रगती नसेल तर एवढं वाहन शिकून, वेळेत जाऊनही काही उपयोग नाही, अशा निष्कर्षाला तो येईल आणि आता मूळ वाहन शिकण्याच्या दोन उद्दिष्टांत पैसा मिळण्याचं तिसरं उद्दिष्ट असल्याचं आपल्या लक्षात येईल. आता पुढची उद्दिष्टं आपण विचार करून शोधून काढू शकू.उद्दिष्टांचा प्रश्न वाटतो इतका सोपा नाही.

ही सगळी उद्दिष्टं पुरी करण्याचा आपला प्रयत्न शेवटी एका मूळ आनंदाच्या उद्देशानं चाललेला आहे, हे लक्षात यायला आपल्याला वेळ लागणार नाही. आता वरच्याच उदाहरणांत पाहायचं झालं तर दुसरं उद्दिष्ट साध्य होत नसेल म्हणजे मला व्यवसायाच्या ठिकाणी किंवा नोकरीच्या ठिकाणी जायला हे वाहनाचं नियंत्रण उपयोगी पडत नसेल तर, ते नियंत्रण मिळविण्याचं पहिलं उद्दिष्ट साध्य होऊन काही उपयोग नाही, असं आपण म्हणतो. तसंच क्रमानं विचार करत गेलं तर हे आपल्या लक्षात येईल की, या क्रमानं जाताना जे उद्दिष्ट असेल - ते अखेरचं 'आनंदाचं' उद्दिष्ट असेल - ते जर साध्य होत नसेल तर मागच्या सगळ्या उद्दिष्टांना काही अर्थ नाही, हे आपल्याला लगेच पटू शकेल. अशा अनेक विद्या, अनेक कला शिकून आणि आपल्या आयुष्यातली अनेक ध्येयं साध्य होऊनही आनंदित नसलेली कित्येक माणसं आपल्याला दिसतात. त्यावेळी आपल्या वरच्या निष्कर्षातली सत्यता आपल्याला अधिकच पटेल.

या वेगवेगळ्या विद्यांचा अधिक विचार केला तर आणखी एक वैशिष्ट्य आपल्याला जाणवेल. ते असं की, यांतली कुठलीही विद्या शिकली,

कला मिळवली आणि अशी कितीही उद्दिष्टं साध्य केली तरी, ते सर्व करूनही त्याच्या पोटात असलेलं किंवा त्याला धरून असलेलं आणखी कुठलं तरी उद्दिष्ट पुरं करायचं पुन्हा शिल्लक उरतं. म्हणून यावर विचार करताना उपनिषदांना असं वाटतं की, अशी कुठली विद्या आहे का की, जी विद्या शिकल्यानं माणसाला आनंदाचं अंतिम उद्दिष्ट एकदम गाठता येईल. आणि त्याला आनंदासाठी दुसरं काही करावं लागणार नाही. याचं उत्तर शोधताना, त्यांना ज्या विद्येचा शोध लागला त्याला त्यांनी 'आत्मविद्या' असं नाव दिलं आहे !

आत्मविद्या या शब्दामधल्या 'आत्म' या शब्दानं किंवा 'आत्मा' या शब्दानं आपण गडबडून जायचं काही कारण नाही. एखादा नवीन वाहन शिकणारा असला तर वाहन, त्याचं वजन, तंत्र, धोके, नियंत्रणातला कठीणपणा यानं माणूस बिचकतो. पण त्याचं आकलन एकदा झालं की, त्याची भीती मोडते आणि लीलया ते वाहन मनुष्य कालांतरानं हाताळतो. तसाच काहीसा प्रकार या विद्येचा विषय असलेल्या 'आत्म' किंवा 'आत्मा' या विषयाबद्दल आहे. प्रथमतः जरी हा शब्द आपल्याला परका आणि कठीण वाटला तरी त्याचा एकदा परिचय झाला, त्याचा स्वभाव आणि वैशिष्ट्यं कळली तर आपली त्या विषयाची ही अडचण दूर होईल.

इतक्या विद्या हाताळून शेवटी असमाधानी राहाणारी शेकडो माणसं आपण पाहिली किंवा काही खोट्या समाधानात राहाणारी माणसं पाहिली की, साक्षात खऱ्या आणि निर्भेळ आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव देऊ शकणाऱ्या या आत्मविद्येची गरज कोणत्याही विचारी माणसाला लगेच पटू शकेल.

उपनिषदांचा प्रधान विषय असलेल्या या आत्मविद्येचा परिचय आपण पुढल्या काही भागात करून घेऊ. तो करून घेताना मात्र उपनिषदांनी दिलेली ही खात्री आपण लक्षात ठेवू की, ही विद्या जाणल्यानं आपण सर्व जाणल्यासारखं होणार आहे आणि हे जाणणं जरी थोडं कठीण आणि सूक्ष्म असलं तरी साक्षात आनंदाचा ठेवा 'अणुमेतमाप्य स मोदते, मोदनीयं हि लब्ध्वा' अर्थात 'ही सूक्ष्म गोष्ट मिळवल्यानं साक्षात आनंदच माणसाला एकदम गवसेल' या न्यायानं आपल्यालाही आनंद गवसेल याची आपण खात्री बाळगू.

*

आपण हे पाहिलं आहे की, लौकिकातली कुठलीही विद्या झाली तरी ती आपल्याला अंतिम किंवा शाश्वत समाधानापर्यंत नेऊ शकत नाही. काहींना कदाचित अशी शंका येईल की, काही विद्यांच्या साहाय्यानं मिळवलेल्या पैसा, सत्ता, मान-सन्मान अशा गोष्टींनी मनुष्य आनंदित होताना आपण पाहातो. काही व्यक्तींचा अशा विद्यांच्या अभ्यासामुळं मिळालेल्या गोष्टींतच अंतकाळ होतो. त्यावेळी ते आनंदातच दिसतात. उदाहरणार्थ, एखाद्या शास्त्राचं संशोधन करणारा काही अलौकिक शोध लागून त्या आनंदामध्ये आयुष्यभर राहाताना दिसतो. अशा लोकांच्या आनंदाचं काय ?

त्यावर विचार केला असता असं लक्षात येईल की, अंतकाळापर्यंत पैसा किंवा मान संपला नाही म्हणून तो आनंदात असताना दिसतो. एक तर, ही वस्तुस्थिती तशी कमीच आढळते. दुसरं म्हणजे नव्या निर्मितीचा, संशोधनाचा किंवा विक्रमाचा आनंदसुद्धा त्यापुढच्या संशोधनानं आणि विक्रमानं कमी होत असतो. अशा वेळी निर्मितीचं नि आपल्या आपल्या विक्रमांचं आपण किती जरी कौतुक केलं आणि आनंदात असल्याचं भासवलं तरी आतून आनंदाला ग्रहण लागलेलं असतं, हे स्वत:ला ठाऊक असतं. अगदी कलेसारखा उच्च प्रकारचा आनंद देणारी विद्या घेऊ. आपल्या बोटांनी किंवा गळ्यानं अत्युच्च आनंद निर्माण करणारी ही विद्या येणारासुद्धा वयोमानानं किंवा निसर्गाच्या इच्छेनं जर त्या गळ्यावर किंवा बोटांवर आघात झाला तर स्वत:ही त्या आनंदाला वंचित होतो.

म्हणून ऋषींचं म्हणणं असं की, अशी काही विद्या शोधली पाहिजे की, जिच्या अभ्यासानं मनुष्य आजन्म आनंदात राहू शकेल. त्यासाठी झालेल्या शोधातूनच आत्मविद्येचा जन्म झाला आहे. एवढं सुरुवातीला लक्षात ठेवलं तरी पुरे. या दिशेनं विचार करताना प्रथम एक लक्षात येतं की, आजवर ज्या विद्यांच्या साहाय्यानं मनुष्य आज आनंद मिळवू पाहातो आहे, त्या साऱ्या विद्यांचे विषय दृश्य किंवा बाह्य आहेत. त्या त्या विषयांना पुन्हा आनंद देण्याच्या

बाबतीत मर्यादा आहेत. त्याशिवाय त्या विद्येतलं नैपुण्य मिळवण्याला पडणाऱ्या मर्यादा वेगळ्याच.

उदाहरणार्थ, बागकाम, रसायन किंवा चित्रकला यांसारखी एखादी विद्या घेऊ. यांतली कुठलीही एक विद्या घेतली तर त्या विद्येला शिकण्यासाठी एक ठरावीक कुवत, क्षमता लागेल. शिवाय चांगल्या प्रकारचं साहित्यही ही विद्या शिकण्यासाठी आणि वापरण्यासाठी लागेल. शिवाय त्यातून निर्माण होणाऱ्या कृतीचा दर्जा अनेक गोष्टींवर अवलंबून राहील आणि त्यामुळं तो वेगवेगळा असेल. या आणि अशा अनेक मुद्यांमुळं कुठल्याही विद्येपासून मिळणाऱ्या आनंदाला मर्यादा का पडतात, हे लगेच लक्षात येईल.

पुढं विचार केला तर हे लक्षात येईल की, आनंद मिळवण्यासाठी आपण वर म्हटल्याप्रमाणं इतर कशावरही अवलंबून न राहता ज्याला हा आनंद मिळवायचा आहे, त्याला स्वत:लाच या विद्येचा विषय केला तर आपले बरेचसे प्रश्न निकालात निघतील. मग त्याला साधन-संपत्ती, कल-कुवत, परिस्थिती अशा कुठल्या अडचणी राहणार नाहीत. ही स्वत:चा अभ्यास करण्याची विद्या म्हणजेच 'आत्मविद्या' होय. ज्याला हा आनंद हवा आहे तो स्वत: मी किंवा जो कोणी असेल तो कोण आहे आणि त्याला आनंद नक्की कशामुळं होतो हे शोधून काढलं तर, भले व्यवहार चालण्यासाठी किंवा आपल्या चरितार्थासाठी एखादी लौकिक विद्या शिकावी लागली तरी हरकत नाही, पण आनंदासाठी मात्र 'आत्मविद्ये'पलीकडं दुसरी बाहेरची कुठलीही लौकिक विद्या शिकण्याची गरज उरणार नाही.

या विद्येचा विषय 'स्वत: स्वत:चा शोध घेणं' हा असल्यामुळं कुठल्याही प्रांतात, जाती-जमातीत, आर्थिक, सामाजिक परिस्थितीत असलेल्या कुठल्याही माणसाला हा शोध घेणं शक्य आहे. म्हणून ही विद्या सर्वांना सारखीच उपलब्ध राहील. यावर 'मी'चा अधिक शोध घेताना असं लक्षात येतं की, माणसांचे देश, काल, परिस्थितीनुसार अगणित प्रकार होत असले, त्यामुळं माणसांच्या ठिकाणी कितीतरी वैविध्य दिसत असलं तरी माणसाच्या शरीराचे अवयव, त्यांतील रक्तमांसाची घटना यांत जसं पूर्ण साम्य असतं तसंच त्याच्या अंतरंगातसुद्धा विलक्षण साम्य आहे.

त्यामुळं या सृष्टीत अगणित प्रकारचं वैविध्य आहे तसं ते इतर विद्यांतही आहे, पण तो प्रकार आत्मविद्येलाही लागू होत नाही. आत्मविद्येचा विषय असलेला 'मी' आणि 'आपलं अंतरंग' हे सर्वत्र एकच आहे. त्यामुळं या सृष्टीतल्या विविधतेमुळं आपल्याला शिकण्यामध्ये ज्या अडचणी येतील व खूप काळ लागेल, तो इथं लागणार नाही. म्हणून ही आनंदाची वाटचाल उलट सोपी व सुटसुटीत आहे.

*

आत्मविद्येची वाटचाल कशी आणि कुठं सुरू होते, हे आपण गेल्या भागात पाहिलं. त्यातलाच महत्त्वाचा मुद्दा असा की, आनंदाचा शोध घेताना ऋषींच्या असं लक्षात आलं की, विद्येचा विषय जितका अपूर्ण तितका त्यापासून मिळणारा आनंद अपूर्ण. यामुळंच आपल्याला दृश्यामध्ये आनंदाची म्हणून ही जी विद्या शिकावीशी वाटते किंवा जो जो विषय हाती घ्यावा असं वाटतं, त्याचा त्यांनी विचार केलेला आहे. त्यावरून असं लक्षात येतं की, माणसाच्या आयुष्याचे अगणित भाग होतात आणि त्यातला कुठला तरी एक भाग हे विषय हाताळीत असतो.

उदाहरणानं पाहायचं झालं, तर गेल्या प्रकरणात पाहिल्याप्रमाणं घर, वाहन, कला, शास्त्र असा कुठलाही भाग घेतला तरी तिनं माणसाच्या दिवसाचा किंवा आयुष्याचा एखादा भाग व्यापला जातो. वाहनाची विद्या जरी झाली तरी मनुष्य काही चोवीस तास वाहनावर असत नाही. तो फार तर दहा-पंधरा मिनिटं, तासभर त्या विद्येचा वापर करील. त्यामुळं ती विद्या शिकण्यानं त्याला मिळणारं समाधान हे अर्थातच त्या दहा-पंधरा मिनिटांपुरतं किंवा तासांपुरतं मर्यादित राहील. एखाद्याला नोकरीतल्या एखाद्या कामामुळं आनंद मिळत असेल तर, तो आनंद कदाचित थोडा जास्त वेळ राहील. पण तेच काम तो दिवसभर करील, असं नाही. तिथल्या सर्वच कामात त्याला आनंद असेल, असंही नाही. शेवटी कुठंतरी वेळेची मर्यादा येईल आणि तो आनंद संपेल.

दुसरीही एक अडचण या आनंदाच्या विषयांचा अभ्यास करताना समोर येईल, ती अशी की, हे विषय मनुष्य म्हणून कुणा एकट्याच्या स्वाधीन नसलेले विषय आहेत. उदाहरणानं पाहायचं झालं तर - संगीतासारख्या कलेतून मिळणारा आनंद पाहू. त्या विद्येत उत्तम नैपुण्य संपादन केलं तरी मैफिलीतून मिळणाऱ्या आनंदावर गायकाचीही हुकमत चालत नाही. त्याच्याबरोबरचे साथीदार-त्यांची वाद्यं-त्याचं सहकार्य-प्रकाशयोजना-ध्वनियंत्रणा-श्रोत्यांची दाद अशा अनेक गोष्टींवर हा आनंद अवलंबून आहे. त्यातूनही एखादा स्वान्तःसुखाय गात असला तर उपाधी

थोड्या कमी होतात. तरीही स्वत:चा मूड असणं, किमान आवाज तरी लागणं इतपत पराधीनपणा तिथंही शिल्लक उरतो. यावरून असं लक्षात येतं की, कुठल्याही बाबतीत जोपर्यंत आपण कशावर तरी किंवा कुणावर तरी अवलंबून आहोत तोपर्यंत आपल्या आनंदाला बंधनही पडणार, खंडही पडणार.

या आणि अशा अनेक अडचणी लक्षात आल्यावर आनंदासाठी बाहेरच्या कुठल्या विद्येकडं पाहणं थांबतं. त्यातूनच मनुष्याची दृष्टी आनंदासाठी स्वत:कडं वळते. ही दृष्टी स्वत:कडं वळली की, आपल्या असं लक्षात येतं की, आपण आनंदासाठी जर जगावर अवलंबून न राहाता स्वत:वर अवलंबून राहिलो तर आनंदाचं कोडं सुटणं बरंचसं सोपं होतं. यात वर सांगितलेल्या एक-दोन अडचणींनाही मार्ग सापडतो. जगातली एखादी वस्तू किंवा विषय माझ्या जीवनाचा जो एखादा कप्पा किंवा काही कप्पे व्यापीत होता, त्याऐवजी आनंदासाठी मी आता स्वत:वरच अवलंबून असल्यामुळं हा आनंदाचा 'मी' हा विषय माझे चोवीस तास, बारा महिने आणि आयुष्यभर सर्व विश्व व्यापून टाकतो. दुसऱ्यावर कुणावर अवलंबून राहण्यानं निर्माण होणारं परावलंबनही या विषयात संपतं.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, इतर साऱ्या वस्तू किंवा विद्यांचे विषय अपूर्ण असल्यामुळं सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं त्यांच्यापासून मिळणारा आनंदही अपूर्ण होता. 'मी'च्या बाबतीत ही परिस्थिती थोडी वेगळी आहे. मनुष्य कदाचित शरीरानं किंवा आयुष्याच्या बाबतीत काही मर्यादेमुळं अपूर्ण असल्यासारखा वाटेल. पण क्षणभर विचार केला तर आपल्या असं लक्षात येईल की, आनंदाचा विषय म्हणून मात्र मनुष्य पूर्ण आहे.

याचं कारण असं की, आयुष्य पंचवीस वर्षांचं आहे, पन्नास वर्षांचं आहे की शंभर वर्षांचं आहे याला अर्थ नसून, तेवढी तेवढी पुरी वर्षं आनंदात जातात की नाही यावर आयुष्य आनंदात गेलं की नाही, हे अवलंबून आहे. त्यामुळं पंचवीस वर्षं आनंदात जगणाऱ्याचं आयुष्य जितकं पूर्ण आनंदाचं म्हणता येईल तितकंच शंभर वर्षं आनंदात जगणाऱ्याचं आयुष्यही पूर्ण आनंदाचं म्हणता येईल. त्यामुळं आनंदाला उपलब्ध असलेला 'मी' हा या दृष्टीनं तरी पूर्ण आहे, असं म्हणावं लागेल. म्हणून या आत्मविद्येचा विषय आपण स्वत: का व्हावं, हे लक्षात येतं. या विषयाचा विचार करण्यापूर्वी जाताजाता येणारी एक अडचण दूर करून पुढं जाऊ.

माणसाच्या बऱ्याचशा धारणा तो ज्या परिस्थितीत राहतो, ज्या वातावरणात वाढतो, ज्या प्रकारे त्याला अनुभव येतो त्या प्रकारे तयार होतात. यातून एक अडचण सहजपणे निर्माण होते की, आनंदाच्या बाबतीतसुद्धा तो ज्या वातावरणात राहतो, ज्या प्रकारे आनंदाचा अनुभव त्याला येतो, त्या प्रकारे त्याची आनंदाविषयीची भूमिका किंवा मतं तयार होतील हे उघडच आहे. आज कुणाही माणसाचा अनुभव पाहिला आणि त्यातला एखादा सन्माननीय अपवाद सोडला तर हरघडी प्रत्येकाला सुख आणि दु:खाच्या हेलकाव्यांचा खूप अनुभव आहे. इतका की, त्यामुळं त्याला सोसाव्या लागणाऱ्या दु:खाचं प्रमाण पाहाता माणसाच्या आयुष्यात त्याला सुखापेक्षा दु:खच जास्त भोगावं लागतं, असं त्याचं मत झालं असल्यास त्यात नवल नाही.

सर्वसाधारणपणे रोजचं आयुष्य त्रासाचं, दु:खाचं आणि आनंद मात्र कधीतरी दसरा-दिवाळीचा-सणासुदीचा अशी त्याची समजूत आहे. अनेकजण तर हे ठामपणे सांगताना दिसतात की, 'माणूस म्हटला म्हणजे त्याला दु:ख असायचंच'. त्यांच्या एकंदरीत अनुभवाकडं पाहाता हे म्हणणं रास्तच म्हणावं लागेल. पण त्यातूनच खरी अडचण निर्माण होते. ही अडचण समजून घेण्यासाठी आपण एक उदाहरण पाहू.

माणसाला खूप दूरवरचं दिसण्याची शक्ती डोळ्यांमध्ये ठेवलेली आहे. पण त्याचबरोबर जर एखाद्या ठिकाणी अंधार असला तर त्यातही जरुरीपुरतं दिसण्याएवढी डोळ्यांच्या बाहुल्यांची योग्य ती हालचाल होण्याची क्षमताही माणसाच्या दृष्टीमध्ये ठेवली आहे. दुर्दैवानं एखाद्या माणसाला जरा अंधाऱ्या असलेल्या खोलीमध्ये जर वर्षानुवर्षं ठेवलं तर कारणपरत्वे होऊ शकणारी ही हालचाल सवयीनं रोजचीच होऊन लांबचं पाहायच्या शक्तीलाही तो दुरावतो. इतकंच नव्हे तर, 'स्वत:च्या अनुभवाच्या आधारानं' तो ठामपणे सांगत सुटतो की, माणसात दूरवरचं दिसण्याची क्षमताच नाही. तो फक्त जवळचं आणि तेही कसंबसं पाहू शकतो.

अखंड आनंदाच्या बाबतीत माणसाची काहीशी हीच अवस्था आहे. त्याला संतांनी किंवा आत्मदर्शी माणसांनी कितीही सांगितलं की, निरुपाधिक, खऱ्या अखंड आनंदात राहायची क्षमता तुझ्यामध्ये आहे तरी 'स्वत:च्या अनुभवाच्या आधारानं' असं काही शक्य नाही, असं तो उलट त्यांनाच सांगतो. ही अडचण कशामुळं निर्माण झाली आहे, हे आता आपल्या लक्षात येऊ शकेल.

तिला अडचणसुद्धा अशासाठी म्हणायचं की, जर एखाद्या माणसानं त्याला सुचवलेलं एखादं काम 'मला हे शक्य नाही','माझ्यात हे काम करायची क्षमता नाही' , अशा भावनेनं स्वीकारलेलं असेल तर हे उघडच आहे की,त्याच्याकडून ते तडीला जाण्याची शक्यता नाही. हीच गोष्ट 'आपण पूर्ण आनंद मिळवू शकू', या वाक्याचा अंमल करताना किंवा अनुभव घेताना माणसाच्या बाबतीत होऊ शकते. म्हणून तिला अडचण म्हणणं भाग आहे. त्या माणसाला त्याच्या संकुचित विश्वामुळं सतत दु:खाचे अनुभव येऊन स्वत:ला आनंद मिळवण्याची क्षमता नाही, अशी जी समजूत निर्माण झालेली आहे, ती एक प्रकारची 'भ्रमनिद्रा' आहे. त्यामुळं या अडचणीवर मार्ग काढणं म्हणजे या 'भ्रमनिद्रे'तून जागा करून, स्वत:च्या विलक्षण क्षमतेचं भान त्याला आणून देणं हे आहे.

म्हणून ऋषी असं म्हणतात,'उठा, जागे व्हा','उतिष्ठत जाग्रत!' यानंतर या बाबतीत आपण काय करावं हे जर एखाद्याला उलगडत नसेल तर, त्याला पुढं सांगतात,'यातल्या श्रेष्ठ माणसांकडं जा आणि हे सगळं कसं साधावं हे त्यांच्याकडून समजून घ्या.' 'प्राप्य वरान् निबोधत ।' अर्थात प्रत्यक्ष हा अनुभव घेणारी किंवा त्या अनुभवाच्या दिशेनं वाटचाल करणारी जी आत्मदर्शी किंवा संतांसारखी श्रेष्ठ माणसं असतील त्यांच्याकडं जाऊन आपण हे समजून घ्या. त्यांच्याकडं गेल्यानं आपण हे साधू शकू याची खात्रीही माणसाला होते आणि ते साधण्याचा सोपा मार्गही कळतो. म्हणून अशांकडं जावं, असा उपनिषदांचा सल्ला आहे.

याच पद्धतीनं आत्मविद्येची वाटचाल करताना त्यात असलेला व वर सांगितलेला सर्वांत मोठा अडथळा स्वनिर्मित आहे, हे प्रथम लक्षात घ्यावं. मग तो दूर करून, जागं होऊन अशी कुणी आत्मदर्शी व्यक्ती असेल तर तिच्याकडं आपण जावं. अन्यथा इथं या पुस्तकापुरतं तरी आपण या उपनिषदांतल्या आचार्यांकडं जाऊ या आणि आपण आपला पुढचा मार्ग समजून घेऊ या.

*

स्वत:ला अखंड आनंद नक्की मिळवता येईल, याची खात्री धरून आपली ही आनंदाची वाटचाल खरी सुरू होते. या वाटचालीचा विषय आता बाहेर कुठं नसून आपल्या स्वत:मध्ये आहे, हे लक्षात ठेवलं तर आता या वाटचालीसाठी कुठं बाहेर जाण्याची गरज नाही. या विद्येत जे शिकायचं आणि समजून घ्यायचं ते म्हणजे आपणच आहोत. आपण स्वत:च स्वत:चा अभ्यास करीत असल्यामुळं त्यात इतर साधनांचा प्रश्न नसला तरी, हा अभ्यास कसा करावा, त्यासाठी कुठं सावध राहावं लागेल, याची माहिती घेणं मात्र उपयुक्त ठरेल.

अर्थात, अशी माहिती घेणं कुणाला सक्तीचं नाही, कारण एखादा विवेकी, विचारी व बुद्धिमान मनुष्य हा मार्ग स्वत:च्या बळावरसुद्धा चालून, त्यांतल्या गरजा, धोके स्वत:च जाणून घेऊ शकेल. त्या बाबतीत त्याला फक्त 'स्वत: हे सगळं केल्याच्या' अहंकारापासून सावध राहावं लागेल एवढंच. इतरांना मात्र हे धोके आत्मदर्शी व्यक्तींकडून किंवा संतांकडून समजून घेणं गरजेचं व सोपं वाटेल. म्हणून अशा श्रेष्ठ लोकांकडं जाण्याचा सल्ला उपनिषदं आपल्याला देतात, 'प्राप्य वरान् निबोधत ।'

अशा आत्मदर्शी व अनुभवी व्यक्तींचं म्हणणं असं की, आपण आजवर जी विद्या शिकलो, आनंदासाठी जे जे प्रयत्न केले, त्यामध्ये आपल्या साऱ्या इंद्रियांचा फार मोठा वाटा होता. उदाहरणार्थ, दृष्टी - तिच्या साहाय्यानं आपण विद्या शिकतो, विद्येचा विषय असलेल्या विविध वस्तू पाहतो, आनंद मिळवतो. या साऱ्या इंद्रियांचं वैशिष्ट्य हे की, ती बहिर्मुख आहेत. डोळे झाले तरी बाहेर पाहातात. या परिस्थितीमध्ये आपल्या स्वत:च्या अभ्यासाच्या बाबतीत अभ्यासाचा विषय आत आहे. त्यामुळं या इंद्रियांचा आणि त्यांच्या बहिर्मुखतेचा उपयोग नाही. आतली गोष्ट कळायला, आतली दृष्टी, आतलं निरीक्षण, चिंतन अशी साधनं अधिक उपयोगी ठरणार आहेत, हे प्रथमच लक्षात ठेवलेलं बरं.

आणखी एक गोष्ट अशी की, वेगवेगळ्या विद्याभ्यासाच्या निमित्तानं आणि

इंद्रियांच्या आयुष्यभराच्या वापरानं गोळा झालेलं प्रचंड ज्ञान प्रत्येक माणसाजवळ असतं. मग ते मंडईतलं असो, पदार्थविज्ञानातलं असो किंवा कलेतलं असो. अशा गोळा केलेल्या प्रचंड ज्ञानाचा त्याहीपेक्षा प्रचंड अहंकारही माणसाला नकळत असतो. या दोनही गोष्टींचा स्वत:च्या अभ्यासात उपयोग तर नाहीच, उलट अडथळाच असतो. म्हणून हे लक्षात न आलं तर, असल्या ज्ञानानं आलेलं श्रेष्ठत्व स्वत:विषयी शिकताना अनेकांच्या आड येऊ शकतं, हेही लक्षात ठेवावं.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट या अभ्यासाची सुरुवात करताना लक्षात घ्यायला उपनिषदं सांगतात, ती ही की, आपल्याला आतमध्ये स्वत:चं निरीक्षण करायचं आहे. त्यासाठी तटस्थ आकलन, परीक्षण, चिंतन करावं लागणार. त्यासाठी लागणारं योग्य अंतरंग हेही कुठलं बाहेरचं इंद्रिय नसल्यामुळं आतच आपल्याला योग्य परिस्थिती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी चित्त आवश्यक तेवढं शांत असल्याशिवाय आपल्याला स्वत:ला स्वत: समजून घेता येणार नाही.

बाहेरचा एखादा विषय पाहाताना किंवा समजून घेताना डोळे आणि कान उघडे असले की, काम होतं. मन एकवेळ थोडं शांत नसलं तरी चालू शकतं. पण यावेळी आपल्या स्वत:च्या अंतरंगाला आपल्याच मनाच्या साहाय्यानं आपण समजून घेऊ पाहातो. त्या वेळेला समजून घेणारं मन शांत असण्याची, निदान समजून घेण्याइतपत शांत आणि सम असण्याची गरज आहे, हे उघड आहे. म्हणून उपनिषदं म्हणतात की, अशांत आणि असमाधानी चित्ताला हे काम कठीण आहे.'नाशांतो नासमाहित:।'

आता आपण या पार्श्वभूमीवर स्वत:ला समजून घेण्याची वाटचाल सुरू करू शकू. या 'मी'ला समजून घेताना दोन-तीन टप्पे सहज आपल्या लक्षात येतील. आपल्या स्वत:च्या आनंद-दु:ख, आशा-निराशा अशा अनेक अनुभवांची पाहणी केली तर असं लक्षात येईल की, त्यांतली बरीचशी सुख-दु:खं ही स्वत:च्या शरीरासारख्या बाह्य घटकाच्या सोयी-गैरसोयींवर अवलंबून असलेली आहेत.

उदाहरणार्थ, अत्यंत उकाड्यानं शरीर घामेजलेलं असताना, वाऱ्याची सुटलेली झुळूक ही आपल्याला सुखकारक वाटते ती शरीराला सुख होतं म्हणून. याउलट ऐन थंडीत काकडत असताना चुकून सुरू झालेला फॅन माणसाला तितकाच

दुःखाचा ठरतो, तो गार वाऱ्याचा झोत शरीराला दुःख देतो म्हणून. या बरोबरच चार-चौघांमध्ये आपल्याबद्दल कुणी चार चांगले शब्द बोलले तर त्यावेळी होणारं सुख हेही माणसाला आनंद देतं, पण यावेळचा आनंद ते शब्द ऐकणाऱ्या कानाला म्हणजेच शरीराला होणाऱ्या सुखामुळं नसून ते ऐकणाऱ्या माणसाच्या आत असलेल्या मनाला झालेल्या सुखामुळं झालेला आहे. हीच गोष्ट उलट दुःखाच्या बाबतीतही खरी ठरेल.

आपल्या स्वतःच्या सुखदुःखाच्यासुद्धा प्रथमतः तरी शरीर व मन अशा दोन पातळ्या दिसून येतात. आता त्यापुढं पाहू या.

*

स्वत:ला समजून घेण्यामध्ये आत्मविद्येची वाटचाल खऱ्या अर्थानं सुरू होते. त्यासाठी लागणारी पूर्वतयारी आपण मागील प्रकरणात पाहिली. त्यातही स्वत:कडं पाहायला लागल्यानंतर आपण 'मी' म्हणजे सारांशानं किंवा ढोबळ मानानं एकच गोष्ट समजत असलो तरी, त्यात वरवर पाहतासुद्धा तशी वस्तुस्थिती नसून या 'मी'चे प्रथमदर्शनीच शरीर आणि मन किंवा 'बहिरंग आणि अंतरंग' असे दोन प्रकार आपल्याला अनुभवायला येतात. शरीराच्या बाबतीत होणाऱ्या सुखदु:खाचा थोडा आणखी विचार आपण आता करू या.

जगातल्या इतर बाह्य वस्तू आणि विषयांपासून होणाऱ्या सुखदु:खांची वैशिष्ट्यं आपल्या शरीराच्या बाबतीतही बऱ्याच प्रमाणात लागू होतात, असं आपल्या लक्षात येईल. जगातल्या वस्तूंप्रमाणेच शरीर ही तशी बाह्य आणि दृश्य वस्तू आहे. इतर वस्तूंचं सुख जसं मर्यादित, खंडित, परिस्थितीप्रमाणं बदलणारं आणि त्यामुळंच अपूर्ण आहे, तसंच बरंचसं शरीराचं आहे.

शरीरालासुद्धा एखादी विशिष्ट स्थिती किंवा अवस्था सुखाची होते आहे असं वाटतं खरं, पण ते इतकं अल्पकाळ टिकणारं असतं की, उभं राहाणं शरीराला सुखाचं होतंय म्हणावं तोवर केव्हा एकदा खाली बसेन, असं शरीराला होतं. बरं, खाली बसणं सुखावह म्हणावं, तर केव्हा एकदा उठून बसेन आणि फिरू लागेन, असं शरीराला होतं. फिरणं सुखाचं वाटतं म्हणावं तर जरा फिरणं झालं की केव्हा एकदा बसेन, असं शरीराला होतं. बरं, यावरून असा निष्कर्ष काढला की, शरीराला सतत बदल हवे असतात असं म्हणावं आणि त्याला बदलत्या अवस्थेत ठेवावं तर ते शरीर 'मला केव्हा एकदा स्वास्थ्य मिळेल असं झालंय', असं म्हणतं. दृश्य वस्तूंना लागू असलेले बदल, वाढ, घट हे सगळे नियमही शरीराला लागू होतात. म्हणून खरा आनंद किंवा पूर्ण सुख मिळवण्याच्या दृष्टीनं शरीराच्या नादाला लागण्यात अर्थ नाही, हे कोणताही विचारी मनुष्य ओळखू शकेल.

मनाच्या बाबतीतला प्रकार थोडासा वेगळा पण याच स्वरूपाचा आहे,

असं लक्षात येईल. 'मन' ही वस्तू म्हणून जरी दिसत नसली तरी तिला शरीर आणि इतर बाह्य वस्तूंचे नियम लागू पडतात असं लक्षात येईल. मनाचं सर्वांत मोठं आणि सुखाच्या दृष्टीनं त्रासदायक असं वैशिष्ट्यं म्हणजे 'चंचलता' होय. सुखाच्या बाबतीत आपण पूर्वीच पाहिलं आहे की, ते आपण ज्या वस्तूवर किंवा विषयावर किंवा इंद्रियावर अवलंबून ठेवू, त्याचे जे गुणधर्म असतील ते त्यावर अवलंबून ठेवलेल्या सुखाच्या बाबतीत लागू होतात.

उदाहरणार्थ, खाण्यापिण्यावर अवलंबून असलेलं सुख, पैशावर अवलंबून असलेलं सुख, शरीर प्रकृतीवर अवलंबून असलेलं सुख किंवा परिस्थितीवर अवलंबून असलेलं सुख. शरीरप्रकृती ठीक असण्यावर आपलं सुख अवलंबून ठेवलं तर, प्रकृती ठीक तोवर सुखही ठीक. प्रकृती बिघडली की सुखात बिघाड. अशी त्या त्या वस्तूच्या गुणधर्माप्रमाणं आपल्या सुखाची अवस्था असणार. समजा, सुख पैशावर अवलंबून असेल तर तो कमीजास्त असण्यावर आणि त्याचे जे गुण आहेत - तळमळ, हाव, लोभ या गोष्टी उत्पन्न करणं - त्या-त्याप्रमाणं आपल्या सुखाची अवस्था सारखी बदलत राहील. एकूण आपल्याला सुख आणि दुःख, बहुधा दुःखच जास्त, अनुभवायला येतं. थोड्याफार फरकानं हीच परिस्थिती सर्वसामान्य माणसाच्या मनाच्या बाबतीत होते.

सामान्य माणसाचं मन इतकं चंचल असतं की, क्षणात त्याला आवडणारी वस्तू दुसऱ्या क्षणी त्याला नकोशी वाटायला लागते. वर्षानुवर्षं आपला वाटणारा माणूस त्याला एकदम परका असल्याचा साक्षात्कार होतो. सतत शरीराच्या कलानं चालणारं मन त्याच्याच विरुद्ध बंड करून उठतं आणि त्याला अजिबात सुखात ठेवून चालणार नाही असं म्हणून कडकडीत तपश्चर्येला बसवतं. म्हणजे विषय, वस्तू, शरीर या कसल्याही बाबतीत मनाची, सुखाची अशी कोणतीही स्थिर कल्पना नाही. यावरून हे लक्षात येईल की, सुखासाठी स्वतःच्या मनावर अवलंबून राहणाराही अखंड किंवा शाश्वत सुखाची अपेक्षा करील तर फसेल.

फक्त सुखाचे इतर आधार आणि मनाचा आधार यांमध्ये मात्र थोडा फरक आहे, हे लक्षात घेतलेलं बरं. जे मन एवढं चंचल आहे, असं आपण आत्ताच पाहिलं, ते तसं आहे हे पाहण्याची क्षमताही त्याच मनामध्ये आहे. हेच चंचल मन एकाग्र होऊन एखाद्या विषयाचा पाठपुरावा करील तर, आयुष्यभरदेखील

त्या विषयात ते स्थिर होऊन दाखवील, अशी विलक्षण कुवत या चंचल आणि नश्वर मनामध्ये आहे, हे ओळखलं तर यालाच 'साध्य' नसलं तरी, भगवत्प्राप्तीचं साधन बनवता येईल, ही गोष्ट ऋषींच्या लक्षात आलेली आहे, हे आपण समजून घेतलेलं बरं.

या मनाची हीच विलक्षण क्षमता आपल्याला इथंपर्यंतचा विचार करताना उपयोगी पडली आणि तीच क्षमता योग्य तऱ्हेनं वापरून आपण पुढचीही वाटचाल करू शकू. 'मी' चे 'शरीर आणि मन' हे दोनही टप्पे पार केल्यानंतरही माणसाच्या ठिकाणी 'मी' म्हणून अजून काही अस्तित्व उरतं. ते त्याचं शुद्ध जिवंतपण, जाणीव, प्राण, चैतन्य, आत्मा किंवा हृदयस्थ ईश्वर होय. तिला मात्र बाकीच्या इतर स्वत:च्या अस्तित्वाच्या घटकांप्रमाणं वाढ, घट, अस्थैर्य, चंचलता, संस्कारबद्धता, कमी-जास्तपण, अनित्यता, क्षणोक्षणी दुसऱ्या कुठल्या घटकांमुळं बदलत राहण्याची प्रवृत्ती अशा तऱ्हेचे कुठलेच गुणधर्म लागू नाहीत. माणसाच्या ठिकाणच्या या चैतन्यावर कशाचाही परिणाम होत नाही.

जिथंपर्यंत आपल्याला अनुभव येतो तिथंपर्यंत तरी असं म्हणता येईल की, या चैतन्याला, अंतरात्म्याला 'नित्य' अस्तित्व आहे, हे निर्विवाद. आपल्या स्वत:तलं ते सुवर्ण आहे, सर्वश्रेष्ठ वस्तू आहे. आता ही स्थिती ओळखायला किंवा जाणून घ्यायला आपल्याला चंचल आणि अनित्य असलेलं आपलं मनच उपयोगी पडलं नाही काय? त्याला उद्देशून ऋषी म्हणतात की, या सगळ्या अनित्य साधनांनी मी हे अंतरात्म्याचं 'नित्यपद' शोधून काढलं आहे, मिळवलं आहे. 'अनित्यै: द्रव्यै: प्राप्तवान् अस्मि नित्यम् ।'

यावरून या मनाचा आणि त्यापूर्वी येऊन गेलेल्या बाह्यवस्तू, विषय, शरीर इत्यादी सर्व साधनांचा आणि त्यांपासून येणाऱ्या अनुभवांचा आपण जर मनापासून विचार करायचा ठरवला तर कुणालाही अंतरात्म्याचं किंवा ईश्वराचं दार खुलं होऊ शकेल, हा उपनिषदांचा संदेश मोठा आश्वासक वाटतो.

*

३६. अंतरात्म्याची वैशिष्ट्यं

अंतरात्म्याच्या शोधाच्या वाटचालीत शरीर आणि मन हे दोन मोठे विषय कसे पार करावे लागतात, हे आपण गेल्या प्रकरणात पाहिलं. या दोनही घटकांना बरेचसे दृश्याचेच गुणधर्म लागू असल्यामुळं शरीर आणि मन यांच्यावर जर आपण आपला आनंद अवलंबून ठेवला तर, आपल्या पदरात आनंदाऐवजी सुख किंवा दु:ख, जास्तीकरून दु:खच पदरात पडेल, हेही आपण लक्षात घेतलं असेलच. आपल्याला जरी आपण स्वत: म्हणजे आपलं शरीर आणि मन असं वाटत असलं तरी वस्तुस्थिती खरी तशी नाही, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.

शरीरात सतत बदल घडत आहेत. मनात सतत बदल घडत आहेत. हे आपल्याला कळतं, त्याअर्थी या सगळ्या बदलांना पाहणारा आणि स्वत: न बदलणारा असा कुणीतरी आपल्यात असलाच पाहिजे, हे उघड आहे. कुठंतरी एक केंद्र स्थिर असल्याशिवाय इतर बदलांची आणि फेरफारांची नोंद घेणं अवघड आहे. असा बदल पाहणारं आणि ज्यात स्वत:त बदल होत नाही अशी एकच वस्तू आपल्याला स्वत:त दिसेल. ती म्हणजे आपल्या ठिकाणचं 'चैतन्य' होय. याच चैतन्याला आपण प्राण, शुद्ध जाणीव, आत्मा, अंतरात्मा, हृदयस्थ ईश्वर अशी वेगवेगळी नावं देतो.

ही नावं कोणतीही असली तरी आपल्या ठिकाणचं चैतन्य किंवा जाणीव ही मात्र कुणालाही अनुभवायला येणारी आणि त्यामुळं मान्य होणारी वस्तू आहे, हे नक्कीच. हा विचार करणं किंवा ती वस्तू शोधणं, हुडकणं हे थोडं कठीण वाटतं, हे खरंच. कारण शरीर दिसतं. स्पर्श किंवा पाहाणं या रूपानं आपल्याला त्याचा साक्षात अनुभवही घेता येतो. म्हणून ते जरा त्यातल्या त्यात सोपं वाटतं.

पण हेच मनाकडं गेलं की, ते दिसत नसलं तरी स्वीकारावं लागतं. कारण त्याच्या अस्तित्वाचा पुरावा आपल्याला लगेच मिळतो. कुणीही माणूस झाला तरी, राग, लोभ, मोह, आनंद, सुख, आवड-नावड, हवं-नकोसं वाटणं या कुठल्या ना कुठल्या प्रतिक्रियेनं त्याच्या मनाचं अस्तित्व सिद्ध होतं आणि ते मान्य

करावं लागतं. वास्तविक मनही तसं दिसत नाही. दाखवता येत नाही, या अर्थानं 'गूढ'च म्हटलं पाहिजे. तरीही आपण ते अनुभवतो आणि मान्य करतोच ना? नुसतं मान्य करतो असं नव्हे तर, मनासारखं घडावं आणि मनाविरुद्ध घडू नये यासाठी रात्रंदिवस आटापिटासुद्धा करतो. मग आपल्याला थोड्या अधिक 'गूढ' असलेल्या अंतरात्म्याचा किंवा चैतन्याचा विचार करायला अडचण ती कुठली?

ऋषींनाही त्याच्या गूढपणाची कल्पना नाही, असं नाही. म्हणून त्याविषयी सुरुवातीलाच ते म्हणतात, 'आत्मास्य जन्तोर्निहितो गुहायाम्।'

या शोधाला तरी आपण का आलो आहोत, याची आठवण पुन्हा एकदा करू. मग पुढची वाटचाल आपण करू. प्रत्येक माणसाला आज त्याचं सुख बाह्य वस्तूवर, शरीरावर व मनावर अवलंबून ठेवल्यामुळं व त्या त्या वस्तू बदलणाऱ्या, अशाश्वत, चंचल अशा असल्यामुळं त्यांच्यावर अवलंबून ठेवलेलं सुखही तसंच अशाश्वत, चंचल आणि न टिकणारं झालं आहे, हा आपला अनुभव आहे. म्हणून या सर्वांपलीकडं असणारं 'मी'चं जे मूळ स्वरूप - 'चैतन्य' किंवा 'अंतरात्मा' त्याकडं जाण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. म्हणूनच आपण जशी या वस्तूंची, शरीराची, मनाची वैशिष्ट्यं व गुणधर्म पाहिले तसंच या चैतन्याचे किंवा जाणिवेचे गुणधर्म किंवा वैशिष्ट्यं आपण पाहू.

जाणिवेचं सर्वांत प्रधान वैशिष्ट्य असं की, ती प्रत्येकाच्या ठिकाणी आणि सारख्याच प्रमाणात विद्यमान आहे. कुणा एखाद्याची शरीराप्रमाणं किंवा बाह्य परिस्थितीप्रमाणं चैतन्य किंवा जाणीव कमी जास्त असं कधी होत नाही. मनुष्य बालपणी जन्माला आल्यापासून तो वृद्धपणी मरेपर्यंत त्याच्यातली जाणीव तितकीच ताजी आणि जिवंत असते. शरीराच्या बाह्य वाढीमुळं शरीराच्या एखाद्या भागात जाणीव कमी पडली, असं कधी होत नाही. ही जाणीव त्याच्या लहानपणाची जेवढी साक्षीदार आहे, तेवढीच ती त्याच्या तरुणपणाची आणि वृद्धपणाचीही साक्षीदार आहे.

तिचं पुढचं वैशिष्ट्य असं की, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म असे क्षणभर बाजूला ठेवले तरी, ज्या आजच्या जन्माविषयी कुणालाही शंका बाळगायच कारण नाही. त्या या साठ, सत्तर वा शंभर वर्षांच्या आयुष्यात ही जाणीव नित्य शाश्वत आणि अखंड आहे. याहीपेक्षा मोठं वैशिष्ट्य असं की, माणसाला बाह्यतः लौकिकदृष्ट्या

यश येवो, अपयश येवो, त्याच्या मनाप्रमाणं घडो, मनाविरुद्ध घडो, तो झोपडीत राहो, बंगल्यात राहो, त्याच्याजवळ अमाप पैसा असो व नसो, त्याला लोक मान देवोत वा त्याचा अपमान करोत, या कुठल्याही परिस्थितींत आतलं चैतन्य किंवा जाणीव स्थिरच राहाते. या सर्व चढ-उतारांकडं ती तितक्याच तटस्थपणानं किंवा साक्षीभावानं पाहते. आपला माणूस जवळ आला काय, शत्रू अंगावर धावून आला काय, जाणीव त्याच्याकडं तितक्याच सरळ दृष्टीनं पाहते.

या सगळ्या घटनांत, आपल्या लक्षात येईलच की, मनाची अगदी टोकाची उलघाल होते, पण या चैतन्याची किंवा अंतरात्म्याची स्थिती मात्र शांत आणि कायम असते. म्हणून याचं वर्णन करताना ऋषींनी वापरलेली दोनतीन विशेषणं लक्षात घेण्यासारखी आहेत. हा अंतरात्मा सदैव 'मध' खाणारा म्हणजे आनंदात असणारा आहे, 'य इमं मध्वदं वेद ।'. तो धूर नसलेल्या ज्योतीसारखा शुद्ध आणि सदैव प्रकाशित आहे, 'ज्योतिरिव अधूमकः।'. तो सतत सरळपणे पाहणारा आहे. 'अवक्र चेतसः।'. तो कुणाला कधीही कंटाळत नाही आणि त्याला जाणणाराही कधी कुणाला कंटाळत नाही, 'न ततो विजुगुप्सते ।' इत्यादी.

आता आपण ज्या पद्धतीनं शरीराची वैशिष्ट्यं पाहून किंवा मनाची वैशिष्ट्यं पाहून त्यावर अवलंबून ठेवलेल्या सुखाची अवस्था कशी होते ते पाहिलं, त्याच पद्धतीनं या अंतरात्म्यावर सुख अवलंबून ठेवलं तर आपली अवस्था कशी होईल, ते आपण समजून घेऊ. उदाहरणार्थ, शरीरावर सुख अवलंबून ठेवलं. या क्षणी शरीराला गार वारं हवं आहे, आता ते गार वारं मिळाल्यावर शरीराला सुख होईल, हे खरं. पण जर ते वारं आणणं आपल्या हातात नसलं म्हणजे वीज नसेल व वारंही सुटत नसेल तर शरीराला दुःख होईल. त्यामुळं आपल्याला दुःख होईल.

उलट त्याच वेळेला नेमकं गरम वारं सुटलं तरीही दुःखच आणि जरुरीपेक्षा जास्त गार वारं आलं तरीही दुःखच. हीच अवस्था मनाच्या बाबतीतही लागू करता येईल. ज्या वस्तूवर आपण आपलं सुख अवलंबून ठेवलं त्या वस्तूनुसार, परिस्थितीनुसार आपल्याला सुख-दुःख भोगावं लागेल. हेच याऐवजी जर आता आपलं सुख आपण अंतरात्म्यावर अवलंबून ठेवलं तर मात्र, अंतरात्म्याच्या वैशिष्ट्यानुसार आपलंही सुख-दुःख ठरेल.

हेच उदाहरण अंतरात्म्याला लावायचं म्हटलं तर गार वारं येत असताना,

जरुरीपेक्षा जास्त येत असताना, येऊ शकत नसताना, गार वाऱ्याची आवश्यकता असूनही गरम वारं येत असतानासुद्धा चैतन्याच्या अवस्थेमध्ये कुठलाही फरक पडलेला नाही. त्यामुळं ते चैतन्य त्या चारही अवस्थांमध्ये जसं सुखात होतं तसंच ते कायम सुखात आहे, असं आढळून येईल आणि आता आपलं सुख शरीरावर अवलंबून न ठेवता अंतरात्म्यावर अवलंबून ठेवलं, तर स्वाभाविकपणे त्याच्या गुणधर्मानुसार आपली ही सुखाची परिस्थिती तशीच म्हणजे कायम राहील. वरील चारपैकी कुठल्याही प्रकारची परिस्थिती आली तरी अंतरात्म्याप्रमाणं आपणही शांत आणि सुखी राहू शकू.

या 'सतत सुखात राहण्याच्या अवस्थेला' आता आपण 'आनंद' का म्हणतो आहोत, हे आपल्या लक्षात येईल.

ऋषींच्या म्हणण्याप्रमाणं सतत आत्मावस्थेत राहणारा म्हणजेच आपलं सुख अंतरात्म्यावर, शुद्ध जाणिवेवर किंवा चैतन्यावर अवलंबून ठेवणारा सदैव शांत व आनंदी राहू शकतो, इतर लोक राहू शकत नाहीत - 'तेषां सुखं शाश्वतं न इतरेषाम् ।'

आता आपलं सुख आत्म्यावर अवलंबून ठेवणं म्हणजे काय, त्यातल्या अडचणी व मार्ग कोणते, हे आपण पुढल्या प्रकरणात पाहू या.

*

आपलं सुख शरीरावर अवलंबून ठेवल्यानं काय होतं, मनावर अवलंबून ठेवल्यानं काय होतं आणि अंतरात्म्यावर अवलंबून ठेवल्यानं काय होतं, यांतला फरक आपण पाहात आहोत. शरीर आणि मन या दोन्हींचेही गुणधर्म, आपलं सुख त्याच्यावर अवलंबून ठेवल्यावर, आपल्या सुखाला लागू होतात, हेही आपण पाहिलं. म्हणूनच आपलं सुख खंडित होऊन अनेकदा आपल्याला दुःख भोगावं लागतं, असा अनुभव येतो. याऐवजी आता आपलं सुख अंतरात्म्यावर अवलंबून ठेवल्यावर काय फरक पडतो, ते आपण पाहू.

चैतन्य हे सदासर्वकाळ एका स्थितीत राहतं. सुखासाठी आता आपण त्याच्याकडं पाहिलं तर, चैतन्याच्या सहवासानं दरक्षणी आपल्या मनाला येणारी अस्थिरता हळूहळू कमी होऊ लागून आपल्याला स्थिरतेचा, पर्यायानं शांततेचा अनुभव येऊ लागतो. प्रमाणानं पाहिलं तर एकदम दुसऱ्या टोकाचा अनुभव येणं हे जरी अपेक्षित नसलं, तरी मनाची अस्थिरता किंवा चंचलता यांचं प्रमाण कमी झाल्याचा अनुभव मात्र आपल्याला खचितच येऊ शकतो.

चैतन्याचा दुसरा गुणधर्म पाहिला तर 'न ततो विजुगुप्सते' या न्यायानं ते कधीच कोणाला कंटाळत नाही. दिवस-रात्र, गार-गरम, जनात-वनात, हव्या असलेल्या माणसांत-नको असलेल्या माणसांत, हव्या असलेल्या परिस्थितीत -नको असलेल्या परिस्थितीत माणसाच्या चैतन्याची कधीच वेगवेगळी प्रतिक्रिया होत नाही. अंतरात्मा जितका एका स्थितीत आनंदात असतो तितकाच तो दुसऱ्या स्थितीतही आनंदात असतो. आपण त्याला चिकटून राहिलो तर, आपल्यालासुद्धा अशाच समान प्रतिक्रिया देता येतील. तसंच सदैव आनंदात राहता येईल.

आपण आत्म्याचं जे आणखी एक वैशिष्ट्य पाहिलं ते म्हणजे तो 'अवक्रचेतस' म्हणजे सरळपणे पाहाणारा असा आहे. आपण जर त्याला अनुसरून राहू तर, आपल्यालासुद्धा ही सरळपणे पाहण्याची विद्या येऊ शकेल. मग माणसागणिक आपली जी पाहण्याची दृष्टी बदलते, आपल्या वक्रतेनं

पाहण्याच्या सवयीमुळं आपण त्याच्या वागण्याचे, हेतूंचे जे वेगवेगळे अर्थ लावतो, ते आपोआपच थांबेल. त्यामुळं आपलीच कलुषित होणारी वृत्ती आवरली जाऊन आपल्याला सरळपणाचा आनंद मिळू शकेल.

या सूत्राचं स्पष्टीकरण देताना सरळ पाहण्याच्या क्रियेला 'सूर्यकिरणाची' उपमा देतात. तो जातो तेव्हा सरळच जातो आणि ती वस्तू प्रकाशित करतो. अंतरात्माही असंच काम करतो. आपणसुद्धा माणसांकडं, घटनांकडं असं सरळ पाहू शकलो तर, त्या त्या घटना सरळ प्रकाशित होतील. यासाठी सरळपणानं पाहिल्यावर प्रत्येक गोष्ट चांगलीच दिसेल, असं समजायचं कारण नाही. या ठिकाणी सरळपणा आणि भाबडेपणा यांतला फरक आपण अवश्य लक्षात घ्यावा.

किरणांचंच उदाहरण अधिक स्पष्ट केलं तर असं म्हणता येईल की, ज्याच्यावर ते पडतील ती गोष्ट चांगली किंवा वाईट ठरवण्याचा त्यांचा उद्देश नसतो. फक्त ती जशी आहे तशी प्रकाशित करण्याचं त्यांचं कर्तव्य ते पार पाडतात. स्वत:च्या पाहण्याच्या क्रियेत ते कुठलीही वक्रता येऊ देत नाहीत, हे आपण शिकण्यासारखं आहे.

आपल्याला मात्र स्वत:चे अनुभव, मतं, आग्रह, आपल्या डोक्यातल्या कल्पना यांमुळं कुणाचा व्यवहार सहसा कधी सरळ दिसत नाही, तर आपल्या मनानं त्याचा अर्थ लावून आपण मोकळे होतो. उलट असं करण्यात त्याचा अमुकच एक उद्देश असला पाहिजे असा आरोप दुसऱ्यावर करूनही आपण मोकळे होतो. अर्थात अशी वस्तुस्थिती नसल्यामुळं आपल्याला एकतर खोट्या समाधानात जगावं लागतं, नाहीतर दु:खाला सामोरं जावं लागतं. किरणांच्या किंवा अंतरात्म्याच्या या सरळपणाच्या गुणधर्माला आपण चिकटून राहू तर आपल्याला वस्तुस्थिती तर नीट कळेलच, पण आपला आनंदही कधी बिघडणार नाही.

आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणं कशावर तरी स्थिर होण्याची ही क्रिया करणारं आपल्यामध्ये या अवस्थेत तरी 'मन'च आहे. तेच मन त्याचं सुख वस्तूवर अवलंबून ठेवतं, घटनेवर अवलंबून ठेवतं. तेव्हा ती वस्तू मिळाली किंवा ती घटना घडली की, ते आनंदित होतं. ती वस्तू न मिळाली किंवा मोडली किंवा मिळूनही उपयोगाची नाही हे लक्षात आलं की, ते दु:खी होतं. त्यामुळं ते सारखंच

हेलकावे खात असतं.

तेच ज्या वेळेला शरीराला चिकटून राहतं, तेव्हा शरीराच्या सुखाचं ते माझ्या सुखाचं, शरीराच्या दुःखाचं ते माझ्या दुःखाचं असं मानू लागतं. शरीर तर कधीच एका स्थितीत राहू शकत नाही म्हणून मनही कधी एका स्थितीत राहू शकत नाही. म्हणून पुन्हा मनाला सतत हेलकावे बसतात. हेच मन 'मनाला' म्हणजे कळण्याच्या सोयीसाठी 'खालच्या मनाला'- अर्थात हलक्या प्रतीच्या अशा अर्थानं 'खालच्या मनाला' असं म्हणू - चिकटून राहातं, तेव्हा त्या खालच्या मनासारखं ते सुखाचं आणि त्याच्याविरुद्ध ते दुःखाचं, अशी समजूत करून घेतं. मग सुखाच्या आशेनं त्या खालच्या मनासारखं व्हावं म्हणून त्याची धडपड सुरू होते. ते खालचं मन कधी स्थिर नसल्यामुळं या मनालाही हेलकावे बसून पुन्हा अशीच अस्थिर अवस्था अनुभवायला येते. सांगण्याचा मुद्दा असा की, या वरच्या मनाकडं कशाशीही तादात्म्य पावण्याची म्हणजे त्या त्या वस्तूला चिकटून राहण्याची क्षमता आहे.

या क्षमतेचाच वापर आपण चैतन्याला चिकटून राहण्यासाठी का करू नये ? हा ऋषींनी सूचित केलेला मार्ग आहे. जर या वरच्या मनाला शरीराशी तादात्म्य होता येतं आणि ते झाल्यानं शरीराच्या गुणधर्माप्रमाणं सुख-दुःखं भोगावी लागतात तर, त्याच वरच्या मनाला चैतन्याशी किंवा अंतरात्म्याशी तादात्म्य होता येऊन अंतरात्म्याच्या गुणधर्मासारखं सदैव स्थिर, शांत आणि आनंदित राहता येऊ शकेल. या दृष्टीनंच पूर्वी आपण असं म्हटलं की, हेच मन आपल्याला नित्य अशा आत्मस्वरूपाकडं जायला मदत करील.

आता या चैतन्याशी तादात्म्य होण्याच्या मार्गाची वाटचाल कशी होते, ते पाहू. ती होण्यासाठी दोन गोष्टी उपनिषदांनी प्रथम महत्त्वाच्या मानल्या आहेत. 'आवृत्त चक्षुः अमृतत्वमिच्छन् ।' भावार्थ असा की, ज्याला या अखंड आनंदाचा मार्ग चालायचा आहे, त्याला प्रथम इंद्रियांना आत वळवण्याची विद्या साधावी आणि दुसरं त्याला 'हे मिळावं' अशी तीव्र इच्छा असावी.

इंद्रियं आत वळवणं याचा अर्थ थोडा स्पष्ट करून घेतला तर उपयोगी होईल. लौकिकदृष्ट्या शरीराची रचनाच अशी आहे की, इंद्रियं बहिर्मुख आहेत ती बाहेरच उघडतील, बाहेरच धावतील. शरीराच्या धारणेसाठी त्याची गरजही आहे.

डोळे उघडून बाहेर न पाहतील तर, माणसाला ना रस्ता दिसेल, ना त्याचा व्यवहार होईल.

तेव्हा या आत वळवण्याच्या कल्पनेचा अर्थ असा नव्हे की, ते व्यवहार आपण थांबवावेत. फरक एवढाच आहे की, इंद्रियांची हालचाल ही आपला व्यवहार सुकर होण्यासाठी करायची की सुखासाठी करायची? तर ज्याला आनंदाचा मार्ग चालायचा आहे, त्यानं ते व्यवहार शरीराच्या किंवा समाजाच्या धारणेसाठी करावेत, सुखाच्या आशेनं कधी करू नयेत. कारण ते सुख तिथं कधी मिळणार नाही, हे खरं आहे. आता अशा वेळी इंद्रियं आत वळवणं म्हणजे डोळ्यांचं बाहेर जसं पाहणं आहे, तसंच त्यांना आतही पाहायला लावणं. त्या डोळ्यांनी आत पाहिलं तर, आत्ताच्या अभ्यासात जे जे आपल्याला आढळून आलं, ते ते त्यांनाही स्वत:च्या बाबतीत अनुभवायला येईल.

दुसरी गोष्ट इच्छा बाळगण्याची. आपल्या मनाला इच्छा करण्याची सतत सवय आहे. त्याला सतत असंख्य गोष्टी हव्याशा वाटतात, घडाव्याशा वाटतात. त्यांतल्या फार कमी प्रत्यक्षात घडतात. कारण फार कमी गोष्टींसाठी त्याच्याकडून मनापासून प्रयत्न होतात. आपल्या बऱ्याचशा इच्छा मंद स्वरूपाच्या असतात, तर फार थोड्या इच्छा तीव्र स्वरूपाच्या असतात. अशा वेळी आपली आनंदाची इच्छा मंद असेल तर ती कधी फलद्रूप होणार नाही. अशा वेळी या आत्मविद्येला दोष देऊन उपयोग नाही, तर आपली इच्छा पुरेशी तीव्र नाही हे लक्षात घेतलं पाहिजे. अनेकांना या मार्गाला लागून अनुभव येत नाही, याचं हे कारण असू शकतं. म्हणून ऋषींनी तीव्र इच्छेचा आणि अंतर्मुख होण्याचा मार्ग प्रथम सुचवला आहे आणि चैतन्याशी तादात्म्य होण्यात तो महत्त्वाचा ठरेल, असं वाटतं.

पुढची वाटचाल आणि त्यांतल्या अडीअडचणी आता पाहू.

*

आता या आत्मविद्येचा व्यवहार आणि त्यांतल्या अडीअडचणी पाहू. सर्वांत पहिली अडचण ही कठीणपणाची. अनेकांना असं वाटतं की, ही आत्मविद्या, तो अंतरात्मा, त्याचं स्वरूप, गुण समजून घेणं, त्या स्वरूपाला चिकटून राहाणं हे सगळं खूप अवघड आहे. ते सामान्य माणसाचं काम नाही. त्यामुळं आपण त्या फंदात न पडलेलं बरं. तर यावर असं म्हणता येईल की, जर आपल्याला खरंच सतत आनंदात राहायची इच्छा असेल तर, चैतन्यात राहण्याइतका सोपा आणि सुलभ मार्ग नाही.

समजा, एखाद्याला खूप श्रीमंत व्हायचं असेल किंवा जगात मान मिळवायचा असेल किंवा खूप धडधाकट शरीरप्रकृती मिळवायची असेल तर, त्यासाठी खूप कष्ट पडतील, खूप काळ लागेल. ते नक्की होईल की नाही, हेही सांगता येत नाही. अनेकांच्या बाबतीत त्यासाठी लागणारी साधनसामग्री, परिस्थितीची अनुकूलता म्हणजे उदाहरणार्थ, उत्तम शरीर कमवायला व्यायामाची साधनं, व्यायामशाळा, त्यांची फी, पौष्टिक आहार, उत्तम हवापाणी या आणि अशा अनेक आवश्यक गोष्टी अनेकांच्या आटोक्यातही नसतील. तीच गोष्ट खूप पैसा मिळवण्याच्या बाबतीत किंवा मानमान्यता मिळवण्याच्या बाबतीत असू शकते.

म्हणून एकवेळ या गोष्टी मिळवणं कठीण आहे, पण अंतरात्म्याशी तादात्म्य होणं, हे मात्र त्या मानानं प्रत्येकाला सोपं आहे. त्यासाठी लागणारा अंतरात्मा आणि तादात्म्य व्हायला लागणारं मन हे सर्वांकडं सारख्याच प्रमाणात पुरेसं उपलब्ध आहे. सृष्टीनं किंवा ईश्वरानं ते देताना कुणातही कधीही भेदभाव केलेला नाही. ही अत्यंत लक्षात घेण्यासारखी आणि भाग्याची गोष्ट आहे. त्यामुळं या विद्येला लागणारी साधनं इतकी कमी आहेत की, त्यासाठी कुणालाही ही विद्या कठीण आहे असं म्हणता येणार नाही.

फार झालं तर मनुष्य मला ही विद्या माहीत नाही किंवा सांगणारा कुणी नाही असं म्हणू शकेल. पण त्याचं उत्तरही उपनिषदांनी तेव्हाच देऊन ठेवलेलं आहे.

माणसाला शिकवणारे किंवा मार्गदर्शन करणारे गुरू कमी पडत नसून त्याची स्वत:ची इच्छा किंवा तळमळ कमी पडते. शिकवायला सृष्टीमध्ये माणूसच काय पशू, पक्षी, झाडंपेडं, दगडधोंडे सारे उत्सुक आणि तत्पर आहेत. म्हणून तर अग्नीकडून, पक्ष्यांकडून, पशूंकडून उपनिषदांतले कित्येक शिष्य व ऋषी शिकल्याच्या अनेक घटना आढळतात. स्वत: उपनिषदं आणि त्यानंतरचं तत्सम सर्व वाङ्मय म्हणजे ही विद्या शिकवणारे गुरूच आहेत. आजच्या विज्ञान युगामध्ये तर भूर्जपत्रं आणि ग्रंथांची दुर्मीळता अशासुद्धा अडचणी राहिलेल्या नाहीत. कुठलाही ग्रंथ केव्हाही, कुणालाही सहज उपलब्ध होऊ शकतो आहे. त्यामुळं गुरूबद्दलसुद्धा अडचण आहे असं वाटत नाही.

आता समजून घेण्यातला कठीणपणा विचारात घेऊ. एक गोष्ट खरी की, अलीकडं जसा दृक्श्राव्य माध्यमाचा प्रसार वाढला तसा माणसाच्या स्वतंत्रपणे विचार करण्याच्या कुवतीचा ऱ्हास होत चाललेला आपण पाहतो. जीवनातल्या व्यग्रतेत, संघर्षातही लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळं त्यासाठी धावपळ करताना माणसाला थांबायला आणि विचार करायला वेळ नाही, असंही म्हटलं जातं.

मनुष्याला पोटासाठी धावावं लागतं आहे, ही गोष्ट खरी. पण त्याला दोन बाजू आहेत, हेही खरं. एक म्हणजे - काही माणसं रिकाम्यापोटी धावताहेत हे जितकं खरं, तितकीच अनेक माणसं भरल्यापोटी धावताहेत, हेही खरं आहे. त्याची पोटाचीच नव्हे तर, त्याच्या आयुष्यभराची पोटाची चिंता मिटूनही अधिक वस्तू, अधिक सुखसोयी, मुलांच्याच नव्हे तर नातवंडं-पतवंडं यांच्या भविष्याचीसुद्धा तरतूद, ऐषआरामी जीवन - असल्या अनेक कारणांसाठी आणखी पैसा, आणखी पैसा असं करत सुटलेली कित्येक माणसं ही तरी नक्कीच पोटासाठी फिरणारी माणसं असं म्हणता येणार नाही. त्यामुळं त्यांच्या बाबतीत तरी कष्टांचा आणि वेळेच्या अभावाचा प्रश्न उद्भवू नये.

दुसरी गोष्ट अशी की, ज्या वेळी मनुष्य पोटासाठी धावतो आहे, असं आपण म्हणतो, त्या वेळी तो, त्याचं मन आणि अंतरात्मा किंवा चैतन्य काही घरी ठेवून धावत सुटलेला नसतो. नोकरीच्या ठिकाणी पोचण्यासाठी सकाळ-संध्याकाळ दोन-दोन तास प्रवास करावा लागणारा माणूस एका बाजूनं तो वेळ कसा घालवावा, या विवंचनेत आहे, तर दुसऱ्या बाजूनं पेपरातली कोडी सोडवणं, निरर्थक

बातम्या वाचणं, ऐकणं, पाहाणं, वेळ घालवण्यासाठी पत्त्याचे डाव मांडणं इथंपासून तो असंबद्ध मनोरंजनात तासन्‌तास घालवणं इथंपर्यंत कुठलाही मार्ग अनुसरतो आहे. अशा वेळी या आत्मविद्येचं प्रधान साधन असलेल्या 'मन आणि चैतन्य' या दोनही वस्तू त्याच्याजवळ सतत हजर आहेत. त्याचे स्वभाव आणि गुण समजून घ्यायचे असतील तर, त्याला वेळेची किंवा पोटाचीसुद्धा कुठली अडचण आहे असं म्हणता येईल, असं वाटत नाही.

राहता राहिला प्रश्न फक्त स्वतंत्रपणे विचार करण्याचा! ती शक्ती कुणाकडं नाही, असं म्हणणं धाडसाचं होईल. निसर्गानं त्याच्या देणगीत कुठला भेदभाव कधी केलेला नाही. मानवी वातावरण, संस्कार, जिज्ञासेला प्रोत्साहन या बाबतीत फरक असू शकेल. त्यातही मनोरंजनाचा अतिरेक झाल्यामुळं ही उरलीसुरली स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमताही गंजून जात असेल तर, त्याला जबाबदार आपणच आहोत. अंतरात्म्याचा विचार करताना वाटणारा कठीणपणा हा त्या विषयाचा नसून आमची विचारशक्ती कमकुवत झाल्यामुळं आलेला आहे, हे आपल्याला सहज दिसून येईल.

आज तरी कुणाला हे कठीण वाटत असलं तरी, थोड्याशा सरावानं माणसाची मूळ क्षमता नक्की पूर्वपदावर येऊ शकेल, याची खात्री वाटते. फक्त आपणच थोडी मरगळ झटकून दुबळेपणाचा त्याग करावा, हे उचित वाटतं. म्हणून पूर्वी उल्लेखल्याप्रमाणं 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत ।' अर्थात 'आपल्या क्षमतांच्या बाबतीत आपण जागे होऊ व यातल्या अनुभवी माणसांकडून ही विद्या शिकून घेऊ'असा निर्धार केला, तर हाही कठीणपणा उरणार नाही.

आता थोडा व्यावहारिक कठीणपणाचा विचार करू. अनेकांचं असं म्हणणं असतं की, हे सगळं 'तत्त्वज्ञान' ठीक आहे, पण व्यवहारात असं वागायला जमेल का? किंवा व्यवहारात असं वागता येईल का? तर बाहेरचा सर्व स्वार्थाचा व भ्रष्टाचाराचा व्यवहार, एकंदर धावपळ, लोभ, असूया यांसारख्या गोष्टी सर्वत्र सहज झालेल्या -असं सगळं जीवन पाहिलं तर ही अडचण प्रथमदर्शनी खरी वाटते. पण आपण आजचा व्यवहार कसा करतो याचा थोडासा विचार केला तर, याचं उत्तर आपल्याला सापडू शकेल.

आजचा व्यवहार कितीही गुंतागुंतीचा असला तरी, तो आपण लीलया पार पाडत असतोच. फार मोठी सूत्रं त्यामागं असतात, असंही नाही. जगाची वागण्याची पद्धत कशी आहे आणि मला काय सुखाचं वाटतं, या दोनच गोष्टींवर माणसाचा सगळा व्यवहार अवलंबून आहे.

परिस्थिती कितीही बिकट असली, विरुद्ध असली तरी, एकदा आपल्या मनासारखं करायचं ठरवल्यानंतर माणूस कोणतेही विरोध पत्करून किंवा कितीही अडचणींतून मार्ग काढून स्वत:च्या मनासारखं आजही करतोच ना? जग काय म्हणतं, शास्त्र काय म्हणतं अशांसारख्या अडचणी बाजूला ठेवून त्याला जे साध्य करायचं आहे, ते तो वेळी कायदेकानू गुंडाळूनसुद्धा आजही साध्य करतोच ना? त्या वेळी त्याला व्यवहार कुठं आड येतो?

'स्वत:च्या सुखाचं करणं' हे 'तत्त्वज्ञान' त्याला जर आजही व्यवहारात आणता येत असेल तर, 'अंतरात्म्याप्रमाणं वागण्याचं तत्त्वज्ञान' आजच्या व्यवहारात अंमलात आणताना त्याला अडचण असण्याचं काही कारण नाही. उलट स्वत:च्या मनासारखं वागूनसुद्धा दु:ख पदरात पडतं तरी, तो आयुष्यभर तसंच वागत असेल आणि अंतरात्म्याप्रमाणं वागून जर सतत आनंदाचं होणार असेल तर, कोणता शहाणा मनुष्य 'अंतरात्म्याप्रमाणं' वागायला नको म्हणेल ? एकूण 'अंतरात्म्याप्रमाणं' किंवा 'चैतन्याच्या गुणाप्रमाणं' स्वत: वागणं हे प्रथमदर्शनी जेवढं कठीण आणि अव्यवहार्य वाटतं तेवढं ते नक्कीच नाही, हे आपल्याला आढळून येईल.

उलट उपनिषदांचं म्हणणं असं आहे की, आत्म्याप्रमाणं अलिप्त, शांत, तटस्थ, सम, आनंदी राहाणं हेच वस्तुत: सहज व सोपं आहे. वस्तूच्या मागं, शरीराच्या मागं किंवा खालच्या मनाच्या मागं धावणं आणि तेही आपल्या पदरात वारंवार दु:ख पडत असताना धावणं, हेच उलट कठीण आणि त्रासाचं आहे.

खरं सांगायचं तर, माणूस मूलत: अंतरात्म्याशी तादात्म्य तर आहेच, किंबहुना तो स्वत:च आत्मस्वरूप आहे हे जर त्यानं एकदा जाणलं, तर तो आनंदमयच होईल, राहील. स्वत:च्या घरात आनंदात असलेला माणूस त्याला फुकट नेतो म्हटलं तरी, बाहेरच्या फुफाट्यात जायला तयार होणार नाही. तसंच उपनिषदं म्हणतात, 'ज्यानं स्वत:चं खरं स्वरूप एकदा ओळखलं तो सुखासाठी मन,

शरीर किंवा वस्तू यांच्यामागं फुकट नेतो म्हटलं तरी, धावायला तयार होणार नाही.' त्यांचं सूत्र असं आहे -

' आत्मानं चेद्विजानीयात् अयमस्तीति पूरुषः
किमिच्छन् कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ।'

सारांशानं आपल्या लक्षात येईल की, ही आत्मविद्या माणसानं एकदा मिळवली तर अखंड आनंदाचा स्रोत त्याला स्वतःमध्येच गवसेल. त्याचा लौकिक व्यवहार तर बिघडणार नाहीच. उलट बसल्या जागी त्याचं आनंदाचं काम कायमचं होऊन जाईल.

*

मनुष्य दु:ख नको असूनही दु:ख का भोगतो किंवा फक्त सुख मिळणं शक्य असूनसुद्धा सुख-दु:ख भोगणं का स्वीकारतो याचं एक सोपं कारण सांगतात आणि ते खरंही आहे. ते कारण असं की, माणसानं खरा आनंद कधी अनुभवलेला नाही. म्हणूनच तो या तडजोडी करायला तयार होतो. ज्यानं खऱ्या आनंदाचा अनुभव घेतलेला आहे आणि तो आपण नेहमी मिळवू शकतो याची ज्याला खात्री झालेली आहे, तो दु:खाशी तडजोड करायला कधीच तयार होणार नाही. म्हणून आपल्यालाही आत्मविद्येनं मिळणारा खरा आनंद अनुभवण्यात तसं पाहिलं तर कुठलीच अडचण नाही. जर असेलच तर आत्ता उल्लेख केल्याप्रमाणं 'मला त्या आनंदाची एकदा तरी झलक मिळावी' ही आहे किंवा हा आनंद अनुभवणारा कुणीतरी मला भेटावा, ही आहे. त्या आनंदाची खात्री झाली तर, कोणत्याही सामान्य माणसापासून असामान्य माणसापर्यंत कुणीही त्या आनंदासाठी अवश्य धडपडेल.

आता ही अडचण दूर व्हायचेही दोन-तीन मार्ग आहेत. एक म्हणजे आत्मानंदाची वाटचाल करणारा किंवा त्या स्थितीत असलेला कुणी सत्पुरुष भेटतो का, ते पाहात राहणं. हा मार्ग अत्यंत भाग्याचा, पण तितकाच दुर्मीळ आहे. दुसरा मार्ग, त्या आनंदाची थोडी तरी झलक स्वत: अनुभवण्याचा प्रयत्न करणं, हा आहे. त्यासाठी आत्म्याचे जे गुण किंवा जी वैशिष्ट्यं आतापर्यंत आपण पाहिली, त्यांतल्या एखाद्या वैशिष्ट्याप्रमाणं जगण्याचं थोडं धाडस स्वत:च करून पाहाणं.

म्हणजे उदाहरणार्थ, आपपरभाव नसणं, नि:स्वार्थी असणं, सदैव संतुष्ट आणि आनंदी असणं, कुठल्याही परिस्थितीत तितक्याच संतोषानं आणि चैतन्यमय राहाणं, निरपेक्षपणे आपलं कर्तव्य करणं - यांतल्या कुठल्याही एका गुणाला धरून आपण निदान एखाद्या वेळेस तरी वागून पाहावं आणि मिळणाऱ्या निर्भेळ आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. मग आपल्या देहाच्या, मनाच्या, वस्तूंच्या साहाय्यानं मिळवलेल्या आनंदाशी त्याची तुलना करून पाहावी आणि खऱ्या

अंतरात्म्याच्या आनंदाचं वेगळेपण आपल्याच अनुभवावरून ठरवावं.

आत्तापर्यंत जी वैशिष्ट्यं पाहिली त्यात अंतरात्म्याचं एक अत्यंत महत्त्वाचं वैशिष्ट्य आपण आता पाहू. आपण अंतरात्म्याचं जे स्वरूप आत्तापर्यंत पाहिलं त्यावरून आपल्या असं लक्षात येईल की, माझ्या ठिकाणी असलेलं चैतन्य आणि त्याचे गुणधर्म यांमध्ये किंचितसाही फरक नाही. प्रत्येकाच्या शरीराच्या आणि मनाच्या ठेवणीनुसार, त्यावर झालेल्या संस्कारानुसार जो फरक होईल, त्यामुळंच आपण एकमेकांपासून वेगळे वाटतो. त्यालाच ज्या वेळेला आपण अधिक ठळक आणि जाणवण्यासारखं रूप अकारण देतो, त्या वेळी मग जातीचे, वंशाचे, सुशिक्षितपणाचे, श्रीमंतीचे, आपला-परका याचे आणि असे असंख्य भेद निर्माण होतात. माणूस स्वार्थाच्या कारणांसाठी ते जपतो, त्याला खतपाणी घालतो. पण याचा कुठला ओरखडासुद्धा निसर्गनिर्मित आत्मस्वरूपावर किंवा माणसातल्या मूळ एकत्वावर उठत नाही.

मग आपण या भेदांना ठेवावं, वाढवावं की आत्मस्वरूपाची वाटचाल करून एकत्वावर यावं, असा प्रश्न पडण्याची शक्यता आहे. या भेदांमुळं माणसाचा स्वार्थ साधत असल्यासारखा वाटतो आणि त्यामुळं आपण सुखी होऊ, असंही वाटतं हे खरं. पण या सगळ्या भेदाच्या वाटचालीत मग माणसाच्या वाट्याला दुःख का येतं, याचं उत्तर देता येत नाही. साधा आपल्या आपल्या कुळाचा किंवा देशाचा अभिमान घेतला आणि त्याचा काही प्रमाणात होणारा फायदाही गृहीत धरला तर, हेच अभिमान अंतिमतः कुळा-कुळांतल्या आणि देशा-देशांतल्या टोकाच्या संघर्षांनासुद्धा कारणीभूत होतात. त्या वेळेला माणसाला 'भेद' सुखी करील की 'अभेद' सुखी करील, हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही.

माणसाचे बाह्यभेद हेही निसर्गाच्या व्यवस्थेप्रमाणं काही प्रमाणात वस्तुस्थिती म्हणून गृहीत धरले आणि त्यानुसार व्यवहार करणं सोपंही असलं तरी, त्याच निसर्गानं या भेदामुळं अंतिमतः निर्माण होणाऱ्या दुःखावर तितकाच उत्तम उपाय प्रत्येकाकडं त्याच्या अंतरात्म्याच्या किंवा चैतन्याच्या एकत्वाच्या रूपानं सदैव उपलब्ध ठेवला आहे. त्याचं नुसतं भान जरी हे व्यवहार करताना आपल्याला राहिलं तर, द्वैताची किंवा भेदाची अडचणही होणार नाही आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या दुःखालाही सामोरं जावं लागणार नाही.

माणसाचा नेहमीचा व्यवहार पाहिला तरी, कोणत्याही दुःखाच्या प्रसंगात तो दुसऱ्याकडं मदतीची अपेक्षा करताना आपण एकच आहोत, या भावनेनं अपेक्षा करतो. सामूहिक पातळीवरसुद्धा आपत्तीच्या वेळी तो 'भेद बाजूला ठेवा' आणि आपण 'एक आहोत' हे लक्षात घ्या आणि एकमेकांना मदत करून आपत्तीचं दुःख दूर करा किंवा आनंद मिळवा, असंच आवाहन करतो. मग हे जे त्याला दुःखात सुचतं तेच त्याला नेहमी सुचलं तर अडचण कुठली? आणि ते नेहमी सुचणं म्हणजेच माणूस नेहमी आनंदात असणं आणि हे नेहमी आनंदात असणं म्हणजेच आत्मविद्येत अभिप्रेत असलेल्या आत्मस्थितीत राहाणं होय.

सुरुवातीला पाहिल्याप्रमाणं अंतरात्म्याचं भान ठेवून वागणारा, त्याला चिकटून किंवा त्याच्या गुणधर्माप्रमाणं वागणारा दुसऱ्याच्या ठिकाणी त्याच्यासारखाच असलेला अंतरात्मा किंवा शुद्ध चैतन्य अगदी सहज आणि स्वच्छपणे पाहू शकतो. त्याच्याशी तादात्म्य होणं त्याला चटकन जमतं. कारण बाह्यतः वयाचे, परिस्थितीचे कितीही भेद असले तरी आत्मस्वरूप दोघांच्याही ठिकाणी तितकंच सारखं असतं. त्यामुळं त्याच्याशी एकरूप होण्यात अशा माणसाला कुठलीच अडचण येत नाही. शिवाय चैतन्याच्या प्रकाशामध्ये त्याचं मन, त्याचे संस्कार, त्याचं शरीर आणि त्याच्या हालचाली सारं प्रकाशित होत असल्यामुळं एकदा आत्म्याशी एकरूप झाल्याबरोबर त्या दुसऱ्या व्यक्तीचं मन, मतं, आग्रह सारं प्रकाशित होतं आणि कळतंही. दुसऱ्याच्या आत्म्याशी एकरूप होण्यात उपनिषदांच्या म्हणण्याप्रमाणं कुठलीच अडचण नाही.

त्याला उपमा देताना ऋषींनी 'शुद्ध पाण्याची' उपमा दिली आहे. ते म्हणतात,'यथोदकं शुद्धेशुद्धं आसिक्तं तादृगेव भवति।' अर्थात शुद्ध पाण्यात टाकलेलं शुद्ध पाणी मिसळायला किती वेळ लागतो आणि किती अडचण असते ? तर अजिबात वेळ लागत नाही आणि कुठलीही अडचण असत नाही. खरं तर, एक माणूस दुसऱ्या माणसाशी तादात्म्य होणं हे इतकं सोपं व शक्य आहे, हे जर एकदा लक्षात आलं तर माणसाला संत कसे जगतात किंवा सत्पुरुष सदैव आनंदात का राहू शकतात, त्यांना कुठल्याही जीवाचं प्रेम तितकंच का वाटतं, कुणाशीही आणि त्याच्या सुख-दुःखाशी ते चटकन एकरूप का होऊ शकतात आणि कुठल्याही स्थितीत ते अलिप्त का राहू शकतात - या साऱ्यांचा आपल्याला

खचितच उलगडा होईल, असं वाटतं.

खरे संत म्हणजे अंतरात्म्याचं व्यक्त स्वरूपच होत. संतांचं उदाहरण देण्याचं कारण एवढंच की, ईश्वर वा अंतरात्मा अव्यक्त आहे. कळला, पटला तर ठीक. पण संत किंवा सत्पुरुष व्यक्त आहेत. आपल्यासारखे हाडामांसाचे आहेत. आपल्यातच वावरणारे आहेत. आपल्या आत्म्याच्या गुणांचा उलगडा झाला की जसा इतरांच्या आत्म्यांच्या गुणांचा उलगडा होतो, तसा संतांचा उलगडा झाला तर ईश्वराचाही उलगडा होतो. अंतरात्म्याचाही उलगडा होतो आणि आत्मविद्येचाही उलगडा होतो. या आत्मविद्येच्या वाटचालीनं आपण आनंदाच्या राज्यात नुसतंच पोचतो असं नव्हे तर, जन्मभर त्याच राज्यात विहरत राहू शकतो.

*

उपनिषदं हा एका परीनं अनुभवग्रंथ आहे. प्रत्यक्ष जगताना आलेले अनुभव, त्यांच्यावरचं सखोल चिंतन, मूलतत्त्वांचा शोध, प्रयोग, त्यातून ऐहिक व पारलौकिक जीवन सार्थ करण्याची सापडलेली सूत्रं - असं या उपनिषदांचं वैशिष्ट्य आहे. या साऱ्या अनुभवाची मांडणी मात्र संवादमय, बोलीभाषेतली, अत्यंत मोजक्या शब्दांत, सूत्रमय अशी आहे. त्यामुळं तिच्यापासून आपल्याला लाभ घ्यायचा असला तर आपल्यालाही त्या सूत्रांचं व त्यांतल्या अनुभवांचं चिंतन करावं लागतं, त्याचा आजच्या जीवनातल्या अनुभवांशी मेळ घालून पाहावा लागतो, मग स्वीकार्य सुवर्ण गवसतं. त्या दिशेनं एक प्रयत्न आपण या 'ठेव्या'च्या रूपानं केला.

यात शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, सुख, आनंद, देवाचं स्वरूप, व्रतं, उपासना, दान अशा अनेक विषयांबद्दलच्या कितीतरी खऱ्या व वेगळ्या कल्पना आपल्यासमोर आल्या असतील. या कल्पना अर्थातच कुठल्या विशिष्ट व्यावहारिक किंवा रूढ अर्थानं आध्यात्मिक विषयालाच लागू होतात असं नसून, मुख्य आत्मविद्येबरोबरच त्या आपल्या नेहमीच्या व्यवहारांतल्या अनेक गोष्टींना व प्रश्नांना स्पर्श करतात, हे आपल्या लक्षात आलं असेलच. या साऱ्या कल्पना अगदी निरुपाधिक, धर्मपंथातीत आहेत. म्हणून त्यांना 'जीवनविद्येचा ठेवा' म्हणणंच उचित आहे. हा 'ठेवा' कुणालाही उपलब्ध असलेला व खरा आनंद मिळवायला उपयोगी ठरणारा 'ठेवा' आहे, असं नम्रपणानं म्हणावंसं वाटतं.

उपनिषत्कार ऋषींना या ज्ञानाच्या उपयुक्ततेची इतकी खात्री आहे की, एका ठिकाणी या विद्येचा उपयोग वर्णन करताना त्यांनी दिलेली उपमाच पाहाणं योग्य ठरेल. त्यांचं म्हणणं असं की, ही आत्मविद्या किंवा जीवनदायी विद्या इतकी प्रभावी आहे की, वाळलेल्या झाडाच्या खोडाला ती सांगितली तरी त्याला फांद्या फुटतील व पालवी येईल. 'यद्यप्येनत् शुष्काय स्थाणवे ब्रूयात्, जायेरन्नेवास्मिन् शाखाः प्ररोहेयुः पलाशानीति।'

एका परीनं विचार केला तर, भौतिक प्रगती कितीही होत असू द्या, माणसाची

स्वास्थ्याच्या बाबतीत, आंतरिक शांततेच्या बाबतीत अधोगतीच होते आहे, असं दिसून येतं. स्वार्थाच्या, वेगवेगळ्या उपभोगांच्या लालसेनं, पैशाच्या अतिरेकी आकर्षणामुळं माणुसकीच्या बाबतीत अनेकदा वठलेल्या झाडासारखीच आपली अवस्था झाल्याचं जाणवेल. अशा वेळी माणसाला हा आत्मविद्येचा व उपनिषदांतली जीवनदृष्टीचा शिडकावा पुन्हा माणुसकीची, माणसातल्या देवत्वाची पालवी उत्पन्न करू शकेल, असा आजही विश्वास वाटतो.

आपण या पुस्तकाच्या निमित्तानं काही जिज्ञासा जागृत होऊन आत्मचिंतन करावं, त्यांतली स्वीकारण्यासारखी वाटतील ती तत्त्वं स्वीकारावी, प्रयोग करावे आणि अंतरात्म्याचा आनंद याचि देही घ्यावा - द्यावा एवढी कळकळीची प्रार्थना वाचकांना करून हा 'ठेवा' त्यांच्या हाती सादर सुपूर्द करतो.

*

• संदर्भसूची •

(या पुस्तकात विविध ठिकाणी आलेली मूळ संस्कृत सूत्रे ज्या उपनिषदांत आहेत ते दर्शविणारी ही संक्षिप्त सूची आहे. मूळ लेखन करताना त्या त्या ठिकाणी कंसात विविध संदर्भ, त्यांची संबंधित मूळ उपनिषदे व मंत्र-ऋचा यांचे क्रमांक येणे उचित असले तरी अशा संदर्भांमुळे वाचनाच्या ओघाला व सोपेपणाला बाधा येऊ नये म्हणून, ही संक्षिप्त सूची अशा वेगळ्या स्वरूपात शेवटी दिली आहे.

आजच्या काळाच्या व वाचकांच्या संदर्भात हा विषय अधिकाधिक सोपा ठरावा व त्यांची जिज्ञासा जागृत करणारा व्हावा या उद्देशाने ही पद्धती स्वीकारली आहे. अधिक संदर्भ पाहू इच्छिणाऱ्या व अभ्यास करू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी, त्या त्या पानावर येणाऱ्या संबंधित मंत्राचा किंवा त्याच्या सुगम अनुवादाचा संदर्भ असलेले मूळ उपनिषद खाली दिले आहे.)

पृष्ठ क्रमांक	मूळ उपनिषद	पृष्ठ क्रमांक	मूळ उपनिषद
११	ईश	१६	मुंडक
२०	प्रश्न	२०	प्रश्न
२०	बृहदारण्यक	२२	छांदोग्य
२४/२५	छांदोग्य	२८	ऐतरेय
३१/३२	कठ	३४	छांदोग्य
३८	केन	३९	ईश
४५	छांदोग्य	५०	श्वेताश्वतर
५५	मुंडक	५८	कठ
६२	कठ	६६	बृहदारण्यक
६९	छांदोग्य	७४	श्वेताश्वतर
७६	बृहदारण्यक	७९	बृहदारण्यक
८३	तैत्तिरीय	८८/८९	ब्रह्मबिंदु

पुढे चालू...

पृष्ठ क्रमांक	मूळ उपनिषद	पृष्ठ क्रमांक	मूळ उपनिषद
९२	ब्रह्मबिंदु	९२/९३	तैत्तिरीय
९४/९५	छांदोग्य	९६/९७	छांदोग्य
९७	बृहदारण्यक	९८	कौषीतकि
९८/९९	नारायण	१००	तैत्तिरीय
१००	नारायण	१०१	ब्रह्मबिंदु
१०२	आरुणिक	१०३	बृहदारण्यक
१०७/११४/११५/११६/१२०.....			कठ
१२२ ते १२४/१२५/१२७/१३१.....			कठ
१३३	बृहदारण्यक	१३६	कठ
१३८	छांदोग्य		

(मूळ उपनिषदांसाठी पूज्य कै. बापटशास्त्री, म.म.चित्रावशास्त्री यांची 'सार्थ उपनिषदे' व पूज्य विनोबांची उपनिषदांतील निवडक उताऱ्यांची 'सार्थ अष्टादशी' कृपया पाहावी. या सर्व आदरणीय अनुवादकांचा व संकलनकर्त्यांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.)

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद


ईश
कठ
केन
तैत्तिरीय
कौषीतकि
प्रश्न
ऐतरेय
छान्दोग्य
श्वेताश्वतर
नारायण
आरुणिक
बृहदारण्यक
मुण्डक
ब्रह्मबिंदु
शिक्षणातलं शिकण्यासारखं
खरा विद्यार्थी
स्वार्थाची सीमारेषा
झाकलेला ईश्वर
सुखाचा मार्ग
देवाचं स्वरूप काय ?
उपासनेचे टप्पे
आगळीवेगळी व्रतं
भोजन भूमिका